# गगन भरारी

## सुधीर कारखानीस



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# गगन भरारी

## लघुकथा संग्रह

## सुधीर कारखानीस

# गगन भरारी

**लेखक: सुधीर कारखानीस**

ए 902 एकता मेडोज

सिद्धार्थ नगर, मागाठणे

बोरीवली ईस्ट, मुंबई 400066

मोबाइल 9223298186

ई मेल sudhirkarkhanis@yahoo.com

## मुखपृष्ठ- सुधीर कारखानीस

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक:

ई साहित्य प्रतिष्ठान

ईलेवन्थ फ़्लोअर,

ईटर्निटी,

ईस्टर्न एक्स्प्रेस हायवे, ठाणे

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

(विनामूल्य पुस्तके मिळवण्यासाठी आपले नाव आणि गाव Whatsapp करा)

प्रकाशन : ५ जानेवारी २०२४

©esahity Pratishthan®2024

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## लेखक परिचय :



# सुधीर कारखानीस

शिक्षण व अनुभव

शालेय शिक्षण एच डी हायस्कूल सोलापूर

एंजिनीरिंग ग्रॅजुएट पुना एंजिनीरिंग कॉलेज, पुणे, महाराष्ट्र

पावर सेक्टर मध्ये सुमारे 50 वर्षांचा उच्च पदस्थ अनुभव

टाटा पावर कंपनी, एल अँड टी, महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

लेखन

अनेक तंत्रज्ञानविषयक पेपर व दोन तंत्रज्ञानविषयक पुस्तके प्रकाशित

मराठी लघुकथा संग्रह “प्रतिबिंब” व “तरंग” प्रकाशित

स्टोरी मिरर मध्ये नियमित ललित कथा लेखन

लघुकथामध्ये शहरी शिक्षित मध्यम वर्गाच्या जीवनाचे आणि तसेच विदेशात राहणाऱ्या भारतीयांच्या जीवनचर्येचेही दर्शन.

# अर्पणपत्र

मोठ्या धैर्याने आणि हसतमुखाने गगन भरारी घेऊन  परदेशात
पोहोचलेल्या आणि तेथे उच्च शिक्षण घेऊन गेली अनेक वर्षे
आपआपल्या व्यवसायात अत्यंत यशस्वी रीतीने कार्यरत असलेल्या
माझ्या दोन कन्या,
सौ मीनल व सौ तेजल
यांना हा लघुकथा संग्रह सहर्ष अर्पण

# लेखकाचे मनोगत - कथांबद्दल थोडे काही

या संग्रहातील कथा अनिवासी भारतियांना समर्पित आहेत. स्थूल मानाने, भारताबाहेर फायनान्शियल वर्षाचा अधिकांश काळ राहणाऱ्या भारतीयांना अनिवासी भारतीय (एन आर आय –नॉन रेसिडेंट इंडियन्स) म्हणतात. भारतात जन्मलेले, वाढलेले, भारतात शिक्षण, उच्च शिक्षण घेतलेले पण त्यानंतर, अति उच्च शिक्षण घेण्याच्या निमित्ताने तसेच नोकरीच्या किंवा बिजिनेसच्या निमित्ताने भारत सोडून, एक मोठी गगन भरारी घेऊन परदेशी पोहोचलेले, तेथे धैर्याने मोठ्या कालावधीसाठी स्थायिक झालेले अनिवासी भारतीय लहान मोठ्या समुदायाने जगाच्या पाठीवर बहुतेक सर्व देशांत दिसतात. ज्या देशात त्यांचा निवास असेल त्या देशाच्या नियमांनुसार त्याना स्थलांतर व्हीसा वा अस्थलांतर व्हीसा मिळालेला असतो, वर्क परमिट, पर्मनंट रेसिडेन्स परमिट असते किंवा तेथील नागरिकत्वही त्यांनी घेतलेले असते.

आंतरराष्ट्रीय आव्हाने झेलत, तीव्र चढाओढीला तोंड देत ही मंडळी मोठ्या ईर्षेने परदेशांत राहतात, जीवनसंघर्षाला तोंड देत देत मोठे होतात, पैसे कमावतात आणि महत्वाची गोष्ट म्हणजे आपल्या भारतीयत्वाची चाड बाळगून असतात. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी अशा भारताच्या तुलनेने उच्च जीवनमान असणाऱ्या देशात राहणाऱ्या अनिवासी भारतीयांचे जीवनमान सामान्य भारतीयांच्या तुलनेने बरेच श्रीमंती दर्जाचे असते. त्या झगमगटानेच प्रभावित होऊन, अनिवासी भारतीयांनी त्या स्थानापर्यंत पोहोचण्यासाठी घेतलेले श्रम त्यांच्या भारतातल्या बांधवाना दिसतही नाहीत आणि दुरून डोंगर फारच साजरे गोजिरे वाटतात. मुलांचे शाळेबाबतचे प्रश्न,

आजारपणं, ऑफिस पॉलिटिक्स यासारखे आपल्याला जाचणारे प्रश्न त्यांनाही असू शकतात याकडे दुर्लक्ष होते. पण आपल्या अनिवासी बांधवांवर आपण केलेला हा अन्याय आहे. माझ्या अनिवासी नातेवाईकांसमवेत त्यांच्या घरी राहण्याची, त्यांच्या इतर अनिवासी मित्रमंडळींबरोबर मिसळण्याची, त्यांच्याबरोबर वार्तालाप करण्याची संधी मला अनेकदा मिळाली. त्यांच्या बरोबर जीवनाच्या छोट्या मोठ्या चढ उतारांमधे त्याना साथ देण्याचे भाग्यही लाभले. आणि अशा वेगवेगळ्या प्रसंगात टिपलेल्या स्मृतिकणांच्या आधारानेच या चटकदार लघुकथा निर्माण झाल्या आहेत.

या संग्रहातील सहा लघुकथा पैकी पहिल्या चार लघुकथांचे, (‘‘काहूर’’, ‘‘तो एक क्षण’’, ‘‘झंझावात’’, ‘‘योगाभ्यास’’) नाट्य अमेरिकेतल्या डल्लास (टेक्सास) जवळच्या एका उपनगरात घडलेले दिसेल. शेवटच्या दोन कथांचे (‘‘सर्वे भवंतू सुखिन:’’, ‘‘समझोता की समजूतदारपणा’’) नाट्य कॅलिफोर्निया मधल्या सान फ्रान्सिस्कोच्या परिसरात घडलेले दिसेल.

एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की आपली मुख्य पात्रे जरी परदेशात राहात असली तरी त्यांची भारताशी नाळ तुटलेली नाही. त्यांचे जन्मदाते, नातेवाईक, मित्र मंडळी भारतात आहेत, त्यांच्या सदैव संपर्कात आहेत. आपले भारतीय संबंधी आणि त्याच बरोबर परदेशातील मित्र मंडळी, सहकारी, अधिकारी वर्ग यांच्याशी नात्यांचा तोल सांभाळत राहणे, जीवनाची गाडी सदैव विजयाच्या मार्गावरच हाकणे, आपली गगन भरारी सार्थकी लावणे यातच आपल्या अनिवासी भारतीयांचे खरे यश आहे.

--सुधीर कारखानीस
(लेखक)

# प्रस्तावना

"गगन भरारी" हा श्री सुधीर कारखानीस यांचा तिसरा लघुकथा संग्रह आहे. या आधी त्यांचे, "प्रतिबिंब" आणि "तरंग" (ई बुक ), असे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले आहेत. "तरंग" कथासंग्रहाला वाचकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे, आणि "गगनभरारी"चे ही यथोचित स्वागत होईल यात मला संशय नाही.

श्री कारखानीस स्वत: इंजिनियर असूनही त्यांनी ललित लेखनाचा छंदही जोपासलेला आहे याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन.

या कथासंग्रहाच्या सुरुवातीचे "लेखकाचे मनोगत" वाचल्यावर लघुकथांच्या स्वरूपाची कल्पना येते. हल्लीच्या काळात अनेक भारतीय परदेश प्रवास करतात. प्रवास वर्णने लिहितात. पण तेथील अनुभव, तेथे केलेली जीवनक्रमाची निरिक्षणे कथारुपाने शब्दबध्द करण्याचा लेखकाचा उपक्रम स्तुत्य आहे. या कथा वाचताना वाचक मनोमन गगन भरारी घेऊन पैलतीरावर पोहोचतो आणि तेथील अनिवासी भारतीयांच्या भावनांशी, त्यांच्या सुख दु:खाशी एकरूप होऊन जातो. हे वातावरण यशस्वी रीतीने निर्माण केल्याबद्दल लेखकाचे अभिनंदन.

उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला गेलेल्या माझ्या दोन मुलांना भेटण्यासाठी मी अमेरिकेस भेट दिली आहे, तेथील जीवन जवळून पाहिले आहे, अनुभवले आहे, त्यामुळे या कथा मला खूप भावल्या.

अमेरिकेत गेलेल्या, वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करणाऱ्या अनिवासी भारतीयांच्या विषयी, त्यांच्या जीवनात उद्भवलेल्या वेगवेगळ्या प्रश्नांशी निगडीत या सहा लघुकथा आहेत. अमेरीकेत वास्तव्य असलेले अनिवासी भारतीय जवळपास राहणाऱ्या देशबांधवांशी आवर्जून ओळख करून घेतात, एकमेकांच्या संपर्कात राहतात. त्याचेच रूपांतर दाट मैत्रीतही होते. एरवी आठवड्याचे दिवस

सर्वजण आपापल्या कामात व्यग्र असतात पण वीकएन्डला आवर्जून भेटतात. मजा करतात, सुख दु:खाच्या गोष्टी करतात. त्यांच्या या जीवनक्रमात उद्भवणारे नाट्यमय प्रसंग, गुंतागुंत, उकल या सहा लघुकथांद्वारे लेखकाने मांडले आहेत.

पहिल्या "काहूर" या कथेमधे, टेक्सासच्या उपनगरात राहणाऱ्या ३-४ जणांच्या मित्रमंडळाचा जीवनक्रम आणि त्यातील एकाच्या जीवनात उठलेले वादळ, त्याच्या मनातले काहूर यांची मांडणी लेखकाने आपल्या ओघवत्या भाषेत आकर्षक पणे केली आहे.

"तो एक क्षण" ही कथा मायदेशात अपूर्ण राहिलेली प्रेमकथा परदेशात पुढे चालू करण्याच्या प्रकाश रानडेच्या प्रयत्नांबद्दल आणि त्यातून उभ्या राहिलेल्या नाट्यमय घडामोडीवर उभारली आहे.

"झंझावात" या लघुकथेमधे एकाच कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीच्या मनावर असलेले वेगवेगळया प्रकारचे तणाव कसे असतात ते योग्य प्रकारे व्यक्त केले आहे. या सर्व तणावांचा घरच्या गृहिणीवर कसा परिणाम होतो आणि देवावरच्या श्रध्देमुळे शेवटी तिचे जीवन कसे तणावमुक्त होते ते नाट्यपूर्ण रीतीने दाखवले आहे.

"योगाभ्यास" या कथेमधे भारतीय योगाभ्यासाला अमेरिकेत कसा मान आहे हे दाखवून दिले आहे. योगाभ्यासाचे बाजारीकरण न होऊ देण्याची भारतीय योगशिक्षकाची उत्कट इच्छा अभिमानास्पद आहे.

"सर्वे भवन्तु सुखिन:" ही अमेरिकेत रिअल इस्टेट एजंट चे काम करणाऱ्या भारतीय अनिवासी गृहिणीची कथा आहे. आपले काम करत असताना कुटुंबातील इतर सदस्यांचे प्रश्नही सोडवण्याचे तिचे कौशल्य प्रेरणादायी आहे.

"समझोता की समंजसपणा" या कथेत "लिव् इन रिलेशनशिप" च्या प्रश्ना विषयी वास्तव दर्शन घडते. पण या रिलेशनशिपमधे राहणाऱ्या मुलाचे पालक मागच्या पिढीतले असल्यामुळे ही संकल्पना त्यांच्या पचनी पडत नाही आणि संमजसपणाची परिसीमा गाठूनही शेवटी "कालाय तस्मै नम:" असे त्यांना म्हणावे लागते.

या सर्व लघुकथांमधून दिसणाऱ्या श्री सुधीर कारखानीस यांच्या सृजनशीलतेचे आणि कल्पकतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. असेच लेखन त्यांच्याकडून यापुढेही होत राहो ही सदिच्छा.

सौ. पद्मा कऱ्हाडे, मुंबई
( जेष्ठ साहित्यिक व समीक्षक )

# अनुक्रमणिका


| क्रमांक | शीर्षक | पृष्ठ क्र |
|---|---|---|
| १ | काहूर | १ |
| २ | तो एक क्षण | १४ |
| ३ | झंझावात | ३२ |
| ४ | योगाभ्यास | ४८ |
| ५ | सर्वे भवंतू सुखिन: | ६७ |
| ६ | समझोता की समंजसपणा | ८६ |

# १
# काहूर

ही कथा आहे अमेरिकेतल्या, डल्लास (टेक्सास) च्या एका उपनगरातली.

स्थळ आहे, तेथील विस्तीर्ण पार्कच्या शेडमधल्या बाकड्यांचा समूह.

"चला, मेडिटेशनची सुरुवात ओमकाराने करुया". बाकड्यावर बसलेल्या छोट्याशा ग्रुपला उद्देशून कमलाप्रसाद म्हणाले. कमलाप्रसादांनी स्वतः ओमकाराची पोज घेतली आणि बाकीच्या तिघांनी ताबडतोब त्यांचं अनुकरण केलं. ओमकाराचा गंभीर नाद भारत भूमीपासून हजारो किलो मीटर दूर असलेल्या त्या छोट्याश्या शेडमधे घुमू लागला.

कमलाप्रसाद, सुनिल मित्तल, संदीप नंदा आणि राजू देशपांडे, यांचा, म्हटलं तर जरा ओढुन ताणुनच एकत्र आलेला हा ग्रुप होता. भारतातल्या वेगवेगळ्या ठिकाणांहून इतक्या दूर टेक्सासच्या एका शहरात ही मंडळी स्थाइक झाली होती आणि वीक एन्डला सकाळी लवकर उठून पार्कमधे फिरायला जाण्याच्या आरोग्यदाई सवईतून या चौघांची प्रथम ओळख आणि मग दाट मैत्री झाली होती. शनिवार रविवार आणि सुट्टीच्या दिवशी सकाळी साडे सातच्या सुमारास पार्कमधे ही चौकडी जमायची. तलावाला दोन चकरा मारायच्या आणि मग त्या काठच्या छोट्या शेडमधे आसनस्थ होऊन ओमकार नाद, मेडिटेशन, गायत्री मंत्र, मृत्युंजय मंत्र वगैरे यथाशक्ती उपासना आणि काही योग एक्सरसाईज करायचे असा त्यांचा रोजचा

परिपाठ होता. मोहन किरमानी, कृष्णा शहा, केतन गांधी वगैरे मित्र अधुन मधून जॉइन व्हायचे खरे पण या चौकडीचा वीक एन्ड नियमितपणा आणि त्यांची शिस्तबध्दता इतर कुणालाच झेपायची नाही.

मेडिटेशन झालं, एक्सरसाइज झाले. शेवटी सूर्याला आणि भूमीला वंदन केल्यानंतर मंडळी दिलखुलासपणे गप्पा टप्पा करायला मोकळी झाली. सर्वांनाच सुट्टी असल्यामुळे ही मित्रमंडळी मोकाट सुटायची आणि या नंतरच्या अर्ध्या तासात त्या छोट्या शेडमधे हास्य विनोदाचे इतके उंच उंच फवारे उडायचे की शेजारच्या तलावातला कारंजाही कधी कधी स्तिमित व्हायचा. संदीप नंदाच्या एकेक भन्नाट असत्यकथा सुनिल मित्तलच्या सरकारी नोकरीतल्या सुरस सत्यकथांच्या तोडीस तोड असायच्या .

"संदीप भाई," मोजे-बूट पायात सरकवता सरकवता सुनिल मित्तल संदीप नंदाना उद्देशून म्हणाले, "मागच्या रविवारी मुंबईच्या त्या लाचखाऊ कस्टम ऑफिसरची गोष्ट अर्धवटच राहिली होती."

"अरे हो", म्हणून संदीप नंदानी पुढचा भाग सांगायला तोंड उघडलं आणि सगळेजण बाकावर बसून उत्सुकतेने त्यांच्याकडे मोहरे फिरवून बसले. गोष्ट सुरू झाली आणि रंगातही आली. कस्टम ऑफिसर आता रंगे हाथ पकडला जाणार, तेवढ्यात व्यत्यय आला. नेहमीच्या सवयी प्रमाणे आरडाओरडा करत कृष्णा शहा तेथे शेडमधे बाकाजवळ येऊन टपकले. एरवी त्याना दटावत हाताच्या इशाऱ्यानी सगळ्यानीच गप्प केलं असतं पण आज त्यांच्या बरोबर कोणी नवाच भारतीय इसम होता. तिऱ्हाइता समोर असभ्यता कशी दाखवायची ! संदीप नंदाची गोष्ट तिथेच थांबली.

कृष्णा शहा बसले.  तो नवा देसी इसमही बसला. कृष्णा शहा नी ओळख करून दिली.  "हे डॉक्टर शरण. प्रोफेसर आहेत ते, रूरल इकॉनॉमिक्सचे".
सर्वांनी कौतुकाने माना डोलावल्या. हे काही औषधपाण्याचे डॉक्टर नाहीत एवढे सर्व मंडळींच्या लक्षात आले. "ईथल्या युनिव्हर्सिटी कॉलेज मधे व्हिजिटिंग फॅकल्टी म्हणून तीन महिन्यासाठी आले आहेत." कृष्णा शहाने ओळख करून देण्याचे आपले कर्तव्य पुरे केले.

गप्पा टप्पा, हास्य विनोद परत सुरू झाले. पण त्यात तेवढा जोर नव्हता. नवखा मनुष्य ग्रुपमध्ये आल्याने सर्वांनाच जरा अवघडल्या सारखे वाटत होते. डॉक्टर शरण सुध्दा  संदीप नंदाच्या आणि कृष्णा शहाच्या पाचकळ विनोदांना केवळ हलक्याशा स्मित हास्याने दाद देत होते.  लवकरच मंडळी उठली. आपापल्या घरच्या चहा कॉफीची ओढ सगळयानाच मनोमन लागली होती.

हस्तांदोलनं झाली.

"तुम्हाला इन्टरेस्ट असेल तर या उद्या सकाळी साडे  सातला, आमच्या बरोबर मेडिटेशन आणि योगिक एक्सरसाइज करायला".  राजू देशपांडेनी डॉक्टर शरणला औपचारिकपणे आमंत्रण दिले.

"साडे सातला का ? मी जरूर येईन". एका झटक्यात डॉक्टर शरणनं निमंत्रण स्वीकारलं.

राजू देशपांडेचा मराठी संशयात्मा या तडकाफडकी आमंत्रण स्वीकारण्याने जरा चमकलाच.

"अनोळखी माणसाला दूर ठेवायला पाहिजे होतं", अशी एक विचारांची पाल मनात चुकचुकून गेली.

पार्कच्या बाहेर पडल्यावर तीन गट तीन दिशांना लागले. राजू देशपांडे आणि संदीप नंदा एकमेकाचे शेजारी. बोलत बोलत, फुटपाथ वर चालत दोघं कॅन्यन रोडला वळले. मिलर क्रीकच्या वाटेला लागल्यावर उशिराने वॉकला निघालेली ओळखीची मंडळी भेटायला लागली आणि त्यांना हॅलो करत, एकमेकांशी कॅजुअल गप्पा मारत दहा पंधरा मिनिटात दोघंही घरापर्यंत पोहोचले. संदीप नंदाला "बाय" करून राजू देशपांडे घरात शिरला.

शनिवारचा दिवस. साडे नऊ ची वेळ. घरात बऱ्यापैकी उठाउठ झाली होती. वसुधा च्या बँकेला सुट्टी असल्यामुळे फॅमिलीसाठी सन्डे ब्रेकफास्ट बनवण्याच्या प्रयत्नात ती होती. जय आणि विजय मागच्या लॉनवर बास्केटबॉल खेळत होते. राजू देशपांडेने टेबलवर झाकून ठेवलेला कॉफीचा ग्लास उचलला आणि गरम करायला मायक्रोमधे ठेवला. राजू घरात आल्याची चाहूल लागताच बास्केटबॉल तिथेच सोडून जय आणि विजय आत आले आणि "हे डॅड", करत सोफावर त्याच्या दोन्ही बाजूला बसले. मग दिवसाभराच्या ॲक्टिव्हिटिजचं प्लॅनिंग सुरू झालं.

दोघंही भाऊ अगदी मातृमुखी. विजय पेक्षा जय चांगला दिड एक वर्षांनी मोठा पण वागण्यातून जास्त बालिश. लाडे लाडे बोलणं वागणं अजूनही लहानासारखं. जयच्यावेळी, सातवा महिना लागता लागता वसुधा माहेरी गेली होती आणि लगेचच जय जन्मला होता. प्रिमॅच्युअर जन्मलेला असला तरी त्याच्यात सुदैवाने काही विकृती नव्हती. तरीपण सावधगिरी म्हणून बाळंतपणानंतर वसूधा चांगली सहा महिने माहेरी राहिली होती आणि तिथेच सगळं बिघडलं होतं. आजोळच्या लाडांनी थोड्या प्रमाणात हट्टी झालेल्या जयला चुचकारता चुचकारता नाकी नऊ यायचे. पुढे विजयचा जन्म झाल्यावर प्रकरण जास्तच नाजुक झालं. विजय खूपच शांत आणि समजुतदार होता. बऱ्याच प्रसंगी, रडणाऱ्या जय दादाला

आपणहून आपलं खेळणं देऊन छोटु विजयने शांत केलं होतं. राजू देशपांडे स्वतः लहानपणापासून शांत स्वभावाचा होता. हट्ट करणे, आक्रस्ताळेपणा त्याला माहितच नव्हता. त्यामुळे जयच्या हट्टी स्वभावाचं त्याला आश्चर्य वाटायचं.

असा हा जय लाडोबा त्याच्या डॅडीच्या उजवीकडे आणि विजय डावीकडे बसून दिवसाभराच्या आपापल्या ॲक्टिव्हिटी प्रोग्रॅम साठी कॅनव्हासिंग करत होते. वसुधा बशांनी भरलेला ट्रे घेऊन आली. भुकेल्या सैन्याला रसद मिळाली आणि मग हळूहळू तिढा आपोआपच सुटत गेला. मग रात्रीच्या डिनरबद्दल प्लॅनिंग सुरू झालं. देशपांडे कुटुंबाचा, महिन्यातल्या पहिल्या शनिवारी रात्री पटवर्धन कुटुंबाबरोबर एकत्र जेवण्याचा कार्यक्रम गेली कित्येक वर्षं अबाधित चालू होता. पटवर्धन कुटुंब जवळच इन्डिपेन्डन्स ॲव्हेन्यूवर रहायचे. राजू देशपांडे आणि अशोक पटवर्धन समव्यवसाइक असल्यामुळे जिगरी दोस्त होते आणि तसंच, किंबहुना जास्तच, वसुधा आणि वशिष्ठीची दृढ मैत्री होती. वसुधा आणि वशिष्ठी कॉलेज मधल्या मैत्रिणी. सोलापूरच्या कॉलेज मधून इकॉनॉमिक्स मेजर विषय घेऊन पदवी घेतल्यानंतर मुंबईला मॅनेजमेंटचा कोर्सही दोघींनी बरोबर केला होता.

अशोक आणि वशिष्ठी पटवर्धन ची मुलं शलाका आणि किरण. अशोक आणि वशिष्ठी प्रमाणेच किरण गोरागोमटा आणि सगळयांबरोबर मिळुन मिसळून वागणारा होता. शलाका जरा सावळीच आणि स्वभावाने सुरुवातीला तरी जरा संकोची आणि अबोल. यामुळे त्या कुटुंबात शलाका जरा वेगळीच वाटायची. राजू देशपांडे अशोकला बऱ्याचदा विनोदाने म्हणत असे, "गड्या, आपली दोघांचीही पहिली अपत्ये जरा वेगळीच आहेत". अशोक नेहमीच त्यावर काहीतरी विनोदी उत्तर देऊन गोष्ट हसण्यावारी नेत असे.

"डॅड, आज इटालियन रेस्टॉरंट मधे जायचं ठरवलंय, आठवतंय ?" जय ने आठवण करून दिली.  लगेच पटवर्धनांकडे फोन लावला गेला आणि संध्याकाळी ऑलिव गार्डन इटालियन रेस्टॉरंट मधे सर्वांनी जायचं पक्कं झालं.

शनिवार आनंदात पार पडला. कराटे क्लास, बास्केटबॉल कोचिंग, गणित स्पेशल कोचिंग वगैरे ॲक्टिविटीज साठी मुलांची ने आण करण्याची कामं इकडे राजू-वसुधा नी आणि तिकडे अशोक-वशिष्ठी नी इमाने इतबारे पार पाडली आणि मग संध्याकाळी ऑलिव गार्डन रेस्टॉरंट मधे सगळयांचाच श्रम परिहार झाला.

रविवार उजाडला. सकाळी सव्वा सातला राजू देशपांडे घराबाहेर पडला. गेटच्या बाहेर संदीप नंदा वाट पहातच होता. झरझर चालत पंधरा मिनिटात दोघंही पार्क पर्यंत पोहोचले.  तिकडे शेडमधे कमलाप्रसाद, सुनील मित्तल आणि डॉक्टर शरण त्यांची वाट पहात होते. खरं तर शनिवारी सकाळी पार्क मधून निघाल्यानंतर डॉक्टर शरण दोघांच्याही  मनातून पूर्ण विसरला गेला होता. एकमेकाला हॅलो हॅलो करत सगळयांनी बूट मोजे काढले आणि आपापल्या जागा घेतल्या. कमला प्रसादांच्या नेतृत्वाखाली पुढचा अर्धा तास योगिक एक्सरसाइज आणि मेडिटेशनमधे गेला. प्रसन्न मूडमधे सर्व जण उठले आणि आपापल्या चपला बूट सँडल्समधे पाय सरकवते झाले.

"शरण बाबू, छान सिन्क्रोनाइज केलंत सगळयांबरोबर तुम्ही". कमला प्रसादनी डॉक्टर शरणला उत्स्फूर्तपणे सर्टिफिकेट दिलं. कोणी हसून, कोणी हस्तांदोलन करून, सर्वांनीच वेगवेगळया तऱ्हेने शरण बाबूचे कौतुक केले.

हलक्याफुलक्या गप्पा झाल्या आणि सर्व जण आपापल्या घरांकडे पांगले.

डॉक्टर शरण आता ग्रुपमध्ये बऱ्यापैकी सामावून गेले होते. पुढच्या रविवारी सर्वांबरोबर उत्साहाने तेही सकाळी साडेसातला पार्कमधे हजर झाले. काही योगिक एक्सरसाइजेस मधल्या होणाऱ्या चुकाही त्यानी दाखवून दिल्या.

"डॉक्टर, इंडियात कुठे असता आपण?" संदीप नंदाने बाकावर बसता बसता चौकशी केली.

"मी मुळचा सोलापूरचा पण आता बंगलोर मधे स्थाइक झालोय." डॉक्टर शरणने माहिती पुरवली.

सोलापूर म्हटल्यावर राजू देशपांडेने कान टंवकारले आणि क्षणभरच आपला सोलापूरशी असलेला ऋणानुबंध सांगण्याच्या मोह त्याला झाला. तेवढ्यात त्याच्यामधला जातिवंत मराठी माणूस जागा झाला आणि अर्धवट उघडलेलं तोंड त्याने गपकन् बंद केले.

"राजू, तुझ्या मिसेस आणि अशोक पटवर्धनच्या मिसेस पण सोलापूर की कोल्हापूरच्या आहेत नं?" संदीप नंदा कुजबुजला.

"अं, हो नं". राजू देशपांडे नं अर्धवट उत्तर दिलं.

तिकडे कमला प्रसाद ची शरण बरोबर काही चर्चा चालू होती. त्यामुळे इकडे इतर कोणाचं लक्ष नव्हतं.

"इथे डल्लासला टेक्सास युनिवेर्सिटी बरोबर किती महिन्यांचं कॉन्ट्रॅक्ट?"

संदीपने थोड्या वेळाने परत चौकशी केली.

"तीन महिन्यांचं आहे सुरुवातीला. एक्सटेन्डेबल".

शरणने शांतपणे उत्तर दिलं.

"अरे वा, मग फॅमिली आणायचा विचार असेल तुमचा ", संदीपने विचारलं.

हा प्रश्न डॉक्टर शरणना बहुतेक अपेक्षित असणार.

एक हास्याचा फवारा सोडून ते म्हणाले, "नो, आय ॲम नॉट मॅरीड".

डॉक्टर शरण बरोबरच्या संभाषणाला मग एकदमच खीळ बसली.

तेवढ्यात सुनील मित्तलच्या घरून फोन आला. "घरी जाता जाता मंडळींना चहा प्यायला घेऊन या. सामोसे आणलेत मी एशियन फ्लेवर मधून."

सुनील मित्तलचं घर पार्क पासून पाच मिनिटांच्या अंतरावर होतं आणि एवढं प्रेमाचं आमंत्रण डावलणं शक्यच नव्हतं. सगळयांनी आनंदाने माना डोलावल्या.

सौ मित्तल सर्वांची वाटच पहात होत्या. बाहेरून आणलेल्या सामोश्यांबरोबर बऱ्याच होम मेड सप्लिमेंटरीसुध्दा होत्या, आणि एकामागोमाग एक त्या येतच गेल्या.

मित्तल दंपतीच्या अगत्याने सगळेच सुखावले होते. चहाचा दुसरा कप खाली ठेवता ठेवता संदीपने परत विषय काढलाच.

"डॉक्टर, अनमॅरिड राहण्याचं काही विशेष कारण? नाही आपलं, तुमची हरकत नसेल तर विचारतो".

डॉक्टर शरण जरा हसले. "अहो जुन्या गोष्टी या. कसली हरकत अन् कसलं काय !"

डॉक्टर शरण सांगू लागले. "सोलापूर ला बाळी वेसला आमचं घर होतं आणि माझ्या पोस्ट ग्रॅज्युएशन नंतर दयानंद कॉलेज मधे मला लेक्चररची पोस्ट मिळाली. ॲग्रीकल्चरल इकॉनॉमिक्स मी शिकवत असे आणि घरात प्रायव्हेट क्लासही मी सुरू केला होता. माझी एक सिनियर क्लासमधली स्टुडंट होती, वसु तिचं नाव. आमची चांगलीच गट्टी जमली होती. वसुच्या बाबांना भेटायला मी त्यांच्या घरी गेलो. माझ्याशी ते चांगले बोलले वगैरे पण आमच्या दोघांच्या लग्नाला त्यांनी सपशेल नकार दिला. त्यांना म्हणे त्यांच्या जातीचाच जावई हवा होता. मग

काय अगदीच निरुपाय झाला. वसु काही वडीलांची इच्छा मोडु शकली नाही आणि माझ्यातही एवढी बंडखोरी निभावण्याची ताकद नव्हती. शेवटी आम्ही एकमेकांचा निरोप घेतला. मी नोकरी सोडली, सोलापूरला राम राम ठोकला आणि बंगलोरला कॉलेजमधे जॉब घेतला. पी एच् डी केलं आणि करिअरला वाहून घेतलं."

डॉक्टर शरणनी एक सुस्कारा सोडला. मग हसुन म्हणाले, "आणखी एक सामोसा घेतो हं भाभी", आणि अख्खा सामोसा उचलून तोंडात कोंबला.

राजू देशपांडे अगदी कान देऊन ऐकत होता. डॉक्टर शरणने त्याच्या सोलापूरच्या प्रेयसीचं नाव वसु म्हणून  सांगितल तेव्हा त्याचे हातपाय गळुन गेले. एकदा वाटलं की कॉलर पकडुन शरणला हालवावं आणि विचारावं, "सगळं सगळं काय ते खरं सांग".

धीर करून राजूनं चाचरत विचारलं, "वसुचं पूर्ण नाव काय होतं?"

तेवढ्यात सामोश्यांचा नवा ट्रे आला आणि त्याकडेच सगळ्यांचं लक्ष गेलं. राजूचा प्रश्न तसाच राहिला.

साडे दहा वाजत आले होते. मित्तल कुटुंबाला धन्यवाद देऊन सगळे घरांकडे पांगले.

चालता चालता संदीप नंदाची बडबड चालू होती पण राजूच्या मनात विचारांचं काहूर उठलं होतं. मुख्य प्रॉब्लेम म्हणजे वसु या नावाचा उलगडा झाला नव्हता. राजूची वसुधा आणि पटवर्धनाची वशिष्ठी, दोघीही सोलापूरच्या. वसु म्हणजे वसुधाही होऊ शकतं आणि वशिष्ठीही होऊ शकतं.

दोघीही इकॉनॉमिक्सच्या विद्यार्थीनि आणि त्याच शहरातले डॉक्टर शरण इकॉनॉमिक्सचे शिक्षक.

या वसुबरोबर शरणबाबूची गट्टी किती लेव्हलपर्यंत पोहोचली असेल, कुठच्या थराला गेली असेल आणि ती गट्टी तुटताना एकएक गाठी कशा उकलत गेल्या असतील याचाच विचार करत राजू घरी येऊन पोहोचला.

रविवार असल्याने सगळं आरामात चाललं होतं. जय विजय लॉन मोवर चालू करण्याच्या खटपटीत होते. राजूने त्याना मशिन सुरु करुन दिलं,पटकन् आंघोळ करुन घेतली आणि मग वसुधा बरोबर ग्रोसरी शॉपिंग साठी जायला गाडी काढली.

सकाळीच वसुधाचा इंडिया कॉल झाला होता. त्यामुळे गाडीत राजूला ती बाबांच्या तब्येतीचा अपडेट देत होती.

मधेच राजूने विचारलं, "वसुधा, तुझ्या सोलापूरच्या कॉलेजचं नाव काय गं?"

"माझं कॉलेज ? संगमेश्वर कॉलेज". वसुधा उत्तरली.

"आणि तिथे जवळच दयानंद कॉलेज आहे का ?" राजूचा पुढचा प्रश्न.

"जवळ काही नाही, आमचं संगमेश्वर कॉलेज इकडे सात रस्त्याला आणि दयानंद कॉलेज तिकडे अक्कलकोट रोडला". वसुधाने क्लारिफिकेशन दिलं.

"आणि तुमचं घर बाळी वेसला होतं का?" राजूचा पुढचा प्रश्न.

"अरे नाही रे बाबा, आमचं घर इकडे रेल्वे लाईनला आणि बाळी वेस राहिली तिकडे गावात." वसुधाचं उत्तर.

सोलापूरच्या भुगोलाचं राजूला काहीच ज्ञान नव्हतं, पण या "इकडे ", "तिकडे" वरून दोन्ही कॉलेजं, घरं एकमेकांपासून काहीशा अंतरावर असावी एवढा बोध झाला.

"पण लहान शहरात अंतरं असून असून ती काय असणार?" एक काळा विचार राजूच्या मनात चमकून गेला.

ग्रोसरी झाली. दोघं घरी आले. राजूच्या मनात विचारांचे काहूर माजले होते. विचारांची भणभण, त्यामुळे मधेच होणारी छातीतली धडधड, अगदी सगळी बेचैनी आली होती.

सोमवार आला आणि बेचैनी जास्तच वाढली. डॉक्टर शरणचा चेहरा सारखा  डोळ्यासमोर यायला लागला. त्याच्या लकबींचं कुठे आपल्या जयच्या लकबींशी साम्य दिसतंय की काय हे शोधता शोधता मनात आणखीच कोलाहल माजू लागला. डॉक्टर शरणच्या बाकदार नाकाचं पटवर्धनच्या शलाकाच्या नाकाशी काही साम्य असू शकेल का असेही काही विचार मनात यायला लागले.

शेवटी एकट्याने हे ओझं पेलवणं राजूचा अवघड वाटायला लागलं. पटवर्धनला  फोन करावा, त्याला सगळं सांगुन आणखी काही इन्व्हेस्टिगेशन करावं, डी एन् ए वगैरे टेस्ट कोठे होऊ शकतात हे पहावं असं राजूचा वाटायला लागलं आणि फोनकडे त्याचा हात गेलाही, पण आवरलं त्यानं स्वतःला.

शनिवार उजाडला. सकाळी आपली जड पावलं ओढत ओढत संदीपबरोबर राजू पार्ककडे चालू लागला. ते मेडिटेशन, योगिक एक्सरसाइज, डॉक्टर शरण बरोबर तिथेच बसणं, सगळं सगळं नकोसं वाटायला लागलं.

एक्सरसाइज संपले. गप्पा टप्पा झाल्या. तलावाभोवती राऊंड मारून मंडळी घराकडे निघाली.

तेवढ्यात कमला प्रसाद म्हणाले, "इंडियातून परवाच डॅडी आले आहेत. त्यांना जाता जाता हॅलो करून जा. नुकतेच आजारातून उठलेत ते, बरं वाटेल त्याना."

सर्वांनी मूक संमती दिली आणि बोलत बोलत कमला प्रसादच्या घराकडे निघाले.

कमला प्रसादचं घर जवळ आलं.

लांबूनच घरा समोरच्या लॉनवर कमला प्रसादचे डॅडी बसलेले दिसले. सौ प्रसाद सुध्दा जवळच बसल्या होत्या आणि सासरे बुवाना हवं नको पहात होत्या.

मंडळी येताना पाहून सौ प्रसाद नी डॅडीना हलकेच सुचना दिली आणि डॅडीनी ग्रुपकडे अंदाजानेच नजर वळवली.

तेवढ्यात डॉक्टर शरणनी खिशातला फोन काढुन कानाला लावला आणि इनकमिंग कॉलवर ते बोलू लागले. बेल कोणीच ऐकली नव्हती पण मेडिटेशनच्या वेळी म्यूट केलेले सगळयांचेच फोन आठवण होईपर्यंत व्हायब्रेट वरच रहायचे, त्यातलाच बहुतेक हा प्रकार.

डॉक्टर शरणने, "सॉरी सर, पार विसरलो होतो मी, आलोच पंधरा मिनिटात," असे म्हणून फोन परत खिशात ठेवला.

"कमला प्रसादजी, जायलाच हवं मला. पार विसरून गेलो होतो मी ॲपॉइंटमेंट बद्दल. डॅडीना भेटीन मी उद्या. गुड डे फोक्स". असं त्रोटकपणे बोलून डॉक्टर शरण तिथूनच निघुन गेले.

मंडळी घरा जवळ पोहोचली. कमला प्रसादने सर्वांची ओळख करून दिली. हस्तांदोलनं झाली.

सौ प्रसाद सर्वांनाच आत चलण्याबद्दल आग्रह करत होत्या. डॅडींचाही आग्रह चालला होता. पण आपापल्या घरची शनिवारची कामं सगळयांनाच डोळयासमोर दिसत होती. त्यामुळे मग बाहेरच्या बाहेरच सगळे जाण्यासाठी वळले.

"आणि हो त्या कोपऱ्यावर तुमच्या बरोबर आणखी एक गृहस्थ होते नं?" कमला प्रसादचे डॅडी राजूला विचारत होते. "नीट दिसलं नाही खरं पण क्षणभर माझ्या बॅंकेच्या सोलापूरच्या ब्रॅन्च मधे रामशरण नावाचा एक थापाड्या मॅनेजर होता, त्याचा भास झाला. बऱ्याच लबाड्या केल्या त्याने. तो आणि त्याची असिस्टंट वसुंधरा

नायक, वसु म्हणायचे तिला. काढुन टाकलं मी दोघांनाही. गेले मग कुठेतरी. नंतर रामशरण कर्नाटकात कुणा स्वामीच्या आश्रमात कामाला राहिला, स्वामीजींच्या प्रभावाने तिथे सुधारला, पुढे बराच शिकला, मार्गाला लागला असं ऐकलं खरं. पण तो कुठला इथे यायला बसलाय म्हणा. एकासारखी एक दिसणारी माणसं असू शकतात, पण त्या गृहस्थाना ओझरतं पाहून रामशरणचा भास झाला खरा. एनि वे तुमच्या ग्रुप ला भेटून खूप बरं वाटलं. या परत".

डॅडींच्या हळू बोलण्याकडे कोणाचंच फारसं लक्ष नव्हतं. राजू देशपांडेने मात्र डॅडींचा शब्दन् शब्द टिपला होता. राजूच्या मनांत हळू हळू प्रकाश पडू लागला. शरणच्या अविवाहित रहाण्याचं कारण काही असो. संदीप नंदाच्या प्रश्नांच्या भडिमाराला कंटाळून डॉक्टर शरणने स्वैर आणि त्याच्या दृष्टीने निरुपद्रवी थाप मारलेली दिसत होती. पण तिचा काय परिणाम झाला होता, केवढा मोठा वडवानल पेटवला गेला होता याची त्याला तिळमात्र शंका नसणार. सुदैवच म्हणायचं की कमला प्रसादाचे डॅडी तिथे भेटले आणि त्याहून मोठं सुदैव म्हणजे शरणला ओझरतं पहाताच त्याचा पूर्वेतिहास डॅडींना आठवला, आणि त्यांनी घडाघडा सांगूनही टाकला. डॅडींना मिठी मारण्याची झालेली अनावर इच्छा राजूने दाबली खरी पण त्यांचे दोन्ही हात धरून अगदी दुखेपर्यंत हलवले.

राजूच्या मनातल्या पेटलेल्या वणव्यावर, वादळी पावसाच्या झडी पडुन रानातला वणवा शांत व्हावा असाच काहीसा प्रकार झाला. वसुधा, वशिष्ठी, जय, शलाका सगळ्यांना क्लीन चिट मिळाली. राजूच्या मनातला तो संशयकल्लोळ आणि त्यातून उठलेलं ते काहूर, ती वावटळ, सगळं सगळं शांत झालं.

----x----

# २

## तो एक क्षण

प्रकाश म्हणाला, "नलिनी, मी तुला खूप वर्षांपासुन ओळखतो. आठवतायत का वांगणीच्या स्टार पार्टीज ?"

"मला वाटलंच होतं प्रकाश, तुला स्टार पार्टीचे दिवस आठवतील म्हणून." नलिनी म्हणाली.

"एक फरक आहे नलिनी", प्रकाश म्हणाला, "तू मला अगदी नावाने, चेहऱ्याने ओळखत असशील, पण मी तुला फक्त तुझ्या आवाजाने ओळखत होतो. वांगणीच्या त्या स्टार पार्टीच्या गडद अंधारात तुझा चेहराही कधी मला दिसला नाही आणि नावही कधी कळलं नाही."

टेक्सास मधल्या डल्लासच्या एका उपशहरात माधव आणि नलिनी बेडेकरांच्या घरी, हजारो मैल दूर असलेल्या भारतातल्या वांगणी गावाची आठवण निघायला कारणही तसं होतं.

मुंबईच्या झगझगाटापासून थोडं दूर, कर्जतजवळचं, निसर्गाच्या कुशीत अंधारात झोपलेलं, शांत, फारसं कोणाच्या गणतीत नसलेलं वांगणी गाव. आणि म्हणूनच, मुंबईच्या खगोल निरिक्षण मंडळाला स्टार पार्टीज साठी ते अगदी योग्य ठिकाण वाटलं होतं.

सप्टेंबरच्या शेवटी शेवटी भारतातला मॉन्सून सीझन संपतो. ऑक्टोबर महिना आला की भारतात बहुतेक ठिकाणी आभाळ साफ व्हायला लागतं, ढगांचं पटल विरळ व्हायला लागतं.

रात्रीच्या वेळी, ज्या ठिकाणी रस्त्यावरच्या दिव्यांमुळे, येणाऱ्या जाणाऱ्या गाड्यांच्या हेडलाइटस् मुळे होणारा प्रकाशाचा झगझगाट, प्रकाशाचं प्रदूषण कमी असतं अशा ठिकाणांहून आकाशातले ग्रह, तारे, नक्षत्र दिसायला लागतात. ज्याना ग्रह नक्षत्रांची थोडीफार, जुजुबी का होईना माहिती असते ते महाभाग आपल्या मित्रमंडळीना, आप्तेष्टाना अगदी मानेला रग लागेपर्यंत आकाशाकडे माना उंचावायला लावतात, दृष्य आणि अदृष्य तारे, नक्षत्रे बघायला लावतात, त्यांची जमेल तशी नावं सांगतात.

व्यावसायिक आणि हौशी खगोल निरिक्षकही जागे होतात. कामाला लागतात. कोणी रात्री नुसतेच एकटक आभाळाकडे बघतात, कोणी डोळ्यांना, दुर्बिणी, टेलिस्कोप लावतात. आपल्या आपल्या परीने विश्वाचा थांग लावण्याचा यत्न करतात.

अशा सीझनमधे दर आमावास्येच्या जवळच्या शनिवारी जगातल्या जवळजवळ सर्वच देशात, त्या त्या देशातल्या हौशी खगोल निरिक्षक मंडळांचा, खगोल असोसिएशनस् चा, स्टार पार्टीज भरवण्याचा प्रघात आहे.

मुंबईच्याजवळ वांगणी गावानजीक मुंबई स्थित खगोल निरिक्षण मंडळ अशाच स्टार पार्टीज भरवत असतं. सप्टेंबर ते जानेवारी महिन्यांमधे आमावास्येच्या आसपास भरणाऱ्या या स्टार पार्टीज हौशी खगोल व्यासंगी वर्तुळात खूपच प्रसिद्ध आहेत.

वर्षभर या कार्यक्रमाची आतुरतेने वाट पहात असलेले दिडशे दोनशे हौशी खगोल अभ्यासक आमावास्येच्या किर्र अंधारात वांगणी जवळच्या त्या पटांगणात जमतात आपापल्या सतरंजी वर पहुडून, तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आकाशदर्शन करतात. तिथे असलेल्या  दोन तीन टेलिस्कोपसमोर शांतपणे रांगा लावतात. एक तासाच्या डिनर ब्रेक मधे प्रकाश प्रदुषणाबाबत संयम बाळगून जेवणखाण आटोपतात आणि चाचपडत आपापल्या सतरंजीवर पुन्हा  येऊन बसतात.

पहाटे चारच्या सुमारास हा सोहळा आटपता घेतला जातो. सगळेजण धुरळा न उडवता, आवाज न करता उठतात आणि पहिली लोकल पकडायला पटापटा पांगतात.

प्रकाशला शाळेत असल्यापासून खगोल शास्त्राविषयी खूपच आत्मियता होती. क्रमिक पुस्तकांबरोबरच या विषयावर अवांतर वाचन करून, खगोलशास्त्राविषयी खूपच माहिती त्याने गोळा केली होती. देशोदेशीच्या तज्ञांची मुंबई मधल्या वेगवेगळया व्यासपीठांवरून होणारी भाषणं ऐकायला तो आवर्जून जात असे.

खगोल  निरिक्षण मंडळाने आयोजित केलेल्या सगळया कार्यक्रमांमधे तो स्वयंसेवक म्हणून निष्ठेने काम करत असे.

सप्टेंबर ऑक्टोबर महिन्यांपासून होणाऱ्या वांगणीच्या स्टार पार्टीच्या वेळी तर प्रकाश खूपच काम अंगावर घेत असे. टेलिस्कोप सेट अप करणे. रांगेने येत असलेल्या हौशी इच्छुकांना फोकस केलेल्या आकाशस्थ गोलकाची माहिती सांगणे, एक ना दोन. कामांची कमतरता तर नव्हतीच. कधी कधी खगोलशास्त्राच्या निगडीत विषयावर भाषण द्यायला तज्ञ व्यक्ती येत असे तर कधी प्रकाश किंवा मंडळातलेच इतर अभ्यासक एखाद्या चटकदार विषयावर भाषण देत असत अथवा

प्रेझेंटेशन करत असत. आणि मग प्रश्नोत्तरांच्या वेळामध्ये त्या मिट्ट अंधारातून प्रश्नांचा भडिमार. काही प्रश्न, जाणकार हुशार श्रोत्यांकडून तर काही अगदीच साधारण.

पण त्या सर्वांमधेही अंधारातून येणाऱ्या एका मंजूळ आवाजात विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची प्रकाश आतूरतेने वाट पहात असे, अगदी सविस्तर उत्तर देत असे. प्रश्नकर्त्या व्यक्तीला त्या अंधारात प्रकाश कधीच पाहू शकला नव्हता आणि त्या दोन वर्षात ती व्यक्तीही कधी समोर आली नव्हती. तिसऱ्या वर्षी मात्र प्रकाशची निराशा झाली. त्या वर्षी काय, त्या पुढे कधीही तो मंजूळ आवाज स्टारपार्टीमधे ऐकू आला नाही.

पाच वर्षे निघून गेली. भारतातल्या इंजिनियरींग डिग्री नंतर प्रकाश उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. पुढचं शिक्षण झाल्यावर त्याला तिथे नोकरीही मिळाली. घर घेतलं. मित्रमंडळीचा कंपू झाला. वीक एन्डला भेटीगाठी, सहली होऊ लागल्या. आणि अचानक एका अशाच वीक एन्डला रमेशच्या घरी आयोजित केलेल्या पार्टीमधे तो आवाज प्रकाशला ऐकू आला.

"प्रकाश, हा माधव, माझा कलीग आणि ही नलिनी, हिज बेटर हाफ." रमेश ने ओळख करून दिली. "आणि हा प्रकाश रानडे".

सर्वांनी हॅलो हॅलो म्हटलं.

नलिनी ने विचारलं, "इथे प्लेनोमधेच राहता का तुम्ही? "

"नाही, पुढे फ्रिस्कोमधे घर आहे माझं. अबाउट फाइव माइल्स फ्रॉम हिअर." प्रकाशने उत्तर दिलं.

मग माधवशी थोडी औपचारिक प्रश्नोत्तरं झाली. माधव मुंबईचा रहिवासी पण प्रकाश प्रमाणे त्यानेही इंजिनियरींग शिक्षण पुण्यात घेतलं होतं, कॉलेज मात्र वेगळं. कॉमन फॅक्टर निघाले. गप्पा बऱ्यापैकी रंगल्या.

"मुंबई मधे कुठे आहे घर?" माधवने प्रकाशला विचारले.

"वरसोव्याला लोखंडवाला मधे. माझे आई वडील राहतात भावाबरोबर". प्रकाशने उत्तर दिले.

पूर्वी आम्ही सगळे ग्रांटरोडला रहायचे, ही अधिक माहिती पुरवण्याची प्रकाशला गरज वाटली नाही.

"पुढच्या शनिवारी आमच्याकडे पार्टी आहे. जरूर ये तू", माधवने आमंत्रण दिले.

"अगदी जरूर या. इथे प्लेनोलाच आम्ही राहतो, डेविस लायब्ररीच्या जवळ." नलिनी म्हणाली, "माधव तुम्हाला टेक्स्ट करेल एक्झॅक्ट ॲड्रेस".

माधव आणि नलिनीना इतर मित्रमंडळी भेटली.

प्रकाश तिथेच उभा राहिला. आणखीही काही ओळखी झाल्या.

प्रकाशने जेवण घेतलं आणि एक खुर्ची पकडली. जवळच माधव आणि नलिनी उभे होते. दुसऱ्या कोणा ओळखीच्या दांपत्याबरोबर गप्पा मारत होते. माधवचं गडगडाटी हसणं आणि नलिनीचं बोलणं कानावर येत होतं.

नलिनीचं बोलणं, नलिनीचा आवाज. नलिनीचा आवाज. ..... आणि मग एकदम लख्खं प्रकाश पडला. "हा तर वांगणीचा मिट्ट काळोखातला मंजूळ आवाज!"

प्रकाशला काही सुचेना. शांतपणे तो सोफावर बसून राहिला. नलिनीचा आवाज साखरेच्या पाकासारखा डोक्यात घोळवत राहिला.

थोड्या वेळाने प्रकाश उठला. बशी ठेवली. हात धुतले. माधव आणि नलिनी त्याला पलीकडे जरा बाजूला उभे असलेले दिसले. माधवचा चेहरा

लालभडक झाला होता आणि नलिनी त्याला म्हणत होती, "अरे माधव काहीतरी खाऊन घे".

माधव  हातातला ग्लास खाली ठेवायला नाखूश दिसला. अशा परिस्थितीत त्यांच्या जवळ जाऊन नलिनीला जुनी ओळख दाखवणं प्रकाशला प्रशस्त वाटले नाही. पार्टी संपलीच होती.  रमेशचा निरोप घेऊन  प्रकाश बाहेर पडला.

रात्रभर प्रकाशच्या मनात विचार चालू होते. पाच वर्षापूर्वी वांगणीच्या किर्र काळोखात मनाला भुलवून टाकणाऱ्या आवाजाची मालकीण नलिनीच असेल का?

की हे नुसते मनाचेच खेळ होते?  पाच वर्षापूर्वीची हुरहुर  परत मनाला अस्वस्थ करू लागली. त्या मंजूळ  आवाजाच्या मालकिणीला, वांगणीच्या गर्दीने भरलेल्या पटांगणापासून दूर घेऊन जाण्याची, शेताच्या बांधांवर बसून  एकमेकांचे मनोगत जाणून घेण्याची इच्छा, त्यावेळी प्रकाश च्या मनात अपूर्णच राहिली होती आणि तीच आता काहीशा अमूर्त स्वरूपात प्रकट होऊ पहात होती.

आठवडा झाला. माधवचा टेक्स्ट मेसेज आला. पत्ता, फोन नंबर सगळं व्यवस्थित लिहिलेलं होतं. शनिवारी रात्री आठच्या सुमारास प्रकाश  गुगल मॅपला अनुसरून माधवच्या घरी पोहोचला. तीन एसयूवी गाड्या घरासमोर आधीच आलेल्या होत्या. प्रकाशने थोडे पुढे जाऊन आपली करोला रस्त्याच्या कडेला उभी केली आणि मागे येऊन परत एकदा घराचा नंबर पडताळून घेऊन दारावरची बेल वाजवली.

माधवने स्वतःच दार उघडलं आणि हसून प्रकाशचं स्वागत केलं.

प्रकाश इतर समवयस्क पाहुणे मंडळीत सहजपणे मिसळून गेला. गप्पा, हास्य विनोद, गाणी,  सगळयात यथोचित भाग घेऊ लागला. माधव, नलिनी

सगळयांचीच विचारपूस करत होते. नलिनी प्रकाशच्या जवळ आली, दोन औपचारिक शब्द बोलली. प्रकाशला बरं वाटलं.

उशीर होत होता. बऱ्याच जणांनी जेवणाच्या बशा घेतल्या होत्या. माधव त्याच्या दोन मित्रांसोबत पूलजवळच्या टेबलवर बसला होता. सर्वांच्या हातात भरलेले ग्लास होते. उठण्याचं चिह्न दिसत नव्हतं. नलिनी बुफे जेवणाच्या टेबलाजवळ उभी होती. सर्वांना आग्रह करत होती.

"हे पकोडे मी घरी बनवलेत हं". नलिनी प्रकाशला म्हणाली. "अरे वा", पकोडे उचलता उचलता प्रकाश म्हणाला, "मग तर चवदार असणारच".

जवळपास कुणीच नव्हतं.

प्रकाश म्हणाला, "नलिनी, मी तुला खूप वर्षांपासुन ओळखतो. आठवतायत का वांगणीच्या स्टार पार्टीज ?"

"मला वाटलंच होतं प्रकाश, तुला स्टार पार्टीचे दिवस आठवतील म्हणून." नलिनी म्हणाली. "खरं आहे प्रकाश, मीहि तुला खूप वर्षांपासुन ओळखतेय, खरंतर एकेकाळी माझा क्रश होता तुझ्यावर."

"एक फरक आहे नलिनी", प्रकाश म्हणाला, "तू मला अगदी नावाने, चेहऱ्याने ओळखत असशील, पण मी तुला फक्त तुझ्या आवाजाने ओळखत होतो. वांगणीच्या त्या स्टार पार्टीच्या गडद अंधारात तुझा चेहराही कधी मला दिसला नाही आणि नावही कधी कळलं नाही."

आणखी काही मंडळी तिथे टेबलाजवळ आली. प्रकाशला सोडून नलिनी त्या पाहुणेमंडळींकडे लक्ष देऊ लागली.

पार्टी संपली. पाहुणे निघाले. त्यांच्याबरोबरच नलिनी चा निरोप घेऊन प्रकाश निघाला. माधव झोपायला गेला होता पण तिथे जमलेल्या मित्रमंडळीना

माधवची ड्रिन्क घेण्यावर निर्बंध न ठेवण्याची सवय माहिती असल्याने कोणालाही ते वावगे वाटलेले दिसले नाही.

रविवार उजाडला. नलिनी चा गोड आवाज अजूनही प्रकाश च्या कानात घुमत होता. प्रकाशबरोबर तिचं बोलणं, सर्व पाहुण्यांची आस्थेने विचारपूस करणं, सगळंच मंजूळ आवाजातलं. वांगणीच्या त्या रात्रींमधे मनाला छेदून जाणारा आवाज आताही प्रकाशच्या मनाला सतावत होता.

"माझा तुझ्यावर क्रश होता" हे तिचं वाक्य त्याला मोहोरुन टाकत होतं. त्यात काही मेसेज दडलेला आहे की काय, हे तो शोधत होता.

सकाळ पासूनच प्रकाशला वाटत होतं, नलिनीला फोन करावा. तिच्याशी खूप बोलावं. पण त्याने मनाला आवरलं.

संध्याकाळी मात्र प्रकाशने फोन लावलाच.

"हॅलो". माधवचा आवाज.

आपली निराशा प्रकाश ने लपवली.

"माधव, फार सुंदर पार्टी झाली हं काल. फार मेहनत घेतली होती तुम्ही दोघानी". प्रकाश म्हणाला.

"अरे प्रकाश, पण सॉरी तुला गुडनाइट नाही करु शकलो मी काल. झोपच आली एकदम." माधव जरा क्षमायाचनेच्या सुरात बोलत होता. "स्वीट डिश वगैरे घेतलीस नं? कि आधीच निघालास?"

"सगळं घेतलं मी. काळजी करू नकोस. स्वीट डिश झाल्यानंतर सगळेच निघाले. मी आणि रमेश बरोबरच बाहेर पडलो." प्रकाश म्हणाला.

"छान छान. ठीक आहे. भेटू परत." असे म्हणून माधवने फोन ठेवला.

त्या शेवटच्या "छान छान" चा संदर्भ प्रकाश ला लागेना. छान कशाबद्दल? स्वीट डिश घेतल्या बद्दल की रमेश बरोबर निघून गेल्याबद्दल? नक्की उत्तर मिळेना.

पुढचा आठवडा प्रकाशला फारच वाईट गेला. ऑफिसमध्ये काय, घरी काय, सगळीकडे नलिनी समोर दिसायला लागली. बाकी कोणाचा आवाज ऐकू नये असं वाटायला लागलं. रात्रीची इंडिया टीम बरोबरची व्हिडिओ कॉन्फरन्स सुध्दा त्याने झटपट आटोपती घेतली. कित्येकदा नलिनीला फोन करण्याचा मोह होत होता, पण धीर होत नव्हता.

प्रकाश विचार करत होता, नलिनीची पण अशीच स्थिती झाली असेल का? पाच वर्षापूर्वीच्या उमलत्या प्रेमाचं नलिनीच्या अतःकरणात पुनरुज्जीवन झालं असेल की त्याची केव्हाच राखरांगोळी झाली होती, ते कळायला मार्गही नव्हता. नलिनीने ओळख तर दाखवली होती. नुसती ओळख नाही तर तिच्या आठवणीना अजूनही ताजेपणा वाटला होता. तिच्या बोलण्यात प्रकाशला प्रेमाची आर्द्रता जाणवली होती. पण ती जाणीव होती की आभास होता. प्रकाश संभ्रमात पडला होता.

पुढचा वीक एन्ड जवळ आला. रमेश चा फोन आला.

"अरे प्रकाश ", रमेश म्हणाला, "इथून पन्नास मैलांवर, डोंगरात विल्सन फार्म नावाचं हॉलिडे रिसॉर्ट आहे. चार बेडरूम हॉल किचनेट अशी युनिटस् आहेत. त्यातलं एक युनिट या विक एन्ड साठी मी बुक केलंय. आमच्याबरोबर माधव नलिनी येतायत, सतीश सरिता त्यांच्या छोट्या बाळाला घेऊन येतायत. चौथी रूम मोकळी आहे. तेव्हा, तू जॉइन होशील का आमच्या बरोबर ?

प्रकाशला फारसा विचार करावा लागला नाही. असा चान्स सोडायचा म्हणजे काय!

त्याने लगेच होकार दिला.

"आणि हो प्रकाश, आमचा आग्रह नाही, पण तुला पाहिजे तर कोणी मैत्रिण आणू शकतोस तू बरोबर." एवढे बोलून हसत हसत रमेशने फोन खाली ठेवला.

वीक एन्ड आला. रमेशने फोन केला, "प्रकाश तुझी गाडी घेण्याची जरूर नाही. एकटाच आहेस नं, आमच्या गाडीत जागा होईल तुला."

रमेश ची लिफ्ट ची ऑफर प्रकाशने आनंदाने स्वीकारली.

गाड्या रिसॉर्टकडे धावू लागल्या. डोंगरातला वळणे घेत जाणारा रस्ता, वेगळयाच प्रकारच्या झाडांनी भरलेली जंगलं, रंगीत फुलांचा मधुनच दिसणारा बहर पाहून मंडळी खूष होऊन गेली.

विल्सन फार्म एका डोंगराच्या उतरणीवर वसलेलं होतं. दहा बारा आटोपशीर युनिटस् होती आणि खाली जंगलात कँपिंग केबिनस् होती. एक फास्ट फूडची शेड होती आणि अत्यावश्यक वस्तूंचं एक दुकानही होतं.

रमेशने खोल्यांची वाटणी केली. माधवने बीयर बाटल्यांच्या क्रेटस फ्रीजमधे टाकल्या.

दिवस फारच छान गेला. थोडा फेरफटका झाला. दुपारच्या जेवणासाठी बरोबर आणलेले खाद्य पदार्थ किचनेट मधे गरम करून घ्यायचे होते. तिन्ही बायका जेवणाची तयारी करण्यात आणि छोट्या बेबीचं कोडकौतुक करण्यात गुंतल्या. दुपारी प्रकाश विश्रांती साठी बाहेर लावलेल्या हॅमॉक कडे वळला. बाकी मंडळी आपापल्या खोल्यांमधे गेली.

संध्याकाळी फास्ट फुड दुकानातून पिझ्झा, पास्टा वगैरे मागवले होते. बाहेरच लॉनवर टेबलं मांडली गेली. चिकन विंग्ज, चिप्स वगैरे स्टार्टर्स काढले गेले. बीयरच्या बाटल्या फ्रीजमधून बाहेर आल्या. म्युझिक लावलं गेलं. एक संथ शांत

संध्याकाळ सुरु झाली. गप्पा, हास्यविनोदाचे झरे खळखळू लागले. पिझ्झा पास्टाची पार्सलं आली.

माधवचा बियर बाटल्या संपवण्याचा तडाखा चालू होता.

हळूहळू गप्पा, हास्यविनोद मंदावले. काही जण जांभया देऊ लागले. सतीशच्या बाळाने चुळबुळ सुरु केली. मग बाळाला झोपवायला म्हणून सगळ्यांना गुड नाईट करून सतीश सरिता त्यांच्या खोलीकडे निघून गेले.

एक मोठी जांभई देऊन, "फार झोप आली आहे". असं काहीसं पुटपुटत माधव चालायला लागला.

रमेशचं डोकं दुखायला लागलं, त्यामुळे गोळी घ्यायला म्हणून रमेश निघुन गेला.

बाहेर टेबलावर रिकाम्या डिसपोजेबल बशा, डिसपोजेबल ग्लास, पिझ्झा पास्टाचे रिकामे डबे, जेवणातलं उरलंसुरलं खरकटं यांचा बराच ढीग पडला होता. नलिनी, प्रिया आणि प्रकाश कामाला लागले. नलिनीने किचनमधून ग्लोव्हज आणले, तिघांनी हातावर चढवले आणि सराईतपणे कामे करू लागले. ट्रॅश बॅग आणल्या गेल्या. ओला कचरा, सुका कचरा त्या त्या पिशव्या मधे टाकले गेले. भरलेल्या कचरा पिशव्या प्रकाशने उचलल्या आणि हिरव्या, काळ्या डब्यांमधे टाकून दिल्या . पंधरा मिनिटात टेबल स्वच्छ झालं.

नलिनी, प्रिया, प्रकाश हुश्श करून खुर्च्यांवर बसले. एकमेकांकडे पाहून प्रसन्नपणे हसले.

दोनच मिनिटांत प्रिया उठली. "जाते आता, रमेशचं डोकं काय म्हणतंय बघायला पाहिजे." असे म्हणून तिने गुड नाईट केलं आणि आत निघुन गेली.

नलिनी आणि प्रकाश तेथेच बसून राहिले. लॉनवर मंद उजेड होता. इतका वेळ पलीकडे दरीतल्या कँपिंग केबीनकडून ठेक्यात चाललेल्या सामुहिक गाण्यांचा आवाज येत होता. थोड्याच वेळात तो आवाज बंद झाला. शांततेचं साम्राज्य पसरलं. आकाश ताऱ्यांनी भरलं होतं. ग्रह, नक्षत्र, तारे निःशब्द पणे संवाद साधण्याचा प्रयत्न करत होते. कोणालाही मंत्रमुग्ध करेल असं ते वातावरण होतं. शब्दांच्या पलीकडचं ते वातावरण कुठल्याही संभाषणाने प्रदूषित करणं, खरं तर चुकीचंच होतं.

प्रकाशचं मन पेटून निघालं होतं. हाच तो क्षण हीच ती वेळ. असं वाटत होतं, की नलिनीचा हात हातात घ्यावा, दरीच्या कडेला असलेल्या बाकावर बसून दोघांनी मिळून या आनंदाचा आस्वाद घ्यावा. गेल्या पाच वर्षांत मनात दाटलेल्या हुरहुरीला वाट करून द्यावी. एक ना दोन विचार.

प्रकाशने नलिनी कडे पाहिलं.

"नलिनी", हाक ओठाशी आली.

तेवढ्यात..

टेबलावर ठेवलेला प्रकाशचा मोबाईल घुम घुम आवाज करायला लागला. डोळ्यावर आठ्या आणून प्रकाशने मोबाईल कडे आपली नजर फिरवली. मोबाईलच्या डिसप्लेचा लाइट लागला. नाव आलं "आई".

आठ्यांचं जाळं नाहिसं झालं.

प्रकाशने मोबाईल उचलून घेतला आणि "हॅलो" म्हणत तो टेबलपासून दूर पाच सहा पावलं चालत गेला.

"प्रकाश, बाळा कसा आहेस तू? अरे आठवड्याभरात फोन नाही केलास ." प्रकाशची आई मुंबईहून बोलत होती".

"आं, हुं, आपलं हे " प्रकाशला योग्य उत्तर आठवेना.

"बरं ते असू दे" आई म्हणाली. "पुढच्या महिन्यात नक्की येतोयस नं तू? दोन अगदी चांगल्या मुली बघुन ठेवल्यात मी. तुला नक्की आवडतील. तू आल्यावर दोघीतल्या एकीशी फायनल करायचंय आपल्याला. अरे मुलींचे वडील फोन करतायत रोज. अशा चांगल्या मुली पटकन उचलुन घेतात लोक. आपलं स्थळ चांगलं म्हणुन इतके तरी थांबलेत ते."

नकळतच प्रकाश आणखी पाच पावलं सरकला. दरीच्या कडेला बाक होता, त्यावर बैठक मारली.

"आई, हे बघ, मी बाहेर आहे. उद्या घरी गेल्यावर तिकिटाचं बघीन, सोमवारी ऑफिसमध्ये गेल्यावर सुट्टीचं बघीन आणि मग तारीख कळवीन तुला. येईन पुढच्या महिन्यात." प्रकाशने आईला सांगितले.

बाबांच्या प्रकृतीची चौकशी झाली. इतर अवांतर गप्पा झाल्या. मग आईला आठवण झाली की अमेरिकेत रात्रीची वेळ आहे.

"बरीच रात्र झाली असेल, झोप आता बाळा. सोमवार मंगळवार कडे फोन करून नक्की कळव मात्र, तुझ्या इकडे येण्याच्या तारखेबद्दल, म्हणजे तसं सांगता येईल मुलींच्या वडिलांना". इतके बोलून आईने फोन डिस्कनेक्ट केला.

प्रकाशने मोबाईल खिशात ठेवला आणि तो टेबलकडे परत आला.

नलिनी तिथेच बसली होती. तिच्या मोबाईलवर मेसेजेस पहात होती. "काय संपला फोन?" प्रकाश परतलेला पाहून नलिनी हसून म्हणाली. "इंडिया कॉल वाटतं!"

"हो". प्रकाश म्हणाला.

"प्रकाश", नलिनी उठत म्हणाली. "चल आता. आत जाऊया".

नलिनी वरांड्याच्या पायऱ्या चढू लागली. प्रकाश मागेच होता. मनात संमिश्र विचार चालू होते. काय असेल हिच्या मनात. तो क्रश अजून कितपत जागृत आहे कोण जाणे !

दोघंही लिव्हिंग रूमचं दार उघडून आत आले. नलिनीने दाराला लॅच लावली. प्रकाश कडे वळून नलिनी हसली, म्हणाली, "मजा आली नाही? आजचा दिवस छान गेला. आता मात्र थंडी वाढत चालली आहे. तिकडे माधव ब्लँकेट न घेता झोपला असेल. बघायला पाहिजे मला. गुड नाईट. भेटू उद्या ब्रेकफास्टला."

प्रकाश आपल्या रूम मध्ये गेला. कपडे बदलून, दात घासून सरळ अंथरूण गाठलं. रात्रीचा गारवा वाढतच होता. मनातले विचारांचे काहूर जिवाची तगमग वाढवत होते. झोप लागत नव्हती. तो एक जादूचा क्षण आला होता आणि हातातून गमावला होता. इतिहासाची पानं फडफडली होती पण परत नीट उघडली नव्हती. पेटत आलेले निखारे आईच्या अवेळी आलेल्या फोनने विझून गेले होते. पण ती आग आता कुठेतरी जागी असेल का? उद्या तर शेवटचा दिवस. लंच नंतर निघावंच लागणार. काहीतरी करण्याची, जुनं स्वप्न साकारण्याची, एक मोहाचा क्षण निर्माण करण्याची संधी मिळायला पाहिजे. अशा विविध विचारांच्या तगमगी नंतर प्रकाशला झोप लागली, पण जरा उशीरा.

सकाळी स्नान वगैरे आटोपून प्रकाश ब्रेकफास्ट साठी खाली उतरला. नलिनी माधव, रमेश प्रिया आधीच आलेले होते. सतीश सरिता बाळाला तयार करण्यात गुंतले होते.

प्रकाशला पाहून माधव म्हणाला, "गुड मॉर्निंग प्रकाश. काय झोप लागली नं? रात्री थंडी जरा जास्तच होती. इकडे यायचं म्हणजे तयारीनिशी यावं लागतं. लक्षात ठेव पुढच्या ट्रिप साठी. काय ?"

प्रकाशने माधवच्या विनोदाला दाद दिल्या सारखं केलं आणि स्वतःचा ब्रेकफास्ट घेऊन सर्वांसमवेत बसला.

दिवसाचा कार्यक्रम ठरवण्याबद्दल चर्चा झाली. रमेश आणि प्रिया इथले माहितगार. त्यांच्या सांगण्यावरून थोड्या अंतरावर असलेल्या प्रेक्षणीय धबधब्याला भेट द्यायचं ठरलं. तासाभरात मंडळी निघाली.

धबधब्याचं एकंदर  दृश्य कोणालाही मोहुन टाकेल असं होतं. खाली दरीत जायला लिफ्टची पण सोय होती. दोन तास मजेत फेरफटका झाला. सर्वजण विश्रांती साठी बसले. रमेश, प्रिया आणि  माधव कोल्ड ड्रिंक आणि फ्राइज आणायला स्टॉलकडे गेले. सतिश सरिता बाळाला धबधब्याची मजा दाखवत होते. प्रकाश आणि  नलिनी दोघंच बाकावर बसले होते.

धबधब्याकडे बोट दाखवून नलिनी म्हणाली, "प्रकाश, त्या तुषारांवर उमटलेलं सप्तरंगी इंद्रधनुष्य किती सुंदर दिसतंय नाही!"

परत एक क्षण आला होता. ही संधी घालवून चालणार नव्हतं.

"हो नं तुझ्या हातात हात गुंफवून त्याच्याकडे पहातच बसावंसं वाटतंय".  प्रकाशला म्हणायचं होतं.

"हो नं.. :" प्रकाश ने सुरुवात केली.

तेवढ्यात प्रिया कडमडली. ती येऊन नलिनी ला विचारत होती, "तिथे कोक नाही आहे, तुला पेप्सी चालेल का विचारलंय माधवनं."

झालं हा क्षणही हातातून गेला. परत काही अशी संधी मिळाली नाही.

सर्व जण मुक्कामी परत आले. जेवणासाठी रेस्टॉरंटला डिलिव्हरीची ऑर्डर दिली होतीच. जेवल्यावर थोडी विश्रांती घेऊन निघायचं ठरलं.

सर्वजण आपापल्या रूममध्ये गेले. प्रकाश तिथेच डायनिंग टेबलवर बसला होता. मन उदास होतं. हातात आलेले सगळे क्षण वाया गेले होते. वेळ घालवण्या साठी प्रकाशने आपला मोबाईल काढला आणि तो मेसेजेस चेक करू लागला.

आई कडून एक इ मेल मेसेज आलेला त्याला दिसला. "आईने काय लिहिलंय बुवा?"  असं मनाशी म्हणत प्रकाशने मेसेज उघडला.

मेसेज शॉर्ट आणि टु द पॉइन्ट होता आणि  काल बोलणं झालेल्या दोन मुलींचे फोटो आणि समग्र  माहिती आईने इ मेल सोबत अॅटॅच केली होती.

उत्सुकतेने प्रकाशने  नजर टाकली आणि दोन मिनिटातच  त्याच्या  लक्षात आलं  की दोन्ही स्थळं  खणखणीत बंदा रुपया होती. आईचं म्हणणं बरोबर होतं.

आकर्षक व्यक्तिमत्व, उत्तम शिक्षण, कलानिपुणता, सगळंच होतं. आणखी काय पाहिजे!  अशा मुलींची स्थळं गमावणं शुध्द वेडेपणाच.

आई म्हणाली होती आपलंही स्थळ चांगलंच आहे. तेही शंभर टक्के खरं,

पण जास्त ताणून धरण्यात अर्थ नाही.

डोक्यात उलट सुलट  विचार. विचार. विचार.

प्रकाशने पुन्हा एकदा फोटो पहिले. माहिती वाचली.

ऑफिसमध्ये कानोसा घ्यायला पाहीजे, पुढच्या आठवड्यात सुट्टी मिळेल का? आणि प्लेनचं तिकीट. ते मिळेल का? एजंटला विचारायला पाहिजे. अगदी बिजिनेस क्लास सुध्दा चालेल.

चार वाजले. निघायची वेळ झाली. मंडळीनी सामान पॅक केलं, आपापल्या गाड्यांमधे टाकलं. परतीच्या लिफ्ट साठी माधवने प्रकाशला आपल्या गाडीत येण्याबद्दल आमंत्रण  दिलं.

प्रकाश म्हणाला, "थँक्यू". आपली ट्रॅव्हलर बॅग त्याने माधवच्या एसयूवी मधे, मागे, टाकली. माधवने गाडीचा पुढचा दरवाजा त्याच्यासाठी उघडला. प्रकाश पुढे माधवजवळ बसला, नलिनी मागे बसली. गाडी निघाली.

माधवने लगेच गप्पा सुरू केल्या, विशेषकरून कामाबद्दल, त्याच्या ऑफिस बद्दल, त्याने आतापर्यंत बदललेल्या जॉबस् बद्दल, नुकत्याच केलेल्या माचू पिचू ट्रिप बद्दल.

माधवकडे विषयांना तोटा नव्हता. माधव बोलत होता, मधुनच नलिनीशी विचारविनिमय करत होता. प्रकाश नुसतं "हं, हं" करत होता, काही बाही यांत्रिक उत्तरं देत होता.

वेळ चालला होता. झपाट्याने अंतर काटलं जातं होतं. गप्पा थोड्या थंडावल्या. सगळेच शांत झाले.

थोड्या वेळाने माधव म्हणाला, "प्रकाश एक गंमत सांगू? माझं आणि नलिनीचं जेव्हा लग्न ठरत होतं तेव्हा, एन्गेजमेंटच्या आदल्या दिवशी मला एक निनावी पत्र आलं. त्यात लिहिलं होतं, की नलिनीचं ग्रँट रोडच्या प्रकाश रानडेबरोबर चक्कर चालू आहे. मी क्षणाचाही विचार केला नाही. पत्र फाडून फेकून दिलं. म्हटलं, मुलुंडला रहाणाऱ्या माझ्या नलिनी सारख्या साध्या सरळ मुलीचा ग्रँटरोड च्या मुलाशी संबंध असणंच शक्य नाही.

"लग्नानंतर सांगितलं होतं मी नलिनीला याबद्दल. तिलाही हसू आलं होतं. आणि प्रकाश, मागच्या महिन्यात जेव्हा रमेशने तुझी मुंबईचा प्रकाश रानडे म्हणून ओळख करून दिली तेव्हा मी उडालोच. पण तू जेव्हा वरसोव्याला घर आहे म्हणून सांगितलं तेव्हा शांती मिळाली. लाईफ इज स्ट्रेंज, होय ना?"

प्रकाश नुसता "हं, हं" म्हणत होता. मनात विचार चालू होते, की, मुंबईला अमेरिकन एअरलाईन्सनी फ्रँकफर्ट मार्गे जावं की एमिरेटस् नी दुबई मार्गे जावं!

गेल्या दोन दिवसात आलेले मोहाचे क्षण, ती फडफडलेली इतिहासाची पानं आता त्याच्या खिजगणतीतही नव्हती.

-----X-----

# ३

# झंझावात

अमेरीकेच्या डल्लास (टेक्सास) च्या उपनगरात राहणाऱ्या एका भारतीय-अमेरिकन कुटुंबाची ही कथा.

गुरुवारची दुपार होती. नाइन्थ ग्रेडर, म्हणजे इयत्ता नववीत शिकत असलेली प्रीती शाळेतून घरी आली. तिने बॅग एकीकडे टाकली आणि बूटाच्या लेस सोडू लागली.

“मम्मा उद्या इथे  स्कूल हॉलिडे आहे. तुझ्या आणि डॅडीच्या ऑफिसला कसा हॉलिडे नाही?” प्रीतीने विचारलं.

प्रभाची प्रतिक्रिया, “हूं ”.

नाहीतरी प्रीतीला उत्तराची अपेक्षा नव्हतीच.

प्रभा लिव्हिंग रूम मधेच सोफावर लॅपटॉप उघडून काम करत होती. वर्किंग दिवस होता, पण प्रभाचं बरंचसं काम हल्ली घरूनच चालत असे. दोन ऑफ-शोअर टीम्सबरोबर समन्वय साधण्याच्या प्रयत्नात ती होती. तिच्या बॉसला आश्चर्य वाटायचं की भारतातल्याच दोन टीम्स मधे समन्वय साधायला अमेरिकेतल्या डल्लास ऑफिसला का मध्यस्ती करावी लागते! पण प्रभाचं उत्तम समन्वयक, कोऑर्डिनेटर, म्हणून मोठं नाव होतं. अगदी तन्मयतेने, दोन किंवा अधिकही टीम्सना विश्वासात घेऊन, चुचकारत, शीला काम सावकाश, फत्ते करत असे. आत्तासुध्दा तिचा कॉल एका महत्त्वपूर्ण मुद्दयापर्यंत येऊन पोहोचला होता. पण एवढ्यात, बूट

काढल्यावर  प्रीती तिच्या जवळ आली आणि हळुच म्हणाली, “मम्मा आमच्या क्लास मधला पीटर मला शनिवारी डेटवर येतेस का म्हणुन विचारत होता”.

प्रभा दचकली. हा दिवस येणारच होता. तिला कल्पना होती त्याची, पण आत्ता या क्षणी ती तयार नव्हती. घाईने, काहीतरी कारण सांगत तिने कॉल टर्मिनेट केला. चेन्नाईवाल्या टीमला आणखी क्लारिफिकेशन हवं होतं, ते थोडी हुज्जत घालत होते, पण आत्ता वेळ नव्हता. तेवढ्यात नाईट शिफ्ट करून कंटाळलेल्या गुरगावच्या टीमने पडत्या फळाची आज्ञा घेतली आणि टीम लगेच नाहीशी झाली.

प्रभाने लॅपटॉप बाजूला ठेवला. तिथेच शेजारी बसून नखं कुरतडणाऱ्या प्रीतीला तिने विचारलं, “मग, तू काय सांगितलंस पीटरला?”.

“मम्मा, तू मागे एकदा सांगितल्याप्रमाणे, “नो थॅंक यू” सांगितलं त्याला. तू म्हणाली होतीस ना, आपली पध्दत नाही म्हणून, पण मम्मा, केशवने विचारलं तर हो सांगायचे नं?” प्रीती म्हणाली.

प्रभाला हायसं वाटलं. कधी तरी पूर्वी वेळात वेळ काढून सांगितलेल्या महत्वाच्या कानगोष्टी मुलीने ध्यानात ठेवल्यात ते पाहून बरं वाटलं.

“आणि मम्मा,” प्रीती सांगत होती, “पीटरने मग सॅमीला डेटबद्दल विचारलं. सॅमीने घरी तिच्या मम्माला आधी फोन केला आणि मग पीटरला “हो” म्हणून सांगितलं”.

“आणि बरं का मम्मा, सॅमी म्हणत होती की तिची मम्मा त्या दोघांना मूव्ही थिएटरला ड्राइव्ह करून नेणार आहे आणि परत न्यायला पण येणार आहे.” प्रीतीची पुढची बातमी.

तेवढ्यात प्रीतीचा मोबाईल किणकिणला. प्रीतीने मोबाईल कडे पाहिलं आणि मोबाईल घेऊन ती दुसऱ्या खोलीत गेली.

प्रभाचा ऑफिशियल कॉल तर संपलाच होता. खरं तर प्रॉजेक्टचा हा महत्वाचा प्रश्न आज सोडवायला पाहिजे होता. उद्या अगदी डेडलाईन. उद्याही तिढा नाही सुटला तर प्रभाला वरून “कारणे दाखवा” वगैरे प्रश्न विचारले जाण्याची शक्यता होती. नोकरीचा प्रश्न. घड्याळात साडेचार वाजून गेले होते. आजची वेळ संपली होती. तिने ऑफिसच्या साईट वरून लॉग ऑफ केलं आणि लॅपटॉप बंद केला.

संध्याकाळच्या तयारीला प्रभा किचनकडे निघाली. तेवढ्यात प्रीती बाहेर आली. “मम्मा यू नो व्हॉट, केशवचा फोन होता. शनिवारी संध्याकाळी मूव्हीला येतेस का म्हणून विचारत होता. त्याची मम्मा ड्राईव्ह करून सोडणार आहे म्हणाला, आणि ती पुढे मॉलमधे शॉपिंगला जाणार आहे. मी त्याला म्हटलं की मी सांगीन फोन करून”.

प्रभाने सर्व ऐकून घेतलं. तेवढ्यात प्रभाचा फोन वाजला. “मिसेस सबनीसांचा फोन?!!” प्रभा उद्गारली. “केशवची आई”!

मिसेस सबनीस विचारत होत्या, “मिसेस जोशी, या मुलांचं शनिवारी सिनेमाला जायचं चाललंय. त्यांना सोडून मी पुढे मॉलला शॉपिंगला जाणार आहे. माझ्या बरोबर याल का तुम्ही? जरा फिरू, आणि नंतर बॉम्बे चाट हाउस मधे बसू. मजा करू. मग ठरलं, साडे पाच शनिवारी संध्याकाळी.”

या भडीमारापुढे प्रभाला फारसं काही बोलायला वावच नव्हता, आणि कुठे नकारघंटा वाजवायचं कारणही नव्हतं. तिने एकदा प्रीतीकडे पाहिलं आणि भुवया उंचावल्या. प्रीती नखं कुरतडत होती. प्रभाने आपलं मिसेस सबनीसांच्या हो ला हो लावून दिलं आणि फोन खाली ठेवला.

प्रीती हात तोंड धुवून, फ्रेश होऊन आली. प्रभाने सॅंडविचेसची प्लेट तिच्या समोर केली. गरम कॉफी केली. मग दोघी मायलेकीनी शनिवारच्या कपड्यांबद्दल, मेकपबद्दल मोघम रूपाने चर्चा केली.

प्रीतीची सॅंडविचची प्लेट रिकामी झाल्यावर प्रभाने तिला दुसऱ्या दिवसाच्या परिक्षेची आठवण करून दिली. "जा आता, तुझ्या रूम मधे जा आणि अभ्यास कर. उद्या तुझी महत्वाची कॉम्पिटिटीव परीक्षा आहे, विसरली नाहीस नं ?" प्रभाने सौम्यपणे आठवण करून दिली.

"विसरीन कशी, मम्मा, शाळेत अकरा वाजता पोहोचायचंय. तुला जमणार नाही म्हणून डॅडनी सुट्टी घेतलीय नं? तेच मला नेणार आणि आणणार आहेत."

प्रीती अभ्यासाला तिच्या खोलीमधे गेली. प्रभा स्वैपाकघरातली बारीक सारीक कामं करत राहिली.

प्रभाच्या सासूबाई, शकुताई त्यांच्या खोलीतून तयार होऊन आल्या. दोन वर्षांपूर्वी दीपकचे वडील गेल्यानंतर शकुताईना दीपकने अमेरिकेत आपल्याकडे डल्लासला आणलं होतं. दीपक, प्रभा वगैरे सर्व फॅमिली अमेरिकन नागरीक असल्याने त्यांच्या स्पॉन्सरशिपखाली शकुताईंचं ग्रीन कार्ड होऊन गेलं होतं. गेले काही दिवस शकुताई पायाला सूज येणे, रात्री नीट झोप न लागणे, भूक न लागणे अशा बारीक सारिक आजारांनी पीडित होत्या. त्यांच्या उपचारासाठी डॉक्टर शहांची शुक्रवारची सकाळी आठची अपॉइंटमेंट मिळाली होती. सकाळच्या वेळी ऑफिसच्या मीटिंग वगैरे सुरु करण्याआधी सासूबाइंना डॉक्टरकडे नेउन आणण्याचा प्रभाचा विचार होता.

"बाहेर जरा पाय मोकळे करून येते." असे म्हणून शकुताई बाहेर निघुन गेल्या.

जयराज अजून शाळेतून आला नव्हता. प्रभाला आठवलं, जयराजच्या म्युझिक ग्रुपची उद्या दुपारी एका महत्वाच्या आंतर शालेय कॉम्पीटिशनसाठी ऑडीशन होती. त्यासाठी आज प्रॅक्टिस सेशन होतं. सगळं आटोपून सहापर्यंत येईन म्हणाला होता. आणि उद्याची ऑडीशन शाळेच्या ऑडिटोरिअम मधे दुपारी २ वाजता ठेवली आहे म्हणाला होता. दीपकने प्रीतीच्या कॉम्पिटिटीव परिक्षेसाठी एवी तेवी सुट्टी घेतली असल्याकारणाने त्याने कबूल केलं होतं जयराजला ऑडिशनसाठी न्यायचं, आणायचं.

दीपक यायला अजून सुमारे अर्धा तास होता. प्रभाने बॅकयार्डचं दार उघडलं आणि पाठीमागच्या लॉनवर ठेवलेल्या खुर्चीवर ती जाऊन बसली.

मंद वारा वहात होता. पश्चिमेकडच्या क्षितिजावर क्षणाक्षणाला बदलते रंग दिसत होते. “लाइफ इज सो पीसफुल ! सारं कसं शांत शांत”, प्रभा स्वत:शीच पुटपुटली आणि खुर्चीला मागे डोके टेकून तिने अलगद डोळे मिटले.

“प्रभा ऊठ, उद्या बोस्टनला जायचंय मला”. दीपकच्या शब्दांनी प्रभाला जाग आली.

“अं, बोस्टनला ? ते कशाला?” डोळे उघडता उघडता प्रभाने विचारलं.

“आत चल, सांगतो सगळं.” दीपक म्हणाला, आणि फ्रेश व्हायला टॉयलेटकडे गेला.

प्रभा उठली, आत आली. किचनमधे जाउन तिने दोन कप चहा बनवला. पॅन्ट्रीमधुन बिस्किटातल्या दोन पुड्यातली बिस्किटे एका डिशमधे ओतली आणि सगळं सेटअप करून किचन टेबलावर ती दीपकची वाट पहात बसली.

चहा घेता घेत दीपक सांगत होता, “अगं ईस्ट कोस्टला एक टरबाईन फेल झालंय, लो प्रेशर ब्लेड्सच्या फेल्युअरमुळे. ते म्हणतायत की आम्ही दिलेली

स्पेसिफिकेशनस् चुकीची होती. मेटॅलरजिस्टचा पुरावा आहे म्हणतायत. जायलाच पाहिजे उद्या. नोकरीचा आणि रेप्युटेशनचा सवाल आहे''.

नोकरी आणि रेप्युटेशन म्हटल्यावर न जाण्याचा प्रश्नच नव्हता.

''उद्या या मुलांच्या कामांसाठी मी सुट्टी घेतली होती पण माझा नाईलाज आहे. तुलाच ही कामं करायला लागतील''. दिलीपने प्रभाला गळ घातली.''जमव कसं तरी करून''.

प्रभा हतबुध्दच झाली. ती मनात म्हणाली, ''माझ्यापण नोकरीचा सवाल आहे''.

संध्याकाळच्या साडेसहापर्यंत जयराज घरी आला, पण जरा दुर्मुखलेला चेहरा घेऊनच. आल्याबरोबर आपल्या उजव्या हाताचे बोट प्रभाला दाखवत तो विव्हळला, ''मम्मा, हे बघ काय झालं. दुपारी ॲपल कापताना कट झालाय बोटाला, दुखतंय ते. आता उद्या मी गिटार कशी वाजवणार, हे दुखरं बोट घेऊन?''

प्रभाने जयराजला जवळ घेऊन त्याचं दुखरं बोट नीट बघितलं. मग आत जाऊन तिने फर्स्ट एड बॉक्स आणली आणि जखमी बोटाला व्यवस्थित मलमपट्टी केली.

''उद्यापर्यंत होईल बरं, तू नको काळजी करु'' असंही ती जयराजला म्हणाली.

शकुताईही बाहेरून फिरुन आल्या.

आठ वाजायच्या आसपास प्रभा आणि शकुताई डिनरच्या तयारीला लागल्या. साडे आठ पर्यंत मंडळी जेवायला बसली. चुपचाप जेवू लागली. प्रत्येकाला काही ना काही डाचत होतं, काही ना काही सलत होतं, भेडसावत होतं, प्रत्येकाच्या मनात काळजीनं वादळ उठलं होतं.

दीपकला काळजी होती उद्याच्या बोस्टनच्या मीटिंगची, तांत्रिक ज्ञानाच्या कसोटीची.

प्रभाला काळजी होती तिच्या रखडलेल्या प्रॉजेक्टची, वरून येणाऱ्या दट्ट्याची.

शकुताईना काळजी होती या परदेशात आजारी पडण्याची.

प्रीतीला काळजी होती उद्याच्या परिक्षेची आणि परवाच्या केशवबरोबरच्या डेटची.

जयराजला काळजी होती त्याच्या दुखऱ्या बोटाची आणि म्युझिक ऑडिशनची.

आणि या सगळ्या वादळांचे पडसाद एकत्रित होऊन ते प्रभाच्या मनातही एक दुष्ट आवर्त निर्माण करत होते, तिला भेडसावत होते.

--------------------

शुक्रवार उजाडला. सकाळी सहाला टॅक्सी आली. दीपक बोस्टन फ्लाइटसाठी निघून गेला.

सात वाजण्याच्या आतच प्रभाने आजच्या सुट्टीचा अर्ज टाकला आणि लॅपटॉप उघडून लॉगइन करायचा मोह टाळला.

साडेसातला सासूबाईना घेऊन डॉक्टरकडे जाण्यासाठी निघायलाच पाहिजे. शकुताई सुध्दा ठरलेल्या वेळी तयार होऊन बाहेर आल्या. टेन्शनमुळे त्याना चहाही पिववेना.

बाहेर निघणार तेवढ्यात फोन वाजला. जेरी, प्रभाचा बॉस विचारत होता की आज लॉगइन का केलं नाही, तब्येत ठीक आहे ना?

प्रभाने सांगितलं की कौटुंबिक कारणास्तव तिला आज कामावर येणे शक्य होत नाही आहे, आणि तसा सुट्टीचा अर्जही टाकलाय. जेरीसाहेब जरा नाराजच झाले. त्यानी ठणकावणीच्या सुरातच सांगितलं, की प्रभा,आपलं महत्त्वाचं प्रॉजेक्ट एका कठीण वळणावर अडकलंय आणि सवाल केवळ तुझ्या नोकरीचाच नाही, माझ्याही नोकरीचा आहे.

प्रभा सुन्न झाली. तिकडे दिलीप म्हणतोय, त्याच्या नोकरीचा सवाल. इथे जेरीसाहेब म्हणतोय तुझ्या आणि माझ्या नोकरीचा सवाल. काय झालंय काय या देशाला? इतकं कसलं वारं शिरलंय सगळ्यांच्या डोक्यात ?

सगळे विचार मनातून बाजूला सारून प्रभाने शकुताईंना गाडीत बसवलं आणि डॉक्टर शहांच्या क्लिनिककडे मोर्चा वळवला.

डॉक्टर शहांनी शकुताईंना नीट तपासलं, त्यांच्या आजाराविषयी प्रश्न विचारले. अचानक डॉक्टर म्हणाले, ही पुरळ केव्हापासून येतेय तुमच्या हातावर ? बघुद्या मला ! हमममम् ! ब्लड टेस्ट करुन घ्यायला पाहिजे. आत्ता ब्लड सॅम्पल द्या, इथे खालच्या मजल्यावर लॅब आहे. उद्या मला रिझल्ट मिळेल. कुठे शंकेला जागा ठेवणं बरं नाही.

प्रभाने मान डोलावली आणि डॉक्टरांची चिठ्ठी घेतली. शकुताई तर भेदरूनच गेल्या.

ब्लड सॅम्पलिंगचा सोपस्कार संपवून दोघी घरी आल्या. प्रीती वाटच पहात होती. तिला परिक्षेसाठी जायचं होतं.

शकुताई म्हणाल्या, “जेवणाच्या तयारीचं मी बघते, तुम्ही निश्चिंत असा”.

प्रभा प्रीतीला परिक्षेसाठी घेउन गेली. प्रीती आत गेल्यावर दोन तासासाठी घरी जाउन येण्यात अर्थच नव्हता. प्रभा तिथेच गार्डनमधे बसली. प्रीतीच्या मित्र-

मैत्रिणींच्या बरोबर आलेले त्यांचे आई, वडील आसपासच फिरत होते. काहींशी प्रभाची जुजुबी तोंडओळखही होती. आत्ता तरी सगळेच एकाच जहाजातले प्रवासी. मुलं बाहेर येईपर्यंत तिथेच थांबणं, वेळ काढणं क्रमप्राप्तच होतं. विखुरलेली मंडळी एकत्र आली, छोटे ग्रुप झाले. हवामान, प्रवास, शाळांमधल्या ॲक्टिव्हिटी अशा निरुपद्रवी विषयांवर गप्पा सुरू झाल्या. एक दीड तास निघून गेला. वेळ झाली. मुलं बाहेर आली. आपआपल्या पालकांसमवेत कार पार्कमधल्या आपआपल्या गाड्यांकडे चालू लागली. काही पालक परीक्षेबद्दल विचारणा करत होते पण भुकेल्या मुलांकडून त्यावेळी सरळ उत्तराची अपेक्षा करण्यात अर्थ नव्हता.

घरी परतेपर्यंत दुपारचे दीड वाजले. जयराजने आणि शकुताईंनी जेवण आटोपून घेतलं होतं. जयराजला त्याच्या म्युझिक ऑडीशनसाठी दुपारच्या दोन पर्यंत निघायचं होतं.

वेळ कमी होता. प्रभाने आपली आणि प्रीतीची डिश वाढून घेतली, मायक्रोवेव्ह ओव्हनमधे दोन्ही बशा गरम केल्या आणि प्रभाने भराभर जेवण उरकून घेतलं. शकुताई तिथेच होत्या, हवं, नको विचारत होत्या.

जेवण झाल्याबरोबर प्रभाने परत गाडी काढली, जयराजला शाळेत घेउन निघाली. जयराजच्या बोटाचं दुखणं आता बरंच कमी झालं होतं. तरीसुध्दा ऑडिशनच्यावेळी काय होईल याची त्याला भीती होतीच. गाडीतून उतरताना जयराज गप्प गप्पच होता. प्रभाने त्याला पाठीवर थोपटलं आणि त्याला बेस्ट विशेस दिले. जयराज उतरून गेला आणि प्रभाने गाडी वळवली. कार्यक्रम संपल्यावर संध्याकाळी जयराज त्याच्या मित्राच्या गाडीतून परत येणार होता.

घरी पोहोचता पोहोचता चार वाजत आले होते. सकाळपासूनच्या धावपळीमुळे प्रभाला इतकं थकायला झालं होतं की घरी पोहोचल्याबरोबर तिने

बेडरूम गाठली, पलंगावर अंग झोकून दिलं आणि दोनच मिनिटात तिला गाढ झोप लागली.

प्रभाने डोळे उघडले तेव्हा संध्याकाळचे सहा वाजले होते. घरात शुकशुकाट होता. प्रीती आजीला कंपनी म्हणून तिच्याबरोबर पार्कमध्ये फिरायला गेली होती आणि जयराज अजून आला नव्हता.

फोनची घंटा वाजली. दीपकचा बोस्टनहून फोन होता. “आजची मीटिंग ठीक झाली, आपल्या फेवरमधे पॉईंट निघाले. आता उद्या समिंगअप आहे.” दीपक बोलत होता. “तिथे सव्वा सहा वाजले असतील नं ? इथे सव्वा सात वाजले आहेत. इथल्या आमच्या कलीग्जबरोबर जेवायला निघालोय. टेक केअर”. असे म्हणून त्याने फोन ठेवला.

प्रभाला जेरीच्या सकाळच्या फोनची आठवण झाली. आज रात्री काही झालं तरी भारतातल्या चेन्नाई टीम आणि गुरगाव टीमशी संपर्क साधला पाहिजे. त्यांच्यात समन्वय होऊन जर प्रॉजेक्ट पुढे सरकलं नाही तर अनर्थ निश्चित. जेरी जसं म्हणाला होत तसं, काही डोकी उडवली जाण्याची शक्यताही होती. प्रभा विषण्णपणे शून्यात बघत बसून राहिली.

जयराज आला. प्रीती आणि शकुताईही आले. घर जरा भरल्यासारखं वाटायला लागलं. पण कोणाचंही मन थाऱ्यावर नव्हता. मनात वाहणारे वादळी वारे चौघानाही अस्वस्थ करून सोडत होते. जयराज आणि प्रीतीबरोबर हलक्या फुलक्या गप्पा मारण्याचा प्रभाने प्रयत्न केला पण प्रत्येकाच्या मनाला घातलेल्या भीतीच्या अदृष्य बांधाने परस्पर संवादाचा ओघच आडवून टाकला. शेवटी गप्पांचा नाद सोडून तिघांनीही आपआपले आय फोन उघडले. शकुताईही ब्लड टेस्टच्या कल्पित

निष्कर्षांपासून दूर, काल्पनिक जगात वावरण्यासाठी टी व्ही लावून बसल्या होत्या. एकमेकाना धीर देण्याचेही कोणाला त्राण नव्हते.

अमेरिकेतली शुक्रवारची रात्र म्हणजे भारतातली शनिवारची सकाळ, आणि डल्लास-टेक्सासचे रात्रीचे दहा म्हणजे भारतातले शनिवार सकाळचे साडेआठ. प्रभाने चेन्नईच्या आणि गुरगावच्या ऑफ शोअर टीम्सबरोबर संपर्क साधायचा दोनदा तीनदा प्रयत्न केला, पण जमलं नाही.

रात्र वाढतच चालली होती. शेवटी प्रभाने तो नाद सोडला. “काय देवाच्या मनात असेल ते होईल,” असे म्हणून फॅमिली रूम मधल्या श्रीगणेशाच्या मूर्तीला हात जोडले आणि ती झोपायला गेली.

-------------

शनिवारची सकाळ ढगाळ हवामान घेऊनच उगवली. घरातल्या चौघांच्याही मनात आपाआपल्या काळोख्या विचारांचा गडद अंधार दाटला होता. सगळ्यात वैषम्य या गोष्टीचं की संभाव्य संकटांच्या विमोचनासाठी काहीही करता येणं शक्य नव्हतं. प्रभाला राहून राहून आश्चर्य वाटत होतं की दोनच दिवसांपूर्वी आनंदात, सुखात,काळजीरहित जीवन जगणाऱ्या घरावर अचानक संकटाचे ढग आले कसे! कुठे गाफील राहिलो आपण?

सकाळी पावसाचे थोडे छिडकावे पडले होते, पण दुपारपर्यंत बाहेर आकाशात हळूहळू ढग विरळ होऊ लागले आणि सूर्यदर्शन होऊ लागले. थोड्याच वेळात आकाशातून ढग पूर्ण नाहिसे झाले. बॅक यार्डमधे लॉनवर स्वच्छ ऊन पडले.

संध्याकाळ सौ. सबनीसांबरोबर काढायची होती. मॉल मधे अनिच्छेचे शॉपिंग करत,मजा करत असल्याचा देखावा करणे प्रभाला अगदी जीवावर आले होते.

चार साडे चार चा सुमार. दीपकचा फोन यायचा होता. मीटिंगचं काय झालं, परत येण्याचा काय प्लॅन आहे याबद्दल काहीच कल्पना नव्हती.

प्रीतीच्या परीक्षेचं ग्रेडिंग आज संध्याकाळपर्यंत हाती यायला पाहिजे होतं, पण अजून तरी पत्ता नव्हता.

जयराजच्या म्युझिक ग्रुपचं सिलेक्शन आंतरशालेय स्पर्धेसाठी झालंय की नाही याबद्दल काहीच बातमी हाती आलेली नव्हती.

सासूबाईंच्या ब्लड टेस्टबद्दल डॉक्टर शहाकडून पुढे काहीच कळलं नव्हतं.

ऑफ शोअर गुरगाव आणि चेन्नाई टीम निद्रिस्तच होत्या.

हवालदिल करण्यासारखी परिस्थिती होती, आणि काय उगीच मॉलमधे फिरत रहायचं, नको असलेल्या वस्तूंच्या किमती बघत विंडो शॉपिंग करायचं आणि नंतर फारशी इच्छा नसताना तिखट तिखट भेळ-पुरीचे बोकाणे मारायचे,

अगदीच वाईट.

अत्यंत निरुत्साही मन:स्थितीमध्ये प्रभा फॅमिली रूमच्या सोफ्यावर कोमट झालेल्या चहाचा कप घेऊन बसली होती, खालच्या कार्पेटमधले सफेद चौकोन चाळा म्हणून मोजत होती. जोशी कुटुंबाच्या संथ जीवनात या झंझावाताचं कुठून येणं झालं तेच तिला कळत नव्हतं.

इतक्यात, कोणीतरी रूममधले सर्व दिवे लावल्यासारखी फॅमिली रूम एकदमच उजळली. प्रभाने आश्चर्याने वर मान केली. लाईट तर ऑफ होते, मग इतका उजेड आला कुठून ? तिने समोरच्या भिंतीकडे पाहिलं आणि तिला मति कुंठित करणारं दृष्य दिसलं. फॅमिली रूममध्येच समोरच्या कोपऱ्यात ठेवलेली गणेशमूर्ती झगझगीतपणे प्रकाशमान झाल्यासारखी दिसत होती. पश्चिमेकडे झुकलेल्या सूर्यप्रकाशाचा एक कवडसा बॅक यार्डच्या बाजूने येऊन नेमका गणेश मूर्तीवर पडला

होता. श्रीगणेशाच्या गळ्यातील कंठा, श्रीगणेशाचा मुकुट, सर्व साज त्या प्रकाशात झगमगत होता. श्रीगणेश मूर्ती तेजाने उजळून निघाली होती. आपलं तेज सगळीकडे पसरवत होती. प्रभा स्तिमित होऊन पहातच राहिली. नकळत तिने श्रीगणेशाला हात जोडले. इतक्यात सूर्य झाडाच्या आड गेला आणि काही सेकंदातच प्रकाशाचा कवडसा तेथून नाहीसा झाला.

प्रभाला तो एक क्षण स्वप्नवत वाटू लागला. श्रीगणेशाने एक स्वर्गीय संकेतच जणू तिला दिला होता. त्या सकारात्मक संकेताने प्रभाची चित्तवृत्ती उजळून निघाली, उल्हसित झाली. आता यापुढे जे काही होईल ते चांगलंच होईल याबद्दल तिची खात्री झाली.

प्रभा उठली, किचन सिंकवर तिने कप विसळला, रॅकवर ठेवला आणि तयारी करायला ती आपल्या रूममधे गेली.

वीस एक मिनिटात प्रभा तयार झाली. प्रीतीच्या खोलीमधे गेली. कपड्यांबद्दल, मेकअपबद्दल छोट्या टिप्स तिने प्रीतीला दिल्या, आणि नंतर बाहेर फॅमिली रूम मधे येऊन ती प्रीतीची वाट बघत बसली.

एक तासापूर्वीची प्रभा आणि ही प्रभा यात खूप फरक होता. तेव्हाची प्रभा होती एक नैराश्यमूर्ती तर या प्रभाच्या नसानसांतून, श्रीगणेशाच्या कृपेने चैतन्य सळसळत होतं.

प्रीती तयार होऊन आली. प्रभाचा मराठमोळा गाभा मनातल्या मनात म्हणाला, “हिची दृष्ट काढायला पाहिजे”. पण दुसऱ्याच क्षणी तिच्यामधल्या अति सुशिक्षित, पाश्चात्य मुलामा चढवलेल्या अमेरिकन नागरिकाने तो विचार झटकून टाकला.

प्रभाने गाडी काढली. पंधरा मिनिटातच त्या दोघी मॉल जवळ पोहोचल्या. पावणेसहा वाजत आले होते. मिसेस सबनीस आणि केशव पार्किंग लॉटमध्येच भेटले. एकमेकाशी सर्वांचं “हॅलो”, “हॅलो” झालं आणि मग जोर जोरात हात हलवून, दोन्ही आयांना “बाय” करून, केशव आणि प्रीती त्यांच्या वयाला शोभेलशा गतीने मुव्ही थिएटरकडे दौडू लागले.

दोन्ही आयांनी हुश्श केलं आणि शांतपणे मॉलकडे मोहरा वळवला.

मिसेस सबनीस आणि प्रभा मॉल मधल्या क्रिष्ना आइसक्रीम हाऊस मध्ये बसल्या होत्या. आपापल्या आवडीचे इंडियन फ्लेवर्स त्यानी मागवले होते. अजुन गप्पा अशा सुरु झाल्या नव्हत्या. प्रभाने आपल्या “अस्सल अहमदाबादी अंजीर आईस्क्रीम” मध्ये चमचा बुडवला आणि तेवढ्यात तिचा मोबाईल वाजला.

दीपकचा बोस्टनहून फोन. “हॅलो प्रभा, ईस्टर्न टाईम नऊच्या फ्लाईटने निघतोय मी. दहा वाजेपर्यं डल्लासला पोहोचेन.”

“मीटिंग अगदी छान झाली. त्यांचाच ऑपरेशनल इश्शु होता, तो मान्य केला त्यांनी”.

“हो, हो, आमची बाजू क्लीअर आहे. मिनिटस् केलीत व्यवस्थित आणि आमच्या मॅनेजमेंटलाही कळवलंय. त्यानी पाठ थोपटलीय माझी.”

“ठीक आहे, भेटूया” असे म्हणत दीपकने फोन ठेवला.

हुश्श करत आणि तोंडभरून हसत प्रभाने फोन ठेवला आणि आईस्क्रीमचा चमचा उचलायला हात पुढे केला. तेवढ्यात परत फोन वाजला.

डॉक्टर शहांचा फोन होता. “हॅलो मिसेस जोशी,” डॉक्टर बोलत होते, “तुमच्या सासुबाईंचे ब्लड टेस्ट रिपोर्ट ठीक आहेत हं, आणि बाकी सगळे पॅरामीटरस्

अगदी ओ के आहेत. मी त्याना फक्त सल्ला देईन की खाण्यावर नियंत्रण ठेवा आणि नियमाने मी सांगेन ते योगा एक्सरसाईज घेत चला. सगळे प्रॉब्लेम निघून जातील."

"थँक्यू व्हेरी मच् डॉक्टर" असे म्हणून प्रभाने फोन खाली ठेवला.

चला, सासुबाईंचं काही निघालं नाही ते बरं झालं. डॉक्टरांनी सोपे उपाय सुचवलेत. ते जरी त्यांनी नीट पाळले तरी बऱ्या होतील पट्कन. - प्रभाची उत्सफूर्त प्रतिक्रिया.

"प्रभाताई, आईस्क्रीम वितळतंय तुमचं. फोनमध्येच अडकलायत तुम्ही केव्हापासून." मिसेस सबनीस आठवण करून देत होत्या.

"अं ? हो,हो." प्रभा हसून म्हणाली आणि चमचा उचलायला हात पुढे केला. तेव्हढ्यात तिच्या फोनची घंटा वाजली. प्रभाने फोनवरचा डिस्प्ले पाहिला. "हरदीपसिंग ? गुरगाव टीम लीडर ? महत्त्वाचा फोन".

"गुड मॉर्निंग मॅडाम, चांगली बातमी आहे. काल आम्ही चेन्नाई टीम बरोबर चर्चा केली आणि सगळे इश्श्यू सोडवले. आता काही प्रॉब्लेम नाही. आज संध्याकाळपर्यंत फायनल प्रॉडक्ट पाठवून देईन मी. मुद्दाम पहाटे उठून फोन केलाय तुम्हाला, म्हटलं काळजीत असाल तुम्ही, अपडेटेड करावं तुम्हाला."

प्रभाचा गळा दाटून आला. जेमतेम, "थॅंक यू हरदीप, थॅंक यू" एवढं बोलून तिने फोन ठेवला.

प्रभाच्या चेहऱ्यावर हसू फुललं. अगदी तोंड भरून हसू फुललं.

मिसेस सबनीस म्हणत होत्या, "प्रभाताई, तुमच्या आईस्क्रीमचं दूध झालंय. दुसरं हेल्पिंग घेणार का?"

प्रभाच्या कानावर शब्द पडत होते पण उमजत नव्हते. ती हसतच राहिली.

नंतर प्रभाला आणखी दोन फोन कॅाल आले. पहिला कॅाल होता जयराजचा. “मम्मा आमच्या ग्रूपचं सिलेक्शन झालं आंतरशालेय स्पर्धेसाठी. आणि माझ्या शेवटच्या गिटार सोलोचं परीक्षकांनी खूप कौतुकही केलं”.

दुसरा फोन होता प्रीतीचा, मूव्ही थिएटरच्या आतून. “मम्मा, केशवच्या फ्रेंडचा फोन आला होता. परीक्षेच्या ग्रेडस् मिळाल्यात मम्मा, केशवला आणि मला, दोघांनीही ९५ परसंटाईल मिळाले मम्मा. वी आर सो हॅप्पी !!”

“सो ॲम आय, परमेश्वरा, सो ॲम आय”! प्रभा उद्गारली.

-------X-------

# ४

# योगाभ्यास

अमेरिकेतल्या टेक्सास स्टेटच्या डल्लास च्या एका उपनगरातली गोष्ट.

“चला, सामानाची बांधाबांध करू या”. मधुकरराव कमल ताईंना म्हणत होते.

“अहो, इतक्यात कसली सामानाची बांधाबांध करताय. आपल्याला निघायला एक आठवडा आहे अजुन”. कमलताईंनी आठवण करून दिली.

“अगं आठवडा काय, हां हां म्हणता जाईल. सात आठवडे गेले, आठवा आठवडाही असाच पटकन जाईलही. जरा फुसकीच झाली आपली ट्रिप”. मधुकरराव तणतणत होते. “एवढं इतक्या लांब अमेरिकेत येऊन काही मौज मजा नाही, पहाण्यासारखी एवढी अनंत ठिकाणं असुन कुठे ट्रीप काढली नाही. मुंबई ते डल्लास, मग डल्लास एअरपोर्ट ते घर आणि दोन महिन्या नंतर परतीचा प्रवास, घर ते डल्लास एअरपोर्ट आणि तिथून मुंबईला तडीपार होणार. झाली ट्रीप. वेस्ट ऑफ टाइम”.

“अहो वेस्ट ऑफ टाईम कसं ? आपण कशासाठी आलोय इथे, विसरलात का?” कमलताई म्हणाल्या, “वसंता पूर्ण बिझी आहे त्याच्या ऑफीसच्या कामात, आणि हे दोन महिने स्मिता तिच्या पी एच डी अभ्यासात. घराकडे लक्ष द्यायला आणि छोट्या सोनिका कडे बघायला कोणीही नाही. म्हणून मग वसंताने आपल्याला तातडीने बोलावून घेतलं ना? आणि अहो,आपण केलं ना आपलं काम व्यवस्थित

पणे. मी स्वैपाकपाणी सांभाळलं, सोनिकाचं खाणं पीणं बघितलं, तुम्ही मला भांडी करायला, साफ सफाईला खूपच मदत केलीत. ज्यासाठी आलो होतो ते व्यवस्थित पार पडलं. मग उगीच आपलं वाईट कशाला वाटून घ्यायचं बरं?"

"अगं पण शनिवार रविवारचे काय?" मधुकररावांचं आरग्युमेंट चालूच होतं, "शनिवार रविवारी तर सुट्टीच असते ना इथे सर्वांना? उशीरापर्यंत सकाळी झोपून रहायचं, आणि दहा वाजता चहा -नास्ता करून बागेची मशागत करत बसायचं, मग आंघोळ करून ग्रोसरी मार्टला नाही तर सब्जी बाजारला पळायचं, परत आल्यावर जेवायचं अन् दुपारची ढाराढूर झोप. असा जातो यांचा  शनिवार आणि थोड्या फार फरकाने तसाच काहीसा रविवार".

"अहो लॉन ट्रिमिंग, अस्ताव्यस्त वाढलेली फुलझाडं कापणं हे करावच लागतं. नाहीतर स्थानिक होम ओनर असोसिएशन ची नोटीस येते लगेच, माहित आहे तुम्हाला. आणि ग्रोसरी मार्टला, सब्जी बाजारला नाही गेलं, तर ग्रोसरी, भाजीपाला कसे येणार घरात! आणि कसला स्वयंपाक करू मी आठवडाभर आणि घालू काय सगळ्यांना खायला! आणि तुम्हालाही आवडतंच नं बाजारात जायला, ट्रॉली ढकलत सुपर मार्केटमधे फिरायला?"

"सगळं मान्य," मधुकर म्हणाले, "पण माझं एवढंच म्हणणं की टूरिंग काहीच झालं नाही. जगप्रसिद्ध टुरिस्ट स्पॉट, पहाण्यासारखी ठिकाणं कित्येक आहेत इथे. नायागाराचा धबधबा, लिबर्टीचा पुतळा, हॉलिवूड, येलोस्टोन नॅशनल पार्क, यादी संपतच नाही. वसंताचे लहानपणी सगळे लाड पुरे केले, एक शब्द खाली पडू दिला नाही, आणि आता एवढ्या लांबून आपण आलोय, तर वेळात वेळ काढून कुठेही फिरवायचं नाही म्हणजे काय ?"

“तेव्हाची परिस्थिती काय अन् आताची परिस्थिती काय, कसली तुलना करतायत तुम्ही”, कमलताई समजावणीपूर्वक म्हणाल्या. “माहित नाही का तुम्हाला, दोघांच्या इथे काम करण्याच्या परमिटची मुदत संपत आली आहे. ई ए डी साठी, म्हणजे एम्प्लॉयमेंट ओथोरायजेशन डोक्युमेंट, कायम स्वरूपी वर्क परमिट मिळण्यासाठी अर्ज केलाय दोन वर्षापूर्वी. पण अजून काहीच पत्ता नाही आणि कधी मिळेल सांगता येत नाही. ई ए डी साठी आणि ग्रीन कार्ड साठी एकदमच आर्ज केलेत त्यांनी. ग्रीन कार्ड दूरच आहे, निदान ई ए डी हातात मिळालं तरी खूप झालं. हद्दपारीच्या डोक्यावर टांगलेल्या तलवारीपासून थोडी मुदतवाढ मिळण्यासाठी स्मिताने पी एच डी करायला घेतलंय. त्यात तीही पूर्ण बुडालीय. एवढे मोठे चिंतेचे डोंगर डोक्यावर आहेत त्यांच्या. सध्यातरी काही टुरिंग वगैरेची अपेक्षा ठेवायचीच नाही. पुढे जरा स्थीर स्थावर झाल्यावर बघता येईल.”

मधुकररावाना सगळं कळत होतं पण वळत नव्हतं, एवढंच. कमलताई स्वयंपाकात, घरकामात बिझी असायच्या, आवडीने करायच्या. मधुकररावाना मात्र मन रमवायला फारशी साधने नव्हती. आय पॅड वर भारतातली वृत्तपत्रे वाचायची, टीव्हीवर पेमेंट देऊन घेतलेले मोजके भारतीय चॅनेल बघायचे याउपर काही फारसं दिवसभरात करायला नसायचं. भारतातलं शेअर मार्केट चालू असायचं तेव्हा इथली रात्र. काही उलाढाली करायला जावं तर तोटाच होवून बसायचा.

वसंता एवढं दिवसभर दार बंद करून काय काम करतो याचं सुरुवातीला मधुकररावांना कुतुहल असायचं. जेवताना किंवा चहा पिताना मूड बघून त्यानी वसंताला त्याबद्दल विचारलं ही होतं. वसंताने खुशीत मधुकररावांना अगदी विस्तृत माहिती पुरवली होती. “बाबा, मी नं, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि मशीन लर्निंग वापरून प्रॉजेक्ट करतोय. सध्या नं बाबा, शंभर मेगावॅटच्या गॅस टरबाईनच्या वर्किंग

पॅरामीटरचा रिग्रेशन मेथडनी अभ्यास करून ऑप्टीमल एफिशियन्सी लोडिंग साठी एअर चिलर डिझाइन करतोय”.

मधुकररावांना काही फारसं समजलं नाही पण त्यानी “वा, फार छान” असं म्हणून मान हलवली आणि वसंताजवळ परत कधीही त्याच्या कामाबद्दल विचारलं नाही. मधुकर रावांना राहुन राहुन आश्चर्य वाटत राहिलं मात्र, की हे काय काम असेल कि ज्याच्याबद्दल आपल्याला एक अक्षरही समजत नाही!

असाच काहीसा प्रकार त्यानी जेव्हा स्मिताला तिच्या पी एच डी बद्दल विचारलं तेव्हाही झाला.

“बाबा मी आन्थ्रोपोलॉजी मध्ये पी एच डी करतेय”. स्मिताने माहिती पुरवली होती, “ इथिओपिअन ॲथलेट्सच्या मूळ आफ्रिकन ओरिजीन बद्दल हा स्टडी आहे”.

इथेही मधुकररावानी मान हलवली होती आणि परत काही हा विषय काढला नाही.

आश्चर्याची गोष्ट म्हणजे यांची सगळी मित्रमंडळी सुध्दा अशाच विचित्र व्यवसायात होती. मधुकरराव आणि कमल ताई यांच्या अमेरिकेतल्या वास्तव्याच्या सुरुवातीच्या आठवड्यातच एका मित्राच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ही जिवलग मित्रमंडळी मधुकररावांना भेटली होती. बोलता बोलता मधुकररावानी सांगितलं होतं की नाशिकला पार्टनरशिप मधे त्यांचा इलेक्ट्रीकल हार्डवेअरचा व्यवसाय आहे आणि साइड बाय साइड योगाभ्यासाचे क्लासेसही ते घेतात. आपल्या भिडस्त स्वभावामुळे स्टेट गवर्मेंट सर्टीफिकेट लेवलला आणि रिजनल लेव्हलला आपल्याला योगा ट्रेनिंग कोर्स मधे खुद्द गवर्नरसाहेबांच्या हस्ते गोल्ड मेडल मिळाल्याचं मधुकररावांनीही कोणाला सांगितलं नाही आणि वसंताला ही गोष्ट तिथे

उच्चारण्या इतपत महत्वाची वाटली नसावी.  मधुकररावांबरोबर गप्पा मारण्यास सुयोग्य इंटरेस्टिंग विषय न सुचल्याने मग आपल्या आपल्या प्रॉजेक्टबद्दल आपापसातच उत्साहाने बोलण्यातच मित्र मंडळी दंग झाली होती. कमलताई स्मिता बरोबर आत मदतीला गेल्या आणि मधुकरराव आपले एकटेच सोफ्यावर बसून सॉफ्ट ड्रिंकचे घुटके घेत राहिले, पुढ्यात येईल ते खात राहिले.

मधुकररावांची छोट्या सोनिकाबरोबर मात्र चांगली दोस्ती झाली होती. रोज दुपारी चार वाजता शाळेतून आल्यावर दिवसभरात शाळेत घडलेल्या गमती जमती आपल्या टेक्सास ॲक्सेंट मधे आजोबा आजीना सांगायला तिला फार आवडायचं. आजीला १०-२० टक्के समजायचं, आजोबांना म्हणजे मधुकररावांना अर्ध समजायचं आणि उरलेल्याचा सोईस्करपणे अर्थ लावायला लागायचा.

मधुकररावांनी रोज सकाळी व्यायाम करण्याचा, योगासने करण्याचा नित्यनेम मात्र कसोशीने ठेवला होता. त्यामुळे त्यांचा तसा घरातल्या घरातच वावर असला तरी पोटाच्या, पचनाबाबतच्या तक्रारी, वजन वाढण्याबाबत तक्रारी अजिबात नव्हत्या. आठवड्याच्या कामाच्या दिवसात ते  एकटेच व्यायाम करायचे. शनिवार-रविवार मात्र त्यांची नात सकाळच्या व्यायामाच्या वेळी आवर्जून हजर असायची. गुगलवर योगासनांचा चार्ट उघडून आपले आजोबा त्याप्रमाणे करतात की नाही हे बघायची. त्याना ग्रेडिंग द्यायची. आजोबांची योगासने इतकी परफेक्ट असायची की बहुतकरुन त्याना शंभरच्या आसपासच ग्रेड मिळत असत.

दरवेळी सोनिका विचारायची, की या योगासनांचे फायदे काय ? मग आजोबा सांगायचे, “बाळा योगासने नित्यनियमाने केल्यामुळे शरीर लवचिक होतं, मजबूत होतं. मन शांत होतं, मनाला उभारी येते. मनातले सगळे ताण तणाव निघून जातात, रक्तदाब वगैरे व्याधी नाहीशा होतात. माणूस निरोगी आणि सशक्त होतो.”

हा दर शनिवार रविवारचा उपक्रम. आजोबा आणि नात. सोनिका बरोबर हसत खेळत मधुकररावांचा व्यायाम आणि योगाभ्यास चालायचा. बाकी कोणीहि एकतर त्यावेळी तिथे जाग्यावर नसायचे, आणि चुकुन माकुन असले तरी या ॲक्टिविटीमधे कोणाला फारसा इंटरेस्ट नसायचा.

ऑक्टोबर महिना चालू होता. फॉल सीझन. झाडांची हिरवी पाने आता तपकिरी, लाल झाली होती. सृष्टीने आपले रंगरूप बदलले होते.

सोनिकाच्या शाळेत फॉल फेस्टिवल चालू झाला. रोज काही तरी कार्यक्रम असायचे, स्पर्धा, जवळपास सहली, वगैरे. रात्री जेवायच्या टेबलावर सगळे एकत्र जमले की सोनिका दिवसभराच्या शाळेतल्या गमतीजमती सगळ्यांना सांगायची. ताणावलेली मनं कळत नकळत जरा खुलवायची.

मग एक दिवस सोनिका सांगत आली की शाळेत "प्रेझेंटेशन" कार्यक्रम आहे. खूप मुलं भाग घेणार आहेत. आपापलं प्रोजेक्ट प्रेझेंट करणार आहेत. पालकानाही प्रेक्षक म्हणून बोलावलं आहे. आपल्या घरून ममी, डॅड,आजोबा, आजी ..कोणी येणार का ? आठवड्यातला कामाचा दिवस असल्याने ममी डॅडी नी काहीच उत्तर दिलं नाही. आजोबा आजींचा काही बोलण्याचा प्रश्नच नव्हता. सोनिकाने समजून घेतलं, विषय तिथेच संपला, आणि मग जेवणं शांततेत पार पडली.

आणि दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सोनिका शाळेतून आली तीच आरडा ओरडा करत.

त्या आवाजाने घर इतकं दणाणून सोडलं की वसंत आणि स्मिता आपापल्या खोल्यांची दारं उघडून, काय झालं ते बघायला बाहेर आले. कसलंतरी सर्टिफिकेट फडफडावत सोनिका नाचत होती.

स्मिताने पुढे होऊन सोनिकाच्या हातातून सर्टिफिकेट काढून घेतलं आणि ते वाचून आश्चर्याने ती म्हणाली,“काय, शाळेत झालेल्या प्रेझेंटेशन स्पर्धेत पहिले बक्षिस”?

“अगं काय केलेस तरी काय तू, एवढ्या सगळ्या मुलांमधे पहिला नंबर पटकावायला!” स्मिताने विचारलं.

“मम्मा, मी काय केलं, गुगल मधला योगासनांचा चार्ट स्क्रीनवर घेतला, माईकवर योगासन करण्याचे फायदे सांगितले आणि मग चार योगासने करून दाखवली. लोकांनी एवढ्या टाळ्या वाजवल्या की थांबेचनात. काही पालक तर उभेही राहिले”. सोनिकाने सांगितलं.

“अगं पण तू योगासनं शिकलीस कुठून, आणि तेही एवढ्या सगळ्या लोकांसमोर दाखवण्या इतपत?” स्मिताने विचारलं.

“आजोबा रोज करतात नं योगासनं ! ती बघून बघून मलाही यायला लागली आणि त्यांनी सांगितलेली माहिती मी चांगली लक्षात ठेवली मम्मा”. सोनिका म्हणाली.

त्या दिवशी रात्री झोपेपर्यंत बोलायला दुसरा विषयच नव्हता. सगळयानीच सोनिकाचं खूप कौतुक केलं.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास वसंताला सोनिकाच्या शाळेतून फोन आला. स्वत: प्रिन्सिपाल बोलत होते, “मिस्टर योशी, मला तुमच्याशी काही महत्त्वाचे बोलायचंय. उद्या सकाळी दहा वाजता शाळेत, माझ्या ऑफिस मधे येऊ शकाल का तुम्ही? आणि हो, तुमच्या वडिलांना, म्हणजे सोनिकाच्या आजोबांनाही घेऊन या बरोबर.”

"ज" चा "य" म्हणून हे लोक का उच्चार करतात हे वसंताला अजूनपर्यंत कळले नव्हतं पण ही वस्तुस्थिती होती खरी. आणि जोशीचा तो योशी झाला होता.

"ऑफिस मधे येऊन भेटा"!, "सोनिकाच्या आजोबांना घेऊन या"!. काय चाललंय काय? वसंताला काहीच कळेना. खरं तर वसंताने उद्यासाठी त्याच्या परदेशवासी म्हणजे ऑफ शोअर प्रोग्रॅमिंग टीम बरोबर दोन कॅाल ठरवले होते. पण शाळेत तर जायलाच पाहिजे होतं. तिकडे किती वेळ लागेल याबद्दल काहीच कल्पना नव्हती. शेवटी सगळयांना मेल मेसेज पाठवून उद्याचं काम परवा वर ढकललं आणि शाळेसाठी आख्खा दिवस मोकळा ठेवला.

दुपारी जेवताना वसंताने झाल्या घडामोडीची कल्पना इतराना दिली.

"काय, मला सोनिकाच्या प्रिन्सिपालनी शाळेत बोलावलंय? अरे माझ्या अस्तित्वाबद्दल कल्पना तरी आहे का त्याना?" मधुकररावांची प्रतिक्रिया

"यांनापण शाळेत बोलावलंय? बरोबर ऐकलंस ना तू?" कमलताईंची प्रतिक्रिया.

"बाबांना कशाला प्रिन्सिपाल बोलावतील ? तुझीच ऐकण्यात चूक झाली असेल." स्मिताची प्रतिक्रिया.

आता वसंतालाही शंका आली, आपण नीट ऐकलंय की नाही ? चार वाजता सोनिका आल्यावरच थोडा फार प्रकाश पडण्याची शक्यता होती.

"भुकेलं मूल घरात शिरल्याबरोबर भडीमार करु नका रे तिच्यावर. तिला जरा हात पाय धुवून खाऊ पिऊ द्या, अन् नंतर विचारा काय विचारायचं ते". कमलताईनी सगळयांना दटावलं.

पण दारातून शिरतानाच सोनिकाने मोठ्याने ओरडून सांगितलं, “आजोबांना प्रिन्सिपालनी बोलावलंय उद्या शाळेत. मला योगासनांबद्दल विचारत होते आधी, पण मी सांगितलं की मला काही जास्त माहिती नाही, माझ्या आजोबांना विचारा.”

सर्वांनाच थोडं संशय निवारण झाल्यासारखं वाटलं खरं, पण गोऱ्या साहेबाला एकदम योगाभ्यासाबद्दल का जिज्ञासा उत्पन्न झाली असावी ते कळेना.

दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता वसंता आणि मधुकरराव सोनिकाच्या शाळेत पोहोचले. प्रिन्सिपालबरोबर वसंताची साधारण ओळख होतीच. वसंताने प्रिन्सिपाल साहेबांची बाबांशी ओळख करून दिली.

“काल सोनिकाने योगासनांचं प्रात्यक्षिक फारच सुंदर करून दाखवलं. गुणी मुलगी आहे ती.” प्रिन्सिपाल हसतमुखाने वसंताला म्हणाले. नंतर त्यानी मधुकररावांकडे आपला मोहरा वळवला. “मिस्टर योशी, ही प्रात्यक्षिकं तुमच्याकडून शिकली असं म्हणाली ती. तुम्हीपण योगासनं करता का?”

मधुकररावाना हसू आलं. “सर्टिफाईड योगा टीचर आहे मी. स्टेट लेवलला आणि भारताच्या वेस्टर्न झोनमधे केंद्र सरकारने घेतलेल्या योगा ट्रेनर परिक्षांमधे मला गोल्ड मेडल मिळाले आहे. माझे नाशिक मधले योगा क्लासेस शहरात ए वन ग्रेडला आहेत.” मधुकर रावानी अभिमानाने माहिती पुरवली.

प्रिन्सिपाल साहेबांच्या चेहऱ्यावर थोडीशी आदर भावना दिसली.

“ही फारच चांगली गोष्ट आहे. मला आमच्या ट्रस्टीना कळवलीच पाहिजे.” प्रिन्सिपाल म्हणाले, “असं पहा मिस्टर योशी, कालच्या कार्यक्रमाला बरेचसे पालक हजर होते, तसंच आमच्या शाळेचे दोन ट्रस्टीही आले होते, परीक्षक म्हणून. सर्व परीक्षकानी मिळून सोनिकाला पहिला क्रमांक दिला, आणि ट्रस्टीनी नंतर फोन करून

तिच्या ट्रेनिंग बद्दल आणि शिक्षकाबद्दल माहिती मिळवायला सांगितलं. मी बोलतो त्यांच्याबरोबर आणि तुम्ही इथे आल्याचे कळवतो.”

प्रिन्सिपालनी ट्रस्टींबरोबर फोनवर चर्चा केली. मधुकररावांच्या योगसाधनेच्या नैपुण्याबद्दल ऐकून आणि विशेषत्वे गवर्मेंट सर्टिफिकेटबद्दल ऐकल्यावर ट्रस्टी खुष झाले. ते म्हणाले, “योगाभ्यासाला प्राधान्य देणाऱ्या शाळांचे रेटिंग वाढवण्याचा फेडरल गवर्मेंटने निर्णय घेतला आहे. हा भारत सरकारने सर्टिफाय केलेला, सुवर्ण पदक देऊन सन्मानित केलेला प्रशिक्षक आपल्या पायानी तुमच्याकडे चालत आला आहे. त्याला सोडू नका.”

प्रिन्सिपाल गंभीर झाले. फोन खाली ठेवल्यावर मधुकररावांकडे वळून प्रिन्सिपाल म्हणाले, “ट्रस्टी तुमची शाळेसाठी व्हिजिटिंग योगा टीचर म्हणून नेमणुक करु इच्छितायत. तुमची हरकत नसेल तर पुढे विचार करू असं म्हणतायत.”

मधुकरराव काही बोलण्या अगोदरच वसंता पट्कन् म्हणाला, “ते नाही शक्य सर, माझे वडील इथे अस्थलांतरीत बी २ व्हिसा वर म्हणजे टूरिस्ट व्हिसावर आले आहेत. त्याना ट्रेनिंग प्रोग्राम नाही करता येणार”.

प्रिन्सिपल साहेबानी परत ट्रस्टीना फोन केला आणि या नव्या अडचणीबद्दल त्याना कल्पना दिली. ट्रस्टी म्हणाले, “आपल्याला हा मनुष्य सोडुन चालणार नाही. गवर्मेंट सर्टिफाईड आहे, वाकबगार आहे आणि क्लासेस घेण्याचा अनुभव आहे. बघूया आपण काय करता येतं ते. तसं सांगून द्या त्याना.”

प्रिन्सिपाल साहेबानी, “विचार करून सांगतो” असे बोलून मीटिंग संपवली.

घरी सगळ्यानाच उत्सुकता होती. कशाला बोलावलं होतं, काय बोलणं झालं, आणि इथल्या शाळेशी बाबांचा काय संबंध !

घरात शिरल्याबरोबर वसंता आपल्या गुहेत घुसला आणि त्याने दार लावून घेतलं. मग मधुकररावानीच सगळी इत्थंभूत कथा कमलताईना आणि स्मितालाही सांगितली.

“सोनिकानी बराच गोंधळ करून ठेवलाय”. स्मिता उद्गारली.

“नको त्या पोराला उगीच दोष देऊ. हे निस्तरतील सर्व.” आपल्या वर वर बोलण्याला फारसा अर्थ नाही हे कमलताई जाणून होत्या.

“अहो, इकडे बघा, काय करायचं ठरवलंय तुम्ही? उगीच घिसाडघाईने काहीतरी निर्णय घेऊ नका. ही अमेरीका आहे. इथे कोणी काही फुकट मागत नाही. पैसे देतील ते तुम्हाला. डॉलर मधे.” कमलताई म्हणाल्या.

“पैसे? आणि तेही डॉलर मधे?” मधुकरराव विचारात पडले. जरा सकारात्मक विचार करू लागले.

दुसऱ्या दिवशी परत प्रिन्सिपालचा वसंताला फोन, उद्या सकाळी दहा वाजता वडिलांना घेऊन शाळेत या. त्यांच्यासाठी आमच्याकडे एक इंटरेस्टिंग ऑफर आहे, म्हणून.

वसंता कामाच्या ओझ्याखाली चिरडीला आला होता.

“प्रॉजेक्टची डेडलाईन गाठायची आहे मला. ऑफ शोअर टीमना गाईड करायचंय. मॅनेजमेंटने मानेवर खडा ठेवलाय माझ्या. एच वन बी व्हिसाचे स्पोन्सर आहेत ना, वाढीव मुदतीचे अमिष दाखवतायत. मी नाही बाबाना शाळेत नेऊ शकणार. आणि जायचं कशाला, नुसत्या हवेतल्या वावड्या उडवायला.” वसंता म्हणाला, आणि प्रिन्सिपालना त्याने विनम्रपणे तसं सांगूनही टाकलं.

पण प्रिन्सिपाल माघार घ्यायला तयार नव्हते. परत अर्ध्या तासाने फोन. “डॅडींसाठी गाडीची सोय केली आहे. आमचे जिम इन्स्ट्रक्टर मिस्टर निकोल्सन

येतील तुमच्याकडे सकाळी दहा वाजता शाळेत घेऊन जायला. आणि तासा - दोन तासांनी त्याना परत घरी आणून सोडतील. मग तर काही काळजी नाही ना ? आणि हां, पासपोर्ट ची कॅापी आणली तर बरं होईल. सध्याचा व्हिसा कोणत्या प्रकारचा आहे ते कळेल”.

“ठीक आहे जाऊन येईन मी उद्या. काय म्हणतायत ते तरी पाहू.” मधुकरराव म्हणाले.

वसंता आणि स्मिताने सुटकेचा नि:श्वास सोडला. शाळेला नाराज करणं अयोग्य असल्याची मनोमन जाणीव होती त्याना.

मधुकररावाना रात्री बराच वेळ झोप येईना. नाशिकला परतण्याची वेळ जवळ आली होती, त्यांचे पार्टनर नामजोशी रोज फोन करत होते. धंद्याला तगवण्यासाठी लागणाऱ्या दहा लाख रूपयांच्या भांडवलाची कशी व्यवस्था करायची याबद्दल त्यांना बोलायचं होतं, क्लास चे विद्यार्थी त्यांच्या परतण्याची वाट पहात होते. परत आपल्या ओळखीच्या विश्वाकडे जाण्याची ओढही होती. शेवटी, उद्याचं उद्या बघू, असं मनाशी म्हणून मधुकररावानी कुस पालटली आणि ते झोपी गेले.

-----------------

“या मिस्टर योशी, बसा.” प्रिन्सिपालने आपल्या ऑफिस मधे मधुकररावांचं सुहास्य स्वागत केलं. ऑफिस मधे आणखी एक सद् गृहस्थ बसलेले होते. प्रिन्सिपालने ओळख करून दिली. “मिस्टर योशी, हे मिस्टर कूपर, शाळेचे ट्रस्टी आणि इथल्या लोकल बॉडीचे मेंबरही आहेत.”

कूपर साहेबांनी हस्तांदोलना साठी हात पुढे केला. हस्तांदोलन झाल्यावर कूपर साहेब म्हणाले, “मिस्टर योशी, तुम्हाला भेटून आनंद झाला. तुमच्या

योगासनांतल्या नैपुण्याबद्दल आणि विद्यार्थ्यांना योगाभ्यास शिकवण्याच्या हतोटीबद्दल नाशिकमध्ये तुमची बरीच ख्याती आहे म्हणे. माझा एक मित्र नाशिकला असतो, त्याचा काल फोन आला होता त्या वेळी ही माहिती कळली.”

मधुकरराव जरा चरकलेच. “नाशिकचा मित्र कसला? यांच्या गुप्तचर खात्याने काढली असणार ही माहिती लगोलग. सरकार दरबारी वजनदार आसामी दिसतेय”. मधुकररावांनी विचार केला.

“मिस्टर योशी या काउंटीमधे आमच्या दोन शाळा आहेत. प्रत्येक ठिकाणी प्रायमरी स्कूल विभाग आहे अन् मिडल स्कूल विभाग आहे. प्रत्येक विभागासाठी आपल्याला आठवड्याला दोन तासांचं एक योगाभ्यास ट्रेनिंग सेशन घ्यायचंय. म्हणजे आठवड्याचे आठ तास होतात. अशा रूटिनचं आम्हाला सहा महिन्यांचं कॉन्ट्रॅक्ट करायचं मनात आहे.” ट्रस्टी बोलत होते, मधुकर राव ऐकत होते. “तुमचं या क्षेत्रातलं नैपुण्य पहाता तुम्हाला एच वन व्हिसा मिळायला काही अडचण पडणार नाही. थोडं पेपर वर्क करायला लागेल, पण आम्ही तुम्हाला स्पोन्सर करू आणि एक्सप्रेस चॅनेल मधून आठवड्याभरात क्लिअर करून घेऊ”.

मुख्य अडथळ्यावर तर मार्ग शोधलेला दिसला.

थोडं थांबून ट्रस्टी पुढे म्हणाले, “या कामाबद्दल मानधन म्हणून, मिस्टर योशी, आम्ही तुम्हाला तासाला पन्नास डॉलर देऊ करतोय. इथल्या सुधारित नियमांप्रमाणे योगाभ्यासाच्या निगडित उत्पन्नावर इथे अतिशय नाममात्र टॅक्स पडेल असं ऐकतोय”.

मधुकरराव ऐकत होते. ऐकून घेत होते. सगळं काही कळत होतं, पण सगळ्या गोष्टींचा मेळ कसा घालायचा ते काही उमजत नव्हतं.

“मी माझ्या मुलाशी बोलतो याबद्दल. थोडा वेळ द्या मला.” मधुकरराव म्हणाले आणि त्यानी मोबाईल उचलून वसंताला फोन लावला.

“हॅलो वसंता, शाळेचे लोक माझ्यासाठी ताबडतोब काम करण्याचा व्हिसा मिळवून देतो म्हणतायत आणि चार शाळांसाठी मिळून आठवड्यात आठ तास त्याना योगाभ्यासाचा क्लास पाहिजे. अशा रूटिनचं सहा महिन्यांचं कॉन्ट्रॅक्ट करू इच्छितायत ते.” मधुकर रावानी एका दमात वसंताला सांगून टाकलं

“अहो बाबा, इथे आमचंच बूड ठिकाणावर नाही तर तुम्ही कसले कॉन्ट्रॅक्ट करताय ? महिन्याभरात माझ्या वर्किंग व्हिसाची मुदत संपतेय. त्याचं जर एक्सटेन्शन नाही मिळालं आणि तोपर्यंत एम्प्लॉयमेंट ओथोरिजेशन डोक्युमेंट नाही आलं, तर आमची हद्दपारीच होणार. मग तुम्ही राहणार कुठे? आणि बाबा इथलं तुमच्याकडे ड्रायविंग लायसेन्स नाही, मग तुमची शाळेत ने आण कोण करणार ? विसरा सगळं बाबा आणि या जेवायला”. एवढं बोलून वसंताने संभाषण जवळ जवळ संपवलंच. तेवढ्यात त्याला आठवलं, “आणि हो, एक राहिलच, पगार किती देऊ केलाय”?

“तासाला पन्नास डॉलर मानधन देतो म्हणतायत आणि टॅक्स नाममात्र पडेल म्हणे.” माधवराव उत्तरले.

वसंता गप्प झाला. त्याने अर्धे मिनिट विचार केला. मग त्याचा सूर बराचसा बदलला. “बाबा, देऊ केलेलं मानधन तसं भरपूर आहे. आठवड्याचे चारशे डॉलर म्हणजे महिन्याला जवळ जवळ साडे सतराशे डॉलर पडतायत. हल्लीच्या रेटने सहा महिन्यां नंतर जवळ जवळ नऊ दहा लाख रूपये भारतात घेऊन जाल. विचार करण्यासारखी बाब आहे. बरंय बाबा माझा कॉल टाइम झालाय, ठेवतो मी फोन”. असे बोलून वसंताने फोन डिस्कनेक्ट केला.

“मिस्टर योशी, तुम्हाला मिस्टर निकोल्सन शाळा दाखवतील. जा, जरा फिरून या”. प्रिन्सिपाल म्हणाले.

मधुकररावानी शाळा बघितली. निकोल्सन सर फारच लोकप्रिय दिसले. भेटलेले बरेच शिक्षक त्याना हसून अभिवादन करत होते आणि ओघानेच मधुकररावानाही.

शाळा छानच वाटली. मिडल स्कूल मधली मुलं मधुकर रावाना बांध्याने जरा थोराड वाटली. योगाभ्यासाचा लवचिकपणा यांच्या शरिरात कितपत असेल याबद्दल मधुकरराव जरा साशंक होते.

मधुकरराव नजरेने टिप्पणी करत होते. मनात टॉप गिअर मधे विचारही चालू होते. एक पवित्रा आकार घेत होता. एका दगडात दोन चार पक्षी मारण्याची स्ट्रॅटेजी तयार होत होती.

ऑफिसमधे परत आल्यावर प्रिन्सिपाल साहेबानी विचारलं, “काय, कशी वाटली आमची शाळा?”

“फारच छान, इथे योगाभ्यासाचे धडे द्यायला आवडेल मला”. मधुकरराव म्हणाले. “एक दोन छोटे मोठे प्रॉब्लेम आहेत, त्यांच्यावर मात्र काही तोडगा निघाला तर बरं होईल”. मधुकरराव म्हणाले.

“सांगा काय प्रॉब्लेम आहेत ते, माझी खात्री आहे काही तरी उचित तोडगा नक्की निघेल”. यशाचा टप्पा समोर दिसत असताना कुठल्याही प्रकारे माघार घ्यायची प्रिन्सिपाल साहेबांची इच्छा नव्हती.

“एक तर माझ्या वाहतुकीचा प्रॉब्लेम आहे. माझ्याकडे गाडी नाही, ड्रायविंग लायसेन्स नाही आणि रोजची ने आण करायला कुटुंबात कोणाला शक्य नाही”. मधुकरराव म्हणाले.

प्रिन्सिपाल साहेबानी फोन करून कोणाशी तरी सल्ला मसलत केली. नंतर हसऱ्या चेहऱ्याने मधुकररावांकडे बघितलं आणि म्हणाले, “झाला तुमचा प्रॉब्लेम सॉल्व्ह. हॅरीची लिमोजिन सेवा आमच्या काही मुलांसाठी आम्ही भाड्याने ठेवली आहे. तो बघेल तुमच्या वेळापत्रका प्रमाणे तुमच्या वाहतुकीची व्यवस्था. तुम्ही लागेल तसं फक्त निकोल्सनना सांगायचं”.

आणखी एक जरा अवघड पण माझ्या दृष्टीनी अत्यावश्यक काम आहे.” मधुकरराव म्हणाले,

मी इथे माझ्या मुलाकडे राहणार. तोअसेल तरच मला स्थीरता येणार. मा झा मुलगा, अं … मशिन लर्निंग आणि आर्टिफिशिअल इंटेलिजन्स मधे अति नैपुण्यवान आहे. दोन वर्षांपूर्वी त्याने एम्प्लॉयमेंट ओथोरिजेशन डोक्युमेंटसाठी कागद्पत्र रुजू केलीत पण अजून मिळालं नाही.

आता त्याच्या अगदी गळ्याशी आलंय म्हणून द्रुत मार्गिकेमधून ईएडी कार्ड लवकर मिळू शकेल तर बरं.

तसं काही नियमबाह्य काम करायला सांगत नाही मी, पण नियमित मार्गानी प्रश्न सुटु शकेलसं मला वाटतंय”

प्रिन्सिपाल जरा विचारात पडले. जरा चाचरतच त्यांनी फोनवर ट्रस्टींशी बो लणं केलं. पण चार पाच मिनिटे बोलणं झाल्यावर त्यांनी फोन ठेवला आणि खुशीत त्यांनी माधुकररावाना सांगितलं ,

“काहीही काळजी करू नका म्हणत आहेत.”

निकोल्सनबरोबर घरी परतताना मधुकररावांच्या विचारांची गाडी भरधाव चालली होती. सहा महिन्याचं एक सलग कॉन्ट्रॅक्ट करण्या ऐवजी तीन महिन्यांच करावं.

वसंताचा वर्क व्हिसाचा प्रॉब्लेम टांगून पडलाय अजून. तीन महिने जरी काम केलं तरी चार- साडे चार लाख रुपये हातात पडतील. सहा महिन्यात साधारण आठ नऊ लाख रुपये होतात.

नाशिकच्या इलेक्ट्रिकल धंद्यात घालायला पाहिजेतच ते.

घर आलं. निकोल्सनना गुड बाय करून माधवरावानी घरात पाऊल टाकलं.

वसंता लिव्हिंग रूम मधेच सोफ्यावर बसला होता. माधवरावाना पाहताच त्याने आरोळी ठोकली. “बाबा, गुड न्यूज, गुड न्यूज. हे पहा काय आलं ?”

“काय आलं रे?” माधवरावानी आपला सरळ प्रश्न विचारला.

“ही बघा बाबा, आमच्या दोघांची ई ए डी आली. एक तासापूर्वीच कुरिअर देऊन गेला.” मधुकर रावांना आपल्या हातातले कार्ड दाखवत वसंता म्हणाला.

मधुकररावानी कार्ड निरखून पाहिलं. जगातल्या लक्षावधी याचकां मधून काही मोजक्या पुण्यवान लोकांना मिळणारे ते पसायदान अगदी आदरपूर्वक पाहिलं. मधुकरराव म्हणाले, “छान, छान. चांगली गोष्ट झाली वसंता”.

वसंत म्हणाला, “अहो बाबा, चांगली काय? अगदी सुपर बेस्ट झालंय. पूर्ण स्वातंत्र्य मिळालंय आम्हाला. आता कोणी हद्दपार करण्याची भीती नाही की कुठला धाक नाही. आता मागणी तसा भाव बाबा. आम्ही सहजपणे जॉब बदलू शकतो, स्वत:ची स्टार्टअप काढू शकतो. गुणवत्तेला अनुसरून खुल्या बाजारात उभे राहू शकतो. कायद्याच्या चौकटीत राहून कितीतरी उंच पंख पसरू शकतो.”

“अरे शाळेच्या ट्रस्टीना मी तुमचं ई ए डी शीघ्र गति मार्गिकेमधून लवकर पास करायला सांगितलं होतं, पण त्या आधीच ही चांगली घटना घटली”.

मधुकरराव म्हणाले, “आता फक्त वाहतुक सुविधेचीच माझी अट आहे आणि त्यांनी ती स्वीकारलीही आहे. शाळा चांगली आहे. पूर्ण फिरवून दाखवली मला.

“बाबा एवढ्या सगळया अटी घातल्या तुम्ही, त्या त्यानी स्वीकारल्या, शाळा दाखवली, चांगलं मानधन देऊ केलं. बाबा, तुमची व्हॅल्यू खूपच आहे”. वसंत म्हणाला. वसंताने थोडा विचार केला.

“बाबा मी काय म्हणतो, तुम्ही त्यांच्याबरोबर कॉन्ट्रॅक्ट जरूर करा, ताशी पन्नास डॉलर देऊ केलेत त्यानी, म्हणजे सहा महिन्यात दहा हजार डॉलर कमवाल तुम्ही, टॅक्स फ्री. तोपर्यंत आमची स्टार्टप सुध्दा सुरू होईल. तुम्ही पण तोपर्यंत एस्टॅब्लिश झाले असाल. मग आमच्या कंपनीतर्फे आम्ही तुम्हाला प्रमोट करू. अगदी पॅन अमेरिका प्रमोट करू. बाबा योगाभ्यासाला जगभरात मान्यता मिळाली आहे आणि हा देशही मागे रहाणार नाही. आणि मग बाबा, अगदी बॉस्टन ते ह्यूस्टन आणि डी सी पासून एल ए पर्यंत तुम्हाला प्रमोट करू. मग बाबा तुम्हाला साईड बाय साईड टूरिंग, साइट सीइंग पण करता येइल. व्हाइट हाउस काय, हॉलिवुड काय, अगदी सगळं सगळं बघता येईल.”

मधुकरराव ऐकत होते. वसंता बोलत होता, मधुकरराव ऐकत होते.

ऐकता ऐकता त्यांचे डोळे उघडत गेले. चर्मचक्षू, अंतर्चक्षू, ज्ञानचक्षू अगदी सगळे सगळे उघडले.

अनेक प्रश्न उभे राहिले. तडकाफडकी काहींची उत्तरंही आली. काही प्रश्न सद्सद्विवेक बुध्दीला कठोर परिक्षेला बसवत होते तर काही प्रश्न तळयात-मळयात उत्तराना झिडकारत होते.

योगाभ्यासाचं व्यापारीकरण करायचं की नाही? भारतातल्या होतकरू विद्यार्थ्यांना, योग साधनेची दुर्दम्य इच्छा असलेल्या साधकांना झटकुन टाकायचं की

ध्येयवादाचा पाठपुरावा करत, परदेशामध्ये चालत आलेल्या लक्ष्मीला माघारी फिरवायचं ?

ध्येयवाद की व्यापार ? स्वार्थ की नि:स्वार्थ ?

हे व्यापारीकरण थोडक्यात संपणारं नव्हतं. नशिबाने साथ दिल्यास अलोट संपत्ती मिळवून देऊ शकत होतं.

पण हे ही तितकंच खरं होतं की विद्येच्या हव्यासापेक्षा पैशांची हाव श्रेष्ठ ठरवणे हे लहानपणापासून बिंबवल्या गेलेल्या नैतिक मूल्यांच्या कसोटीला उतरत नव्हतं. योग्य वाटत नव्हतं.

आणि हे  दुष्टचक्र थांबणारं नव्हतं. एखाद्या आवर्ताप्रमाणे माणसाला गोल गोल फिरवत ठेवण्याची त्याच्यात ताकद होती.

मधुकररावांचा निश्चय झाला.

मधुकरराव उठले. हळू हळू पावलं टाकत आत गेले. कमलताईना म्हणाले, ‘‘कमल, चार दिवसांनी आपली फ्लाइट आहे मुंबईची. चल सामानाची बांधाबांध करू या.

——X——

# ५

# सर्वे भवन्तु सुखिनः

सॅन फ्रॅन्सिस्को च्या उत्तर दिशेला सुमारे ४० मैलावरच्या सॅन राफेल शहरातल्या एका सुखवस्तू भारतीय-अमेरिकन घरातली सकाळ.

डिंग डाँग. घड्याळाचे टोले पडले. पेंडसे कुटुंबाच्या लिव्हिंग रूम मधलं आजोबा घड्याळ सकाळची साडेसातची वेळ दाखवत होतं.

शीला ब्रेकफास्टची तयारी करत होती. विजय ब्रेकफास्टसाठी खाली आला. विजय आणि शीलाने सकाळी साडे सहाला उठायची स्वतःला सवयच लावून घेतली होती. डॉक्टर विजयचं क्लीनिक होतं, मिल व्हॅलीमधे. विजयला तिथे सकाळी साडे आठपर्यंत पोहोचायचं होतं. सकाळी, १०१ साउथ, एक्सप्रेस वे वर सॅन फ्रॅन्सिस्को च्या दिशेने वाहतूकीचा ओघ प्रचंड. त्यामुळे सॅन राफेल पासुन मिल व्हॅलीला क्लीनिकला पोहोचायला विजयला पाऊण तास सहज लागत असे.

"आज संध्याकाळी घरी यायला मला उशीर होईल जरा." विजय म्हणाला. "एक वेबिनॉर आहे नेटवर. घरून नाही त्याला लॉगिन करता येणार. क्लीनिकमधूनच बघायला पाहिजे."

शीला समजली की संध्याकाळी वेबिनॉर वगैरे काही नाही, नर्स लिझीबरोबर संध्याकाळी कुठेतरी कॉफीचा कार्यक्रम आहे. पण शीला काही बोलली नाही.

विजय क्लीनिकला निघुन गेला आणि शीला रोजच्या कामाला लागली. मुलं, शुभा आणि निखील अजुन वरच होती. शुभा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला. एरवी ती युनिव्हर्सिटी कॅंपस जवळ अपार्टमेंटमधे राहायची. सध्या दोन सेमिस्टरच्या मधला ब्रेक चालू होता आणि म्हणून ती सुट्टीला घरी आली होती.

निखिल बारावीत. त्याचं शाळेचं हे शेवटचं वर्ष. आता स्कूल ग्रॅज्युएशन जवळ आलं होतं आणि निखिलने जवळच्या युनिव्हर्सिटीज मधे ॲडमिशनसाठी अर्ज टाकायला सुरुवात केली होती.

ब्रेकफास्ट साठी साधारण नऊ वाजेपर्यंत मुलं खाली यायची. तोपर्यंत शीलाला वॉटसअप वर आजुबाजूच्या चविष्ट बातम्यांची देवाणघेवाण करायला उसंत मिळायची.

मोबाईल आणि काम, शीलाने दोन्ही बरोबरच चालू ठेवलं. तिने डिशवॉशर रिकामा केला. ग्लास, बशा, चमचे जागच्या जागी ठेवले. मग तिने स्वयंपाकाची पूर्वतयारी चालू केली.

विजय दुपारचं जेवण क्लीनिकमधेच घेत असे. शीला कामावर जाताना स्वतःचा डबा बरोबर न्यायची. पण मुलं तर घरी होती. दुपारी एक वाजेपर्यंत मुलं खाली यायची, आपापलं जेवण वाढून घ्यायची आणि जेवायची.

शीलाचं ऑफिस, जॉन रिअॅल्टरस्, सॅन राफेलच्या मध्यवर्ती भागात होतं. दोन माणसांचं ऑफिस. जॉन मालक आणि शीला फील्ड एजंट. शीलाची स्वत:ची दुपारच्या जेवणाची काही ठराविक वेळ नसायची की काही ठराविक ठिकाण नसायचं. कधी ती ऑफिसमध्ये बसूनच दुपारचा डबा खायची तर कधी दोन व्हिजिट च्या मधे, गाडी सोईस्कर पणे एखाद्या बगीचा च्या पार्किंग लॉटमधे झाडाच्या सावलीत पार्क करून झटपट लंच उरकायची.

सकाळची सगळी कामं उरकून अकरा वाजता शीलाने आपली गाडी काढली आणि पंधरा मिनिटांत ती ऑफिसमध्ये पोहोचली.

शीलाने गाडी पार्क केली. उतरून ती आत आपल्या डेस्ककडे गेली. कोट काढला, खुर्चीच्या मागे लावला. मग ती जॉनच्या डेस्ककडे गेली आणि समोरची खुर्ची ओढून बसली.

शीलाच्या "गुड मॉर्निंग" ला दाद दिल्यावर जॉन म्हणाला, "शीला, आज दोन व्हिजिट आहेत. एक घर इथे सॅन राफेल मधेच आहे आणि दुसरं सन व्हॅलीमधे आहे. दोन्ही मध्यम किमतीच्या प्रॉपर्टी आहेत. या घे दोन्ही घरांच्या चाव्या आणि हे कागदपत्र."

शीलाने कागदपत्र पाहिले, सर्व वस्तू आपल्या बॅगमधे टाकल्या, कोट, बॅग, पर्स घेऊन ती निघाली.

दिवस ठीक गेला. दोन्ही ठिकाणी गिऱ्हाईकानी शीलाला उत्तम सहकार्य दिलं. त्यांच्या प्रश्नांना शीलाने व्यवस्थित उत्तरे दिली, शंकाचं यथोचित निरसन केलं. गिऱ्हाईकानी प्रॉपर्टीजच्या किमती ऐकून भृकुटी वर केली नाही. एकंदरीत लक्षणं ठीक होती.

पहिली व्हिजिट पार पडल्यानंतर, सन व्हॅलीला जाता जाता वाटेत गाडी थांबवून शीलानं आपलं झटपट जेवण उरकलं. दूसरी व्हिजिट संपेपर्यंत दुपारचे चार वाजले. ऑफिसला जाण्यात फारसा अर्थ नव्हता. शीला घरी पोहोचली. घरुनच लॅपटॉप वर लॉग ऑन करून शीलाने आपला दिवसाचा रिपोर्ट जॉनला पाठवून दिला. मग शीलाने स्वतःसाठी गरम गरम मसाला चाय बनवला. चहाचा कप आणि मोबाईल घेउन फॅमिली रूममधल्या तिच्या आवडत्या सोफावर तिने ऐसपैस मुक्काम

ठोकला. जगभर पसरलेल्या तिच्या मैत्रिणी, कझिन्स यांच्या गराड्यात पुढचा एक तास मजेत गेला.

रात्री आठ वाजता विजय घरी आला. शीलाने मुलांना हाक मारली आणि साडेआठपर्यंत किचन टेबलवर फॅमिली जेवायला बसली. दिवसभर सगळे कुठेही असोत, रात्रीचं जेवण सर्वांनी एकत्रच घ्यायचं असा शीलाचा कटाक्ष असायचा.

जेवता जेवता मधेच निखिल म्हणाला, "डॅड, या बर्कले, सान्ता बार्बरा, डेविस वगैरे युनिवर्सिटीज मधे प्रवेश घेण्यात मला काही अर्थ वाटत नाही. भरमसाठ फी. त्यापेक्षा डॅड, मी स्टेट युनिव्हर्सिटी मधे ॲडमिशन घेतो. तिथे फी माफक आणि शिक्षणाचा दर्जा काही फारसा कमी नसणार तिथे".

विजयने मान डोलावली. "ठीक आहे, तुला योग्य वाटेल ते कर".

शीलाला हा संवाद ऐकून धक्काच बसला. निखिलने जेव्हा या सगळ्या मोठ्या युनिव्हर्सिटी ना अर्ज टाकायला सुरुवात केली होती तेव्हा विजय सतत त्याच्या बरोबर होता. निखिलबरोबर बसून त्याने लिहिलेले अर्ज विजयने सुधारले होते. पण नंतर, जेव्हा निखिल ने आपला प्री मेडिकल कोर्सला जायचा विचार नाही असं सांगितलं होतं, तेव्हा पासून विजयने या ॲडमिशन प्रोसेस मधून आपलं अंग पूर्ण पणे काढून घेतलं होतं. आताही, निखिल एवढा महत्त्वाचा निर्णय घेत असताना, विजय आपण त्या गावचेच नाही असं दाखवत होता.

शीलाला निखिलचा हा निर्णय अजिबात आवडला नाही. वास्तविक पहाता, विजयची प्रॅक्टिस चांगली होती. शीलाही कमवत होती. चांगल्या युनिव्हर्सिटीची लठ्ठ फी देण्याची कुटुंबाची ऐपत होती. त्यामुळे निखिलने दाखवलेलं खर्चाचं कारण सयुक्तिक वाटत नव्हतं. या प्रकरणाचा छडा लावायलाच हवा होता.

जेवणं संपली. शीलाने शुभाच्या मदतीने टेबल आवरलं. विजयने बशा स्वच्छ केल्या. शीलाने बशा आणि कटलरी डिश वॉशरमधे लावून डिश वॉशर चालू केला.  विजय त्याचा वाईनचा ग्लास घेऊन फॅमिली रूम मधे गेला आणि शीला मोबाईल घेऊन बेडरूम मधे गेली.

शीलाने नीलाला फोन केला. नीला आणि शीला नाशिकच्या शाळेपासूनच्या मैत्रिणी.  नीला सॅन राफेलला जवळच रहायची, मिलर क्रीकला.  त्या दोघी  कोणताही महत्त्वाचा निर्णय एकमेकांच्या सल्ला मसलतीशिवाय घेत नसत.

नीलाने फोन उचलला. "हॅलो शीला, कशी आहेस तू?" नीलाने विचारले .

पाच एक मिनिटं इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर नीलाला जाणवलं की शीलाचा मूड आज ऑफ आहे .

"शीला, काही प्रॉब्लेम आहे का, गप्पांमधे मन नाही दिसत तुझं." शीलाने विचारलं.

"काय सांगायचं, नेहमीच्याच व्यथा." शीला म्हणाली.  "विजयचा त्या सिस्टर लिझीबरोबर जरा जास्त अघळपघळपणा चालूच आहे. हे थांबवायलाच पाहिजे. आणि  आता या निखिल ने एक नवं संकट आणलं आहे."

नीलाला काळजी वाटली. "काय शीला, असं झालंय तरी काय?" नीलाने विचारलं.

"अगं निखिलनी नवंच खूळ काढलंय. सगळ्या नावाजलेल्या युनिव्हर्सिटी सोडून स्टेट युनिव्हर्सिटी मधे ॲडमिशन घ्यायची म्हणतोय." शीला म्हणाली. "दिवसभर गिऱ्हाईकांना घरं दाखवत फिरून माझा जीव अगदी मेटाकुटीला येतो, आणि त्यातून ही दोन संकटं ! माझं तर डोकंच सुन्न झालंय".

नीलाला वाईट वाटलं. तिच्या मते पेंडसे कुटुंब एक आदर्श कुटुंब होतं, आणि शीला तिची आवडती मैत्रीण होती, सुस्वभावी, कामसू आणि हुषार. नीलाच्या लक्षात आलं की सगळ्या अडचणी शीलाच्या गळ्यापर्यंत आल्यामुळे आणि गुंता सोडवण्याचा मार्ग दिसत नसल्याने ती कासावीस झालेली आहे.

नीला ने क्षणभर विचार केला. "शीला, निखिल हुषार मुलगा आहे. त्याचं आता पर्यंतचं रेकॉर्ड चांगलं आहे. एकदम अशी कोलांटी मारायला झालं तरी काय? एक सांग मला, निखिलचे जवळचे मित्र मैत्रिणी, ते कोठे अॅडमिशन घेणार आहेत?" नीलाने विचारले.

"नीला, निखिलचा छोटासा पाच सहा जणांचा ग्रुप आहे. त्यापैकी दोन मुलं, मिच आणि रिची, इतिहास, इंग्लिश साहित्य शिकणार आहेत. तिसरा मकरंद, इंजिनीयरींग ला जाणार आहे आणि मुलींमधे मारिया जर्नॅलिझम ला जाईल. उरली ती अॅलिस, लिझीची मुलगी. हुषार आहे. ती बहुतेक सायन्सला जाईल." शीला म्हणाली.

"शीला, मला वाटतंय की हा प्रॉब्लेम लिझीच्या अॅलिसमुळे झालाय. जरा नीट चौकशी कर. मग बोलू आपण. नीलाने धीर दिला. "काही घाबरू नकोस, सगळं व्यवस्थित होईल."

दुसऱ्या दिवशी शनिवार.

सकाळचे साडेनऊ वाजले होते. मुलांचा ब्रेकफास्ट चालला होता. शीलाने सहज बोलता बोलता निखिलला विचारलं, "निखिल, तुझ्या मित्रमंडळीनी अखेरीस काय ठरवलंय कॉलेजेस बद्दल ?"

"मम्मा, मिच आणि रिची इतिहास हा मेजर विषय घेऊन शिकागोला जाणार आहेत. तिथल्या आर्ट म्युझिअमला संलग्न प्रसिध्द कॉलेज आहे तिथे. आणि मम्मा,

मकरंद न्यू जर्सी ला जाणार आहे , मेकॅनिकल इंजिनियरिंग शिकायला. त्याचे काका तिकडे आहेत."  निखिलने माहिती पुरवली.

"आणि मुलींचा काय विचार आहे ? त्या कॉलेजला जाणार आहेत की नाही ?" शीलाने पुढे चौकशी केली.

"मम्मा, मारिया ला जास्त शिकायचं नाही.  ती सॅन फ्रान्सिस्कोमधे जर्नालिझमचा कोर्स करणार आहे." निखील म्हणाला,  "ॲलिस  हुषार आहे. तिला सायन्सला जायचंय. पण मम्मा तिला एक प्रॉब्लेम आहे. बेन थॉम्पसनचं, म्हणजे ॲलिसच्या वडिलांचं सुपरमार्केटमधलं कॉन्ट्रॅक्ट संपतंय. ते काही त्यांना वाढवून मिळणार नाही. म्हणजे, टर्मिनेशन. इथलं सॅन राफेल मधलं घर विकून सांता रोजाला स्वस्त अपार्टमेंटमधे रहायला जायचा त्यांचा विचार आहे आणि ॲलिस स्टेट युनिव्हर्सिटी मधे ॲडमिशन घेईल.

शीलाला तिच्या प्रश्नाचं उत्तर मिळालं.

रात्री शीलाने नीलाला फोन केला. "नीला, तुझा कयास बरोबर निघाला नीला." शीला म्हणाली. "त्या ॲलिसमुळेच निखिल असं उलट सुलट बोलतोय. हे लिझीचं कुटुंब आमच्या पाचवीलाच पूजलंय. सगळीकडे लिझीच्या कुटुंबियांमुळे प्रॉब्लेम झालेले आहेत. एक काहीतरी झटपट निकाल लावला पाहिजे."

नीला टी व्ही वर गुन्हेगारीसंबंधात कार्यक्रम नेहमी पहात असे. त्यामुळे शीलाचं बोलणं ऐकून तिच्या मनात धोक्याची एकच पाल चुकचुकली.

"शीला," नीला म्हणाली. "अगं रागाच्या भरात कोणा मारेकऱ्याला सुपारी देऊ नकोस हं, सगळ्या थॉम्पसन कुटुंबाला उडवायला. आपण सबूरीने घेऊ, विचार करू आणि मार्ग काढू."

शीलाला हसू आलं आणि असली काही अघोरी उपाययोजना आपल्या मनात नसल्याची तिने नीलाला ग्वाही दिली.  नीलालाही हायसं वाटलं.

आणखी थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या आणि फोन बंद झाला.

सोमवार उजाडला. नेहमी प्रमाणे सकाळी साडे अकराच्या सुमारास शीला ऑफिसमधे पोहोचली. जॉनने तिला हाक मारली. "शीला,"  आपल्या हातातला कागद दाखवत  जॉन तिला म्हणाला, "देशमुख बिल्डर्स कडून हे पत्र आलंय, बाहेरच्या प्रॉपर्टीबद्दल. फ्लोरिडामधे ताम्पा सिटी जवळ ते एक जेष्ठ नागरिकांसाठी वसाहत बांधतायत. निर्वाणा. या प्रॉपर्टीज ची विक्री करायचं काम आपल्याला घ्यायचंय का, याबद्दल त्यानी विचारणा केली आहे."

हातातल्या कागदाना न्याहाळत जॉन पुढे म्हणाला, त्यांचं ऑफिस इथे साउसोलीटो मधे आहे. जरा त्याना जाऊन भेट आणि पहा काय म्हणतायत ते."
जॉन पुढे म्हणाला, "या देशमुख बिल्डरनी शिकागोला एकदोन चांगली प्रॉजेक्टस् केली आहेत म्हणे."

शीलाने जॉनकडून ते पत्र घेतलं. वाचलं. ती आपल्या डेस्ककडे गेली. कोट, बॅग आणि पर्स उचलले आणि ती बाहेर पडली.

शीलाने प्रथम गाडी गॅस स्टेशन कडे वळवली.  गॅस व्हेंडिंग मशीन मधे कार्ड घालून गाडीत गॅसोलीन फुल टँक करून घेतलं. आणि मग १०१ साउथ एक्सप्रेसवे घेऊन सॅन फ्रॅन्सिस्को ची वाट धरली. गोल्डन गेट ब्रिजच्या अलिकडे साउसोलीटोचा एक्झिट.

साउसोलीटो. कोट्याधीशांची नगरी. कधी सोनेरी ऊनात न्हालेली, तर कधी डोंगरावरून ढगांची बरसात. उजवीकडे  बाजारपेठ आणि पुढे वर डोंगराच्या खोबणीत, कपारीत वसलेले कोट्याधिशांचे बंगले, घरं, अपार्टमेंटस्. डावीकडे

खाडीमधे कोट्याधिशांच्या शेकडो बोटी. मधोमध गोल्डन गेट ब्रिज, सदैव राखण करत उभा.

शीलाला आठवलं, पूर्वी लोक येता जाता कौतुकाने बोट दाखवून, "हा आगासीचा बंगला", "हा मालय्याचा बंगला", असं सांगायचे. हल्ली मात्र ही कौतुकं बरीचशी ओसरली होती.

शीलाने एक्झिट घेतला. आणि उजवीकडे खाली वळून ती साउसोलीटोमधे शिरली. गाडीमधल्या जी पी एस ने बरोबर मार्गदर्शन केलं आणि शीलाने देशमुख बिल्डर्सचं ऑफिस शोधून काढलं. गाडी पार्क करून शीला वर गेली.

रिसेप्शनिस्टला शीलाने आपलं कार्ड दिलं आणि तिथल्या सोफ्यावर ती बसली.

दहा मिनिटानी शीलाला आतून बोलावणं आलं. शीला केबिनमधे गेली. डेस्कच्या मागे एक गोरा इसम बसलेला होता. शीलाला पाहून तो उठून उभा राहिला. निळे डोळे, सहा फूट उंची. शीला जरा संभ्रमात पडली.

"मी प्रकाश देशमुख ". त्या इसमाने आपली ओळख करून दिली. "आणि आपण शीला पेंडसे ना ? बसा."

दोघेही बसले.

"मला पाहून तुम्ही जरा बिचकल्यासारख्या दिसता! बरेच जण जरा विचारात पडतात खरे!" प्रकाश देशमुख शुध्द मराठीत बोलत होता. "माझी आई स्विडिश आहे आणि वडील कोकणस्थ ब्राह्मण. त्यांचं हे मिश्रण आहे."

शीलाला स्पष्टीकरण पटलं.

शीला आणि प्रकाश बोलू लागले. जगात कोठेही दोन उच्च शिक्षित मराठी माणसं जसं एकमेकांशी अर्धं मराठी अर्धं इंग्लिश बोलतात, तसं.

प्रकाशने सुरुवात केली "ताम्पा सिटीमधल्या आमच्या या जेष्ठ नागरिक वसाहतीचं नाव आहे निर्वाणा". आणि पुढे सुमारे अर्धा तास त्या प्रॉजेक्टबद्दल माहिती तो सांगत होता. शीलाही मधून मधून घरांच्या बांधकामाबद्दल, वित्तीय योजनेबद्दल त्याला माहिती विचारत होती आणि प्रकाश आपल्या परीने शंकासमाधान करत होता. वसाहतीतली घरकुलं कितपत विकली जातील याबद्दल प्रकाशच्या मनात जरा धाकधूक दिसली. फ्लोरिडा राज्यातल्या घरांच्या खरेदी-विक्री मार्केटबद्दल शीलालाही फारशी माहिती नव्हती. त्यामुळे चर्चेला भक्कम पाया मिळत नव्हता.

प्रकाश म्हणाला "आपण आता जरा ब्रेक घेऊ या का ? इथे कोपऱ्यावरच एक छोटं हॉटेल आहे. तिथे मी लंचला जात असतो. दीड वाजलेला आहे. तुम्ही माझ्या बरोबर तिथे लंचला याल का?"

शीला जायला उठली. "नो थँक्स", शीला म्हणाली. "मला पाहिजे होती ती सगळी माहिती मिळाली आहे. आता ऑफिसमध्ये जाऊन जॉनशी मी बोलीन, आणि नंतर काय ते पाहू."

प्रकाशचा निरोप घेऊन शीला साउसोलीटोहून सॅन राफेलला ऑफिसकडे यायला निघाली. बराच उशीर झालेला होता. नेहमीप्रमाणे वाटेतच तिने सोईस्कर ठिकाणी सावलीखाली गाडी उभी केली आणि आपलं झटपट लंच उरकलं.

ऑफिसमध्ये पोहोचल्यावर शीला जॉनला भेटली. पुढचा अर्धा तास शीला निर्वाणा प्रॉजेक्टची माहिती जॉनला सांगत होती. जॉन ऐकत होता. मान डोलावत होता.

सर्व ऐकून घेतल्यावर जॉन म्हणाला, " असं बघ शीला, आपला सध्याचा जो ग्राहक वर्ग आहे, तो इकडची, जवळपासची घरं घेणारा आहे. त्यापैकी कोणाला

या फ्लेरिडामधल्या वसाहतीत घरकुल घ्यायला फारसा इंटरेस्ट असेल, असं मला वाटत नाही. आणि असं पहा, आपल्याला फ्लोरिडाच्या मार्केटचाही काही अनुभव नाही. तेव्हा या नसत्या उठाठेवी कशाला करायच्या ? हां, एक आहे. हा बिल्डर चांगला आहे. त्याचे बॅंकांशी वगैरे संबंधही उत्तम आहेत. तेव्हा आपण असं करू, फ्लोरिडा राहू दे, पण त्याचे कॅलिफोर्निया मधे काही प्लॅन असतील, तर त्यासाठी आपण प्रपोजल देऊ या".

त्या दिवशी तो विषय तिथेच संपला.

आठवड्याचे पुढचे दिवस गडबडीत गेले. शीलाचं काम चालूच होतं. दाखवलेल्या दोन प्रॉपर्टींची डील्स झाली. भाव चांगला आला. जॉनने, पैसे हातात आल्यावर तिला लठ्ठ कमीशन द्यायचं कबूल केलं.

घरी मुलांचेही ऑन लाईन क्लासेस चालू होते, असाइनमेंटस्, सबमिशन्स चालू होती. सगळं वरकरणी ठीक चालले होतं, पण शीलाला टोचणी लावणारे प्रॉब्लेम जिथल्या तिथेच होते.

शनिवार आला. सकाळचा साडेनऊचा सुमार. मुलांचा ब्रेकफास्ट चालू होता.

शीलाने आपल्याला डाचत असलेला एक प्रश्न निखिलला विचारला. "काय रे निखिल", शीला म्हणाली "सुपरमार्केटचा जॉब सुटल्यावर मिस्टर थॉम्पसनना दुसरीकडे कुठे अकौंटंटचं काम नाही का मिळणार ?"

"नाही मम्मा." निखिल म्हणाला, "ॲलिस सांगत होती की तिचे वडील फार सरळ मार्गी आहेत आणि इतका सरळ मार्गी अकौंटंट इकडच्या कुठल्याही सुपरमार्केट ला नको आहे. असा त्यांचा प्रॉब्लेम झालाय".

थोड्या वेळाने विजयही तयार होऊन ब्रेकफास्ट साठी खाली आला.

"मला क्लिनिकला जावं लागणार आहे." ब्रेकफास्ट घेता घेता विजय म्हणाला, "पेशंटस् चे काही रेकॉर्ड चेक करायचेत. इन्शुरन्स कंपनी ने स्पष्टीकरण विचारलंय. लिझीलाही तिकडे बोलावलंय मी. जेवायच्या वेळेपर्यंत येईन परत असं वाटतंय."

"आलास तर बरं होईल. " शीला म्हणाली.

"डॅडी आज रात्री जेवायला बाहेर नं?" शुभा म्हणाली.

"हो तर, शनिवारची रात्र, धमाल रात्र". एवढं बोलून विजय निघून गेला.

---------

सोमवार आला.

जॉनबरोबर बसून शीलाने कॅलिफोर्नियामधल्या प्रॉजेक्टस् साठी देशमुख बिल्डरला द्यायला एक प्रपोजल तयार केलं.

शीलाने फोन करून प्रकाश देशमुखांची मंगळवार ची अपॉइंटमेंट घेतली.

मंगळवारी सकाळी शीलाने आपला मोर्चा साउसोलीटोकडे वळवला आणि अकरा पर्यंत ती प्रकाश च्या ऑफिसमध्ये पोहोचली. प्रकाश तिची वाटच पहात होता. अर्धा तास दोघांची मीटिंग चालली होती. शीलाने सावकाशपणे तिने तयार केलेलं कॅलिफोर्निया मधल्या प्रॉपर्टीज बद्दलचं प्रपोज प्रकाशला समजाऊन सांगितलं.

प्रकाशने सर्व ऐकून घेतलं. नंतर प्रकाश शीलाला म्हणाला, "तुमचं प्रपोजल तर व्यवस्थित आहे, पण आमची मुख्य अडचण अशी आहे, की या भागात बांधकाम करण्याबाबतचे नियम फार कडक आहेत. नवीन बांधकामाचे परवानेही मिळता मिळत नाहीत. इथे काय, शिकागोला काय, हाच प्रॉब्लेम झाला आहे. त्यापेक्षा, झगझगीत सूर्यप्रकाशाचं फ्लोरिडा सारखं राज्य बरं."

प्रकाशच्या तोंडून "झगझगीत सूर्य प्रकाशाचं फ्लोरिडा" हे शब्द ऐकून शीलाच्या डोक्यात वीज चमकली. एक अफलातून कल्पना तिच्या मनात डोकवायला लागली.

"खरंच, असं केलं तर ! पण हे कितपत शक्य आहे ? प्रकाशशी बोलायला हवं."

"प्रकाश, एक कल्पना आहे. असं पहा, झगझगीत सूर्यप्रकाशाचं आकर्षण भारतीयाना जास्त असतं." शीला म्हणाली, "सुमारे तीस चाळीस वर्षांपूर्वी, भारतातून, विशेषत: महाराष्ट्रातून, बरेचसे उच्च शिक्षित तरुण अमेरिकेत आले. इथे स्थाईक झाले. खूप कमाई केली. हा पूर्ण वर्ग आता निवृत्त झालाय आणि यातले बरेच जण आता चांगल्याशा जेष्ठ  नागरिक वसाहतीच्या शोधात असणार. आपल्याला या लोकांपर्यंत पोहोचायला पाहिजे.  मराठीतून, हिंदीतून, त्यांच्याशी बोलायला पाहिजे. आपण आपुलकी, आपलेपणा वाटेल अशा रीतीने या प्रॉजेक्टची माहिती जर त्यांना कळवली, तर मला वाटतं, नक्कीच आपल्याला त्यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळू शकेल."

प्रकाशने घड्याळ पाहिलं.  एक वाजून गेला होता. "चला आपण लंच घेऊ. तिकडे या कल्पनेवर आणखी उहापोह करता येईल." प्रकाशने सुचवलं.

शीलालाही आणखी बोलायचं होतंच. तिनेही  होकार दिला. दोघंही उठले, खाली उतरले आणि दोन मिनिटांच्या अंतरावर असलेल्या रेस्टॉरंट कडे गेले.

लंच टाईम असल्यामुळे गर्दी होती पण पाच मिनिटातच त्याना टेबल मिळालं.

प्रकाश ने बीयर आणि लार्ज चिकन बर्गर मागवलं. शीलाने पास्ता इन आल्फ्रेडो सॉस आणि  कोक मागवला.

बियरचे घोट आणि बर्गरचे घास घेता घेता प्रकाश ने निर्वाणा वसाहतीमधल्या इतर सोईंबद्दल, फायनान्स, कर्ज, मॉर्टगेजच्या दरां बद्दल, अटीं बद्दल शीलाला खूपशी माहिती दिली.

शीला म्हणाली, "प्रकाश, आम्ही सेल्समन आहोत. आपण या भारतीय लोकांशी बोलून तरी पाहू, माझी खात्री आहे प्रकाश, आम्ही, म्हणजे आमची कंपनी तुमच्या खांद्याला खांदा लावून या प्रॉजेक्टच्या विक्रीची पूर्ण बाजू सांभाळू शकेल. देशमुख बिल्डर्सचे सेल्स एजंट, जॉन रिॲल्टरस् "

लंच नंतर शीला सॅन राफेलला ऑफिसला परतली.

ऑफिसमधे आल्यावर फ्लोरिडाच्या निर्वाणा वसाहतीबद्दलची सर्व माहिती शीलाने जॉनला सांगितली. दोघांनी मिळून, गिऱ्हाइकांच्या सोईसाठी एक मॉडेल खरेदी प्लॅन तयार केला. फायनान्स- ऑक्युपाय-मॉर्टगेज. एक संलग्न प्लॅन. पण एवढं सगळं केल्यावरही जॉनला कळत नव्हतं, की गिऱ्हाईक वर्ग आहे कुठे ? त्याला शोधायचं कुठे? "महाराष्ट्रीयन अमेरिकन जेष्ठ नागरिक" असा कोणी गिऱ्हाईक वर्ग अमेरिकेत असू शकेल यावरच त्याचा विश्वास नव्हता. आणि समजा असा वर्ग असला, तरी त्या लोकांना ही घरं विकत घ्यायची ऐपत असेल का?

शीलाला जॉनचा कचखाऊपणा अगदी आवडला नाही. ती स्वतः उत्साहाने एवढी पेटलेली असताना जॉनने शंका कुशंका काढत, हाताची घडी घालून बसणं योग्य नाही, असं शीलाला वाटलं.

शीला म्हणाली, "ठीक आहे, जर जॉन रिॲल्टरस् हे काम करायला तयार नसतील तर शीला रिॲल्टरस् करतील. आणि जो काही फायदा होईल तो ७०/३० प्रमाणात वाटून घेऊ. शीलाचा एवढा आत्मविश्वास पाहून जॉन चकित झाला. त्याने मान डोलावली.

पुढचे चार दिवस शीलाने अनेक याद्या धुंडाळल्या. कॉलेजची रेकॉर्डस्, मोठ्या कंपन्यांच्या अधिकारी वर्गाच्या याद्या, स्टार्ट अप कंपन्यांच्या मालकांची सूची, हाॅस्पिटलांमधल्या डॉक्टर लोकांची नामावळी, मोठ्या शहरातल्या महाराष्ट्र मंडळांच्या सभासदांच्या याद्या, खूप खूप शोधलं, आणि चार दिवसांनंतर शीलाकडे महाराष्ट्रीय अमेरिकन, वयस्क लोकांची मोठी यादी तयार झाली. रानडे, कानडे, साठे, प्रधान, गुप्ते, भाटे, परब, काटदरे, शेंदुरे, कुलकर्णी, सातोस्कर, कोंडूजकर आणि कितीतरी जण.

यादी पाहून जॉन ने विचारलं, "हे कोण, कुठले लोक आहेत आणि चार पाच लाख डॉलरची घरकुलं घ्यायची यांची ऐपत आहे का?"

शीलाने त्याला सांगितलं, "हा अमेरिकेचा कणा आहे जॉन. आपली ताकद आहे. या सर्व इंजिनियर, डॉक्टर, शास्त्रज्ञ लोकांच्या शक्तीवरच आपण जगात ताठ मान करून उभे आहोत."

शीलाला या नावांबरोबर बहुतेक जणांचे ई मेल आय डी मिळाले.

यादी घेऊन शीला प्रकाशकडे गेली. प्रकाश ने वसाहतीच्या माहिती पत्राची सॉफ्ट कॉपी आणि एक वॉक थ्रू व्हिडिओ क्लिप शीलाला दिली. आता देशमुख बिल्डर्स आणि शीला रिॲल्टर्स निर्वाणा जेष्ठ नागरिक वसाहती साठी आपला प्रसिध्दी धमाका सुरू करायला सज्ज झाले.

शीलाने एक छोटं इ मेल पत्र तयार केलं आणि "शीला पेंडसे, (शीला रिॲल्टर्स), अशी सही करून सर्वांना पाठवून दिलं. माहिती पत्रक आणि व्हिडिओ क्लिप वेबसाईट वर लावले.

चार दिवसातच ई मेल ला प्रत्युतरं यायला लागली. बऱ्याच जणांना आणखी माहिती हवी होती.

शीलाने सगळया प्रश्नांचा आढावा घेतला. नंतर शीलाने एक सामाईक प्रश्नावली तयार केली. बरेचसे प्रश्न जवळपासच्या बाजारहाटाच्या सोईबद्दल होते. कित्येकानी जवळपासच्या दवाखान्याबद्दल किंवा रुग्णसेवेबद्दल चौकशी केली होती.

प्रकाशने प्रश्नावली पाहिली.

"हो, जीवनोपयोगी वस्तूंच्या, किराणा मालाच्या उपलब्धतेसाठी एक सुपरमार्केट या वसाहतीमधे असणार आहे. आणि एक मल्टी स्पेशालिटी क्लिनिकसुध्दा योजलेलं आहे." प्रकाश म्हणाला. " या दोन्ही सोयी निर्वाणा वसाहती बरोबरच  जवळच्या इतर वसाहतीत राहणाऱ्यांनाही उपयोगी पडतील."

प्रकाश पुढे म्हणाला, "सुपरमार्केटच्या अधिकारी वर्गाच्या जागांसाठी आम्ही इंटरव्ह्यू घ्यायलाही सुरुवात केली आहे."

शीलाच्या डोक्यात एक कल्पना चमकली.

"इथल्या, आमच्या जवळच्या  सुपरमार्केटमधून एक चांगला  अकाउंटंट लवकरच रिटायर  होतोय", शीला म्हणाली.

"तुम्ही बेन थॉम्प्सनबद्दल तर बोलत नाही ना ? कारण त्याचा आम्ही इंटरव्ह्यू घेतला होता आणि त्याला आम्ही सिलेक्टही केलं होतं. पण नंतर त्यानं आम्हाला घरच्या काही अडचणींमुळे आपण दिलगीर असल्याचं कळवलं". प्रकाश म्हणाला.

"प्रकाश, बेनची बायको  लिझी एक निष्णात नर्स आहे आणि तिला इथे क्लीनिकमधे चांगला जॉब आहे. तिने ही चांगल्या पगाराची नोकरी सोडावी असं त्या दोघांनाही वाटत नाही. " शीला म्हणाली.

"हा प्रॉब्लेम तर सोडवता येण्यासारखा आहे.". प्रकाश म्हणाला. "लिझी निष्णात नर्स असेल, तर तिला आपण आपल्या निर्वाणाच्या क्लिनिक मधे हेड नर्स ची जागा ऑफर करू या."

पुढचे दोन आठवडे गडबडीत गेले. प्रश्नोत्तरांचं सत्र चालूच होतं. लोकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे, शंकांनिरसनाची ई मेल, शीलाने त्याना पाठवून दिली. त्यावरही ज्या काही शंका उरल्या होत्या त्यांचं योग्य समाधानही शीलाने केलं. काही जणानी साईटवर वसाहतीला भेटही दिली.

पन्नास अर्जदारानी घरकुलांचं बुकिंग केलं, बुकिंगची टोकन रक्कमही भरली. निर्वाणा वसाहतीचा पहिला टप्पा पूर्ण पणे विकला गेला. शीलाने वेटिंग लिस्ट तयार केली. प्रकाशने निर्वाणा वसाहतीच्या दुसऱ्या टप्प्याची घोषणा केली. वेटिंग लिस्टमधल्या अर्जदारानी वसाहतीच्या दुसऱ्या टप्प्याच्या बुकिंग साठी अर्ज पाठवायला सुरुवात केली. शीला रिअॅल्टर्स च्या कामाचा पसारा खूपच वाढला.

प्रकाशने शीलाला फोन केला. "एक चांगली बातमी आहे, शीला." प्रकाश म्हणाला. "बेन थॉम्पसनने निर्वाणा सुपरमार्केट च्या ऑफरला होकार कळवला आहे, आणि लिझीने सुध्दा तिथल्या क्लिनिकमधल्या नेमणूकीला होकारार्थी उत्तर पाठवलं आहे. बेनने कळवलंय की सॅन राफेलमधलं घर ते विकून टाकतील आणि सगळं व्यवस्थित पार पडलं तर महिन्याभरात ते सगळे फ्लोरिडाला शिफ्ट होतील. त्यांच्या मुलीला, ॲलिसलाही फ्लोरिडाच्या कॉलेजमधे प्रवेश घ्यायला वेळ मिळेल."

---------------

पुढच्या दोन महिन्यात बऱ्याच घटना घडल्या.

शीला रिअॅलेटर्सनी निर्वाणाच्या दुसऱ्या टप्प्याचं बुकिंग सुरू केलं.

बेन, लिझी आणि ॲलिस थॉम्पसन फ्लोरिडाला शिफ्ट झाले. ॲलिसने फ्लोरिडाच्या स्टेट युनिव्हर्सिटीत प्रवेश  घेतला.

निखिल ने बर्कले युनिव्हर्सिटीमधे प्रवेश घेतला आणि ओरिएंटेशन क्लासेस साठी तो बर्कलेच्या होस्टेल मधे रहायला गेला.

शुभाचं नवीन वर्ष सुरु झालं आणि युनिव्हर्सिटी कॅम्पस मधल्या तिच्या अपार्टमेंटमधे ती रहायला गेली.

क्लिनिकमधून विजय रोज संध्याकाळी साडेसहा पर्यंत घरी यायला लागला आणि त्यामुळे त्याला जिम मधे जायलाही वेळ मिळायला लागला.

जॉनने फिल्ड एजंट म्हणून दुसऱ्या मुलीची नेमणूक केली पण तिच्या कामचुकारपणा बद्दल शीलाकडे रोज काही तरी तक्रार करायचा त्याचा नेमच पडला.

शीलाने एक दिवस नीलाला फोन केला

"ओह, शीला? अलभ्य लाभ. अगं तुझी गाठ पडणं तर काय, पण तुझ्याशी फोनवर बोलणंही दुर्लभ झालंय हल्ली !" नीला म्हणाली.

"अगं हो नं". शीला म्हणाली. "निर्वाणाच्या पहिल्या टप्प्याची कॉन्ट्रॅक्ट रजिस्टर करण्यात आणि दुसऱ्या टप्प्याची बुकिंगज् फायनल करण्यात फार बिझी आहे मी." शीला म्हणाली.

"ते खरंच आहे. पण आता वर्षभरात शुभाचा कोर्स संपेल आणि तुझ्या बिझनेस मधे मदत करायला जॉइन होईल ती". नीला म्हणाली .

"नाही नीला," शीला म्हणाली "शुभासाठी एक वेगळा प्लॅन आहे माझा. निर्वाणा च्या दुसऱ्या टप्प्यातल्या घरकुलासाठी बोस्टनच्या सुरेश रानडे नावाच्या सद्गृहस्थानी अर्ज केला आहे. शंकानिरसनासाठी बोललेत ते एकदोनदा माझ्या

बरोबर. त्यांचा मुलगा लग्नाचा आहे. एम आय टी चा ग्रॅज्युएट आहे तो. आमच्या शुभाला अगदी छान आहे बघ".

नीलाला बरं वाटलं. शीला खुशीत. शीलाचं अख्खं कुटुंब खुशीत.

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चिद् दुःखभाग्भवेत् ॥

-------X-------

# ६

# समझोता की समंजसपणा

दुबई एअरपोर्ट, टेर्मिनल वन च्या  गेट ३५ वर विमलताई बसल्या होत्या. सान फ्रान्सिस्कोला जाणाऱी फ्लाईट सुटायला अजून दीड तास अवकाश होता.  मुंबईहून आलेल्या फ्लाईट मधून बाहेर पडल्यावर दुबईच्या व्हीलचेअर वाल्या केरळीय मुलाने विमलताईंचा ताबा घेतला होता आणि सगळे सोपस्कार सुरळीतपणे आटोपून योग्य त्या गेटपाशी त्याना आणुन बसवलं होतं. फ्लाईट बोर्डिंगची घोषणा व्हायला अजून पाऊण एक तासाचा अवकाश असणार. त्या सुमारास व्हीलचेअरवाला परत येणार हे नक्की होतं. विमलताई निश्चिंत होत्या.

रात्रीचा एक वाजला होता, पण इंटरनॅशनल एअरपोर्टवर कसला दिवस आणि कसली रात्र !

विमलताईंची अमेरिकेची ही दुसरी ट्रिप होती.

विमलताईनी बसल्या बसल्याच डोळे मिटून घेतले आणि भूतकाळातील मोजक्या घटनांचा एक चलतचित्रपट त्यांच्या डोळयापुढे सरकायला लागला.

---

दहा वर्षां पूर्वी रविराजचं लग्न झालं. शांतारामही होते त्यावेळी, चांगले धडधाकट होते. रिटायरमेंटनंतर दुसरी इनिंग व्यवस्थित चालली होती. रविराजला शशीची ऑफर शांतारामच्या ऑफिस मधल्याच मित्राकडून आली होती. मुलगी

शिकलेली, आपल्याच जातीची आणि बोला-वागायला ठीक वाटली. जास्त चिकित्सा करत मग कोणी बसलं नाही.  लग्न ठरलं. जवळचाच मुहुर्त धरला. रविराजला सुट्टी जास्त नव्हती. आठवड्याभराने हनिमून नंतर तो अमेरिकेला निघून गेला.

शशीचा “पत्नी-व्हिसा” यायला पुढे एक महिना लागला.  विमलताईनी तिला माहेरी जाऊन रहाण्याची पूर्ण मुभा दिली होती, पण "नाही आई, नाही आई" करत बहुतेक वेळ तिने पार्ल्याला विमलताई आणि शांताराम बरोबरच काढला. घरातील रीतीरिवाज, रविराज ला आवडणाऱ्या पदार्थांची कृती अशा अनेक गोष्टींची तिने माहिती करून घेतली आणि जरूर त्या गोष्टी टिपूनही घेतल्या.

एका महिन्या नंतर शशीचा व्हिसा आला आणि शशी रविराज कडे सान फ्रॅन्सिस्कोला निघुन गेली.

विमलताईना आठवलं, घर परत एकदा रिकामं रिकामं झालं होतं. फोन उचलावा आणि मुलांशी बोलावं अशी वारंवार इच्छा होत होती. तिकडे शशीलाही कसलीशी नोकरी लागली. दर शनिवारी किंवा रविवारी रविराजचा फोन यायचा. शशी देखिल बोलायची. आवर्जून तब्येतीची चौकशी करायची. शांतारामही कसंबसं काम रेटतच होते. असेच कंटाळवाणे दिवस चालले होते. पुढे त्याची सुध्दा सवय झाली होती.

मग एक दिवस शशीने गुड न्यूज दिली. बाळ राजाची चाहुल लागली होती. आणि मग पुढच्या सात आठ महिन्यांनतर निलेशचा जन्म झाला. त्या अवघड दिवसाना शशीने आणि रविराजने आपल्या हिंमतीवर आणि तिथल्या त्यांच्या जीवाभावाच्या मित्रमंडळींच्या मदतीने खंबीरपणे तोंड दिलं. शशीच्या आईने तर अंथरूणच धरलं होतं. त्यामुळे त्यांचा तिकडे जाण्याचा प्रश्न नव्हता. विमलताई

शांतारामना एकटं सोडून जाऊ शकत नव्हत्या. शशीची एक दूरची आत्या तिकडे अमेरिकेला तिच्या जवळच राहायची. तिने दोन आठवडे येऊन जाऊन, कधी रात्रीला राहून, स्वत:चा प्रपंच संभाळत, जमेल तेवढी मदत केली. अशा रीतीने अवघड दिवस एकदाचे मागे पडले होते.

—————-

भूतकाळाच्या चलतचित्रपटाने जरा ब्रेक घेतला.

-------------

फ्लाईट सुटण्याची वेळ जवळ आली असावी. गेटवर आणखी लोकही जमा झाले. गर्दी वाढली. सगळया खुर्च्या भरल्या, लोक घोळक्याने उभे राहिलेले दिसले. आवाजही बराच वाढला होता. फ्लाईट बोर्डिंगच्या घोषणा व्हायला लागल्या. प्रवासी आपापल्या बोर्डिंग पासवर झोन क्रमांक, सीट क्रमांक तपासून पहायला लागले आणि घोषणांद्वारे सांगितल्या जाणाऱ्या रांगांमधे उभे राहू लागले.

व्हीलचेअरवाल्यांचीही लांबलचक रांग तयार झाली. बोर्डिंगला सुरुवात झाली. विमानाच्या प्रवेशद्वारापर्यंत व्हीलचेअरवाल्याने विमलताईना सोबत दिली आणि मग आपली  टिप घेऊन तो निघून गेला. विमलताईना एअर होस्टेसने त्यांची सीट दाखवली, अंगावर ब्लॅंकेट घ्यायला आणि सीट बेल्ट लावायला मदत केली. विमलताईनी मान मागे टेकवली. घड्याळ स्थानिक वेळ रात्रीचे तीन दाखवत होतं, भारतातले पहाटेचे साडे चार. झोपेचं खोबरं झालेलंच होतं, तरी विमलताईनी डोळे मिटून घेतले. त्याना एक डुलकी लागली असावी कारण परत डोळे उघडले तेव्हा विमान आकाशस्थ झालं होतं.

परत झोप येण्याची शक्यताच नव्हती.

---------------

विमलताईंच्या मनातला चलतचित्रपट या इंटर्वल नंतर परत सुरु झाला.

---

निलेश सहा महिन्याचा होईपर्यंत शशीची मॅटर्निटी सुट्टी संपली होती आणि तिला परत कामावर रुजू व्हावं लागलं होतं. आठवड्यातले पाच दिवस निलेशची रवानगी जवळच्या शिशुपालन केंद्रात व्हायची, आणि शनिवार-रविवारी रविराज आणि शशी घरीच त्याच्याकडे बघायचे. रविराज फोनवर गमतीने म्हणायचा की छोट्या निलेशला शशि मम्मा, रवि पापा आणि शिशुपालन केंद्राची ज्युडी मॉम यांच्यातलं कोण जवळचं, कोण परकं यातला फरक कळत नव्हता, आणि अत्यंत खेळकर मूल असल्याने निलेश जास्त करून आपल्या खेळातच दंग असायचा.

भारतात फोन केल्यावर रविराज आवर्जून आईशी आणि बाबांशीही बोलत असे. बाबांच्या कामाबद्दल चौकशी करत असे, आणि एका शनिवारी बोलता बोलता रविराजने शांतारामना सुचवलं, “बाबा, कामातून आता रजा घ्या, थोडीशी, किंवा कायमची आणि इकडे या एक दोन महिन्यांसाठी दोघंही. जरा फिरू सगळेजण, मजा करू. आमच्याही मनात बरेच दिवसांपासून आहे टूरिंग करायचं. निलेश दीड वर्षांचा झालाय, त्याला घेऊन सहज फिरू शकू.”

परत पुढच्या आठवड्याच्या फोन कॉलद्वारेही रविराजने आणि शशीनेही खूप आग्रह केला आणि मग शांतारामना आणि विमलताईना त्या प्रेमाच्या आग्रहाची दखल घ्यावीच लागली.

पासपोर्ट होतेच. दोघाना बी २ टुरिस्ट व्हिसाही पटकन मिळाला. मुंबई - दुबई - सान फ्रॅन्सिस्को रिटर्न तिकिटेही रविराजने पाठवली. शांतारामना फक्त महिन्याभराची सुट्टी मिळाली. आणि मग जुलैच्या पहिल्या आठवड्यात विमलताई आणि शांताराम अमेरिकेच्या ट्रिपला निघाले.

सामानाची जुळवा जुळव, पॅकिंग सुरु झालं होतं. त्यांच्या चारही चेक-इन बॅगा खच्चून भरल्या होत्या. तेव्हढ्यात विमलताईना आठवण झाली होती, “अहो, लग्नात शशीसाठी तयार केलेले दागिने इथेच आहेत. फारसं काही नाही, एक चपलाहार, एक पाटली जोड, दोन बांगड्या, एक पदक लावलेली साखळी, एवढच आहे. नेऊया तिकडे, कधी कोणाकडे कार्य असेल तर शशीला उपयोगी होतील. पर्समधुन सुरक्षित नेईन मी. एवढे कमीतकमी दागिने सगळ्या भारतीय बायकांकडे असतातच, माहिती आहे जगभरच्या कस्टम ऑफिसरना.”

आणि त्यानी बॅंक लॉकर मधून आणून दागिने पर्समधे घातले सुध्दा होते.

---------------

भूतकाळाच्या चलत चित्रपटाने एक ब्रेक घेतला.

---

विमानाचा प्रवास चालूच होता

कॅप्टनने अनाउन्समेंट केली की विमान ४० हजार फुटांवरुन चाललंय, प्रवासी सीट बेल्ट काढू शकतात, पण सुरक्षिततेच्या दृष्टीने सीट बेल्ट बांधून ठेवणेच योग्य.

विमलताईंच्या तोंडावर हसू फुटलं. पहिल्या प्रवासाच्या वेळी त्या शांतारामना म्हणाल्या होत्या की असं तळ्यात मळ्यात काय सांगतोय हा पायलट? नक्की सांग म्हणावं, सीट बेल्ट बांधायचे की सोडायचे.

---

विमलताईनी परत डोळे मिटले आणि ब्रेक के बाद चलतचित्रपट पुन्हा सुरु झाला.

------------------

त्यावेळची अमिरिकेची ट्रिप छानच झाली होती. विमानतळावरच रविराजने आई बाबाना कडकडून मिठी मारली होती, शशी पाया पडली होती, आणि निलेश बाबूने बाहेर भटकंतीला जाण्याच्या आशेने आजोबांकडे झेप घेतली होती.

नेलेल्या सगळया भेट वस्तू, शशीचे दागिने, कपडे लत्ते, सर्व खाद्यपदार्थ , “आई कशाला एवढं, बाबा कशाला एवढं”, म्हणत म्हणत अ‍ॅक्सेप्ट केले गेले.

दोन दिवसांनंतर मंडळी साईट सीईंग टूरवर निघाली. टूर प्लॅन करताना रविराजने खूपच औचित्य दाखवलं होतं. देशाच्या भव्य पसाऱ्याचं, निसर्गाच्या चमत्कारांचं, मानव निर्मित बगीचे, हॉलिवूड, लास वेगास, वॉशिंग्टनचे व्हाईट हाऊस, न्यूयॉर्क लिबर्टी पुतळा, सगळयांचं दर्शन करवण्याचा हव्यास न ठेवता, जेवढा झेपेल असा, आणि जेवढा जमेल असा, कार्यक्रम आखला होता. आई, बाबा, रविराज, शशी आणि छोटा निलेश असा आटोपशीर टूरिस्ट ग्रुप. मजा आली. एक छोटं बाळ आणि दोन सिनियर सिटिझन्स ग्रुपमधे असल्या कारणाने सगळीकडे, अगदी विमानाच्या बोर्डिंग रांगेत सुध्दा त्याना प्राधान्य दिलं जात असे. शांताराम आणि विमलताईना साईट सीईंग टूर खूपच आवडली. एक महिना संपल्यावर भारताला परतण्याची वेळ आली. “बाळांनो आनंदात रहा, काळजी घ्या” असा एक मोघम आशिर्वाद शशी आणि रविराज याना देऊन दोघे भारतात परत आले होते.

परतीच्या प्रवासात विमलताईंचे डोळे मिटत नव्हते. काहीतरी रुखरुख मनाला लागल्यासारखं वाटत होतं. शेवटी त्या शांतारामना म्हणाल्या होत्या, “काय हो, बघितलंत नं तुम्ही, शशी तर निलेशचं काहीच करत नव्हती, सगळं रविराजच करत होता.”

शांताराम म्हणाले होते, “अगं, तो गुलाम तरी कुठे मम्माला हात लावू देत होता ? सारखा डॅडी हवा असायचा त्याला. आणि बघितलंस नं, ट्रिपवरून

आल्यानंतर दुसऱ्याच दिवशी शिशू पालन केंद्रात जायचं म्हटल्यावर कसं हसू फुटलं त्याच्या तोंडावर ? तिथल्या ज्यूडीने बरीच माया लावली आहे म्हणतात. कसा उड्या मारत गेला तो? मुलं विचित्रच वागतात कधी कधी ?”

“कळत नाही, मुलं विचित्र की त्यांचे आई वडील विचित्र”! विमलताई पुटपुटल्या होत्या आणि अंगावर ब्लॅंकेट ओढून त्यांनी डोळे मिटले होते.

---------------

भूतकाळाच्या चलत चित्रपटाने एक ब्रेक घेतला.

---

विमानाचा प्रवास चालूच होता

हलक्या उपहाराची सर्विस सुरु होत होती. विमान पश्चिमेकडे चाललं होतं. त्यामुळे लांबच लांब पहाट आणि सकाळ अनुभवायला मिळत होत्या.

ट्रे मधले थोडे फळांचे तुकडे विमलताईनी तोंडात टाकले. अर्धा बनपाव बटर लावून खाल्ला आणि मग कपभर कोमट कॉफी प्यायल्यावर ट्रे झाकून ठेवला आणि त्यांनी डोळे मिटून घेतले.

---

मागल्या घटनांचा चलतचित्रपट परत सुरू झाला.

---------------

“आई, बाबा, सुखरूप पोहोचलात ना”. रविराज फोनवर विचारत होता. भारतात परतल्याला शांताराम आणि विमलताईना आठएक दिवस झाले होते.

“बाबा मी जॉब बदलतोय. प्रॉजेक्ट कन्सल्टिंग सर्विसेस फर्मकडून चांगली ऑफर आली आहे बाबा”. रविराज बोलत होता.

"हो बाबा,  माहिती आहे मला की प्रॉजेक्ट मधे सारख्या डेडलाईन असतात".

"हो बाबा, प्रॉजेक्ट साईटवर, क्लायंटकडे वगैरे टूरिंग असणार."

शांतारामची आणि रविराजची चर्चा चालली होती

"नाही बाबा, हेड ऑफिस इथे नाही, शिकागोला आहे".

"पण बाबा, ऑफर फार छान आहे, आत्ताच्या दीडपटीने पगार आहे".

"होय बाबा, जरा धाडसी पाऊल आहे खरं, पण जरासं धाडस कधी तरी करायलाच पाहिजे, नाही का ?"

विमलताईना शशीची, नीलेशची चौकशी करायची होती पण रविराजचा दुसऱ्या काही गप्पा मारण्याचा मूड दिसला नव्हता. नवीन जॉबबद्दल सखोल बोलणं झाल्यानंतर बाकी काही बोलण्यासारखं नव्हतं. फोन ठेवून दिला होता.

आठवड्या नंतर शनिवारी फोनची शांताराम आणि विमलताई वाट पहात होते. रविराजचा नेहमीप्रमाणे साप्ताहिक कॅाल आला नाही. पण दुसऱ्याच दिवशी रविवारी संध्याकाळी मात्र फोन आला.

"काल उशीरा टूरवरून आलो बाबा", रविराज सांगत होता. "क्लायंट आणि सप्लायरला घेऊन युनिव्हर्सिटीतल्या तज्ञांबरोबर चर्चा होती. सान फ्रॅन्सिस्कोहुन सेंट लुई पर्यंत पहिली फ्लाईट, तिथून पुढे छोट्या विमानाने डिकॅटर, पुढे टॅक्सीने दोन तास प्रवास युनिव्हर्सिटी च्या शहराकडे. मग मीटिंग, आणि मीटिंगनंतर तसाच परतीचा प्रवास. जीव दमला. मग रात्री फोन नाही केला.

"शशी तिच्या मैत्रिणीकडे गेली आहे , आई. आणि नीलेशला शिशुपालन केद्राच्या ज्यूडीने तिच्या घरी नेलंय वीक एन्डला. दोन वर्षांचा मुलगा आहे तिचा, पॅट. नीलेश आणि आणि  पॅट, दोघं खूप खेळतात.

“आता फोन ठेवतो बाबा, परवाच्या मीटिंगचा सारांश, कन्सलटंटचं समिक्षण वगैरे पूर्ण करून सबमिट करायचंय.”

फोन कॅाल संपला.

शांताराम म्हणाले, “बघ विमल मी सांगत होतो नं, कन्सल्टिंग जॅाबमधे वाकडं तिकडं टूरिंग असू शकतं, आणि त्याला अंतही नसतो. काम तर चोवीस तास गुणिले सात दिवस, अगदी ट्वेंटीफोर बाय सेव्हन. पण पैसा पैसा करत त्या वेळी रविराजने हे सगळं नजरेआड केलं. असंच आहे विमल आपल्या अति शिक्षित, अतिहुशार मुलांच्या अगदी मानेवर खडा ठेवून काम करून घेतात तिकडे. त्यांच्या लेक्सस मोटार गाड्या, स्विमिंग पूल वाले मोठे मोठे बंगले आपल्या लोकांना लांबून साजरे वाटतात, पण हे दूरचे डोंगर आहेत हे नंतर लक्षात येतं, आणि वाईट म्हणजे, जसं रविराजचं  झालंय तसं, नॅार्मल कौटुंबिक जीवनाला पूर्ण तिलांजली मिळते.”

विमलताईंनी आत जाऊन देवापुढे हात जोडले होते, आणि मनातल्या मनात देवाची प्रार्थना केली होती.

--------------

भूतकाळाच्या चलत चित्रपटाने एक ब्रेक घेतला.

————--

विमानाचा प्रवास चालूच होता.

ब्रेकफास्ट सर्विस सुरु होत होती.

विमलताईनी डोळे उघडले. चाळीस हजार फुटांवर, ढगांच्या खूप वर सगळीकडे सकाळचा सूर्य प्रकाश पसरलेला होता. ते फटफटलेलं ऊन आत न येऊ देण्यासाठी विमानाच्या सगळ्या खिडक्यांचे शटर डाउन केले होते. सिलिंग लाइटचा मिणमिणता उजेड आत होता.

पण प्रवाशांची देहकर्मे ज्याच्या त्याच्या शरीराच्या घड्याळाप्रमाणेच चालणार. सर्व टॉयलेटवर. "वापरात आहे" चे लाल लाईट लागले होते. एखादा लालचा हिरवा दिवा झाला की लगेच दुसरा प्रवासी टॉयलेट मधे शिरत असे. याच प्रमाणे लक्ष ठेवून विमलताईनी संधी साधली आणि टॉयलेटवारी उरकुन घेतली.

विमलताई जागेवर येऊन बसल्या, सीट बेल्टही लावून टाकला. विमान आकाशस्थ होऊन सात एक तास झाले होते, म्हणजे पोहोचायला अजुन आठ नऊ तास बाकी होते.

विमलताईनी थोडासा ब्रेकफास्ट घेतला. जेवणाच्या वेळेपर्यंत म्हणजे दोन तीन तास झोप काढावी म्हणून मग विमलताईंनी डोळे मिटले आणि सुमारे अर्धा तास झोपही काढली. शेजारच्या रांगेतल्या लहान मुलाच्या रडण्याच्या आवाजाने विमलताईना जाग आली आणि नंतर डोळे मिटुनही झोप येईना.

---------------

मनातला चलतचित्रपट सुरू झाला पण त्याचा पुढचा भाग आनंददायी नव्हता.

---

कुटुंबाला साडेसाती लागल्याप्रमाणे दु:खद घटनाच घडत गेल्या.

इकडे शांताराम आजारी पडले. त्यांचे औषध पाणी, दवाखान्याच्या वाऱ्या, या दुष्टचक्रातच विमलताई आणि शांताराम अडकून पडले.

अमेरीकेहून फोन कॅाल यायचे. त्रोटक बोलणं व्हायचं. दोन्ही ठिकाणी अगदीच वेगळ्या वेगळ्या घडामोडी चालल्या होत्या. दोन्हीकडचे प्रॅाब्लेम वेगळे, त्यावर तोडगे वेगळे. कधी प्रॅाब्लेम सुटायचे, कधी नाही. ऐलतीर आणि पैलतीर एकमेकापासून दुरावायला लागले.

गुड न्यूज आली. कन्सल्टिंग फर्म मधे रविराजचा चांगलाच जम बसला होता. रविराजला पार्टनर बनवलं गेलं होतं. वरची जागा, जास्त जबाबदारी, खूपच वाढीव पगार. रविराजचे हात फर्मच्या कामात, मीटिंग्ज, डिस्कशन यात गुंतले गेले. घरातल्या गमती जमती फोन वर फारशा ऐकू येईनात. व्हिडिओ कॅालवर निलेश, शशी कधी कधी यायचे, हात हलवून, दोन शब्द बोलून गायब व्हायचे.

आणि मग ती धक्कादायक बातमी कानावर आली होती. शशी निघुन गेली होती. रविराजला आणि पाच वर्षाच्या निलेशला सोडून निघून गेली होती. जाताना तिचे सर्व कपडे, दागिने, क्रेडिट कार्ड, तिच्या नावावरच्या बॅंक अकौंट्सचे, इन्व्हेस्टमेंटचे कागदपत्रं घेऊन शशी निघून गेली होती. “शून्य कंपॅनियनशिप” असे दोन शब्द लिहिलेली चिठ्ठी मागे ठेवून, रविराज टूर वरून परत यायच्या आत ती निघून गेली होती.

असंच एक वर्ष गेलं. दिवस खडतर होते. छोट्या निलेश साठी विमलताईंच आतडं पिळवटत होतं. जॅाब संभाळून, रविराज तिकडे कसं घर संभाळत असेल, निलेशकडे कोण पहात असेल, ते त्याना कळतंच नव्हतं. कळून उपयोगही नव्हता कारण इकडे त्यांचे हात पूर्ण बांधलेले होते.

इकडे शांताराम जास्तच आजारी पडले. दिवसेंदिवस त्यांची तब्येत बिघडतच गेली आणि वर्षभरात त्यांनी डोळे कायमचे मिटले.

रविराज आला होता. आठवडाभर राहिला होता.

आठ दिवस भर्रकन गेले. बसून सविस्तर बोलणं शक्यच नव्हतं पण जे काही त्रोटक बोलणं झालं त्यावरुन कळलं की,

सहा वर्षांचा निलेश ठीक आहे.

शाळा व्यवस्थित चालू आहे.

रविराजला फर्म मधे सिनिअर पार्टनरची पोजिशन मिळाली आहे.

“घराकडे , निलेशकडे कोण पहातंय” ? या प्रश्नावर उत्तर मिळालं, “ज्यूडी पहातेय,आई. ज्यूडी आणि पॅट आता आपल्याच घरात शिफ्ट झालेत.”

त्या रात्री विमलताई विचार करत होत्या, “ज्यूडी आणि पॅट शिफ्ट झालेत”, म्हणजे काय? निलेश, पॅट आणि केअर टेकर ज्यूडी एकत्र झोपतायत की काय?

रविराज परत जायला निघत होता त्यावेळी न राहवून विमलताईनी चाचरतच त्याला विचारलं होतं, “ते ज्यूडी आणि पॅटचं काय म्हणत होतास ? आणि शशीचं काय?”

“अगं आई, शशीने माझ्याशी घटस्फोट घेतलाय. शशी प्रकरण संपलं. ज्यूडी माझी लिव्ह इन पार्टनर आहे”.

तेवढ्यात कोणी “टॅक्सी आली” असं सांगत आलं.

रविराज विमलताईंच्या पाया पडला, त्याना एकदा मिठी मारली आणि बॅग उचलून, आलेल्या टॅक्सीकडे निघुन गेलाही.

नंतरच्या दिवसांमधे, “लिव्ह इन पार्टनर म्हणजे नक्की काय”, असा प्रश्न विमलताईंच्या मनात बऱ्याचदा यायचा. पण कोणाला विचारायचं धारिष्ट्य काही त्याना झालं नव्हतं.

--------------

भूतकाळाच्या चलत चित्रपटाने एक ब्रेक घेतला.

————--

विमानाचा प्रवास चालूच होता

विमलताईनी डोळे उघडले. विमानाने ग्रीनलॅंड पार करून ते कॅनडाच्या किनाऱ्याजवळ आल्याचे स्क्रीन वर दिसत होते. कॅनडात शिरल्यावर विमान आपला मोहरा दक्षिणेकडे वळवणार असं नकाशातल्या तुटक रेषे वरून दिसत होतं.

लंच सर्विस सुरु करण्याची लगबग सुरु झाली होती. विमलताईंचं हिंदू व्हेजिटेरियन जेवण येऊन पोहोचलं. स्पेशल जेवण सर्वांच्या आधी आलं आणि आजुबाजूचे प्रवासी अन्नप्रतिक्षा करत असतील, तर जेवणाऱ्याला जरा अवघड वाटतं. पण आज हिंदु व्हेजिटेरियन जेवणवाले आजुबाजूला खूप प्रवासी होते आणि मग सगळेच आपआपल्या जेवणावर तुटून पडले.

विमलताईनी थाळीचं आवरण उघडलं. काटा, सुरी, टिश्शयु पेपर वगैरे हळुवारपणे काढले. थाळीमधे व्हेज पुलाव वगैरे बरंच काही होतं. एका वाटीत शिऱ्यासारखा पदार्थ होता. अर्धी वाटी शिरा खाल्यावर विमलताई थांबल्या. पाणी प्यायल्या.  मग फळाचा एक तुकडा आणि गोड दही एवढा आहार घेऊन त्यांनी थाळी बाजूला सरकवली.

टॉयलेटमधे जाऊन विमलताई हात, तोंड धुवून आल्या आणि अंगावर ब्लॅंकेट ओढून घेऊन शांतपणे पहुडल्या.

---

मनातला चलतचित्रपट पुन्हा सुरू झाला

---------------

जीवनसाथी गमावल्यानंतर जीवनाची घडी परत त्याच रूळावर क्वचित येते. कसेबसे धक्के बुक्के खात जीवनाचा उरलेला प्रवास मागे राहिलेला प्रवासी नेटाने करत राहतो.

शांताराम निवर्तल्यावर विमलताई सुमारे सहा महिन्यांनंतर बऱ्याचशा सावरल्या. मग एक दिवस महिला मंडळाच्या मासिक मीटिंगलाही त्या गेल्या, त्यांच्या मैत्रिणींबरोबर बसल्या. बोलल्या. हाउसी खेळल्या, गप्पा मारल्या नाहीत तरी ऐकत बसल्या.

चहा आला. चहा - सामोसे, वेफर्स यांचा समाचार घेता घेता गाव गप्पा देखील चालल्या होत्या.

एका छोट्या ग्रुपला कर्णिक बाई सांगत होत्या, “लाटकरांच्या राकेशने न्यू जर्सीला कोणा बंगाली मुलीला लिव्ह इन पार्टनर घेतलंय म्हणे”

विमलताई चुप होत्या, पण त्यानी कान टवकारले. बर्वे बाईंनी भाबडेपणे विचारलं, “लिव्ह इन पार्टनर म्हणजे नक्की काय हो.”

अगदी विमलताईंच्या मनातला प्रश्न होता आणि  इतर बऱ्याच जणीनाही कुतुहल होतं.

कर्णिक बाईंनी समजावणीच्या सुरात सांगितलं, “अहो लिव्ह इन रिलेशनशिप म्हणजे पुरुषानी आणि बाईनी एकमेकाशी लग्न न करता नवराबायको सारखं एकत्र रहायचं. यालाच लिव्ह इन पार्टनर घेणे असंही म्हणतात”.

“अगबाई, हा तर अनैतिक संबंध.” बर्वे बाई उद्गारल्या.

प्रश्न नाजुक असल्याने या विषयावर पुढे काही चर्चा झाली नाही. आणि थोड्याच वेळात मीटिंग संपली, सगळ्या घरोघरी पांगल्या.  विमलताईंच्या मनात मात्र झगझगीत ट्यूब पेटली, लख्ख प्रकाश पडला. ती ज्यूडी रविराजची लिव्ह इन पार्टनर ? शी, काहीतरीच. निलेशचं बोट धरून या शिशुपालन केंद्रातल्या आया बाईने नक्कीच घरात शिरकाव करुन घेतला होता. शशीच्या जाण्यानंतर तिने डाव साधला होता, की बिचाऱ्या शशीच्या जाण्याला ती अंशत: कारणीभूत झाली होती,

हे कळायला सध्या तरी मार्ग नव्हता. काही असो, तिची निलेशवर आणि ओघानेच रविराजवर बसलेली पकड दूर करायलाच हवी होती. रविराजचा बंगला, दोन दोन मोटारगाड्या बघुन तोंडाला पाणी सुटलं असणार तिच्या.

एक वर्ष गडबडीत गेलं. बॅंकेची, इतर इन्व्हेस्टमेंटची पुनर्रचना करणे, टॅक्सच्या नियमांचे पालन करणे अशी खूप कामं होती. शांतारामचे टॅक्स तज्ञ चुलतबंधू, त्यांच्या सोसायटीतलीच इतर जीवश्च कंठश्च मित्रमंडळी वगैरे विश्वासातल्या हितचिंतकांच्या मदतीने सावकाश सावकाश सर्व सोपस्कार पूर्ण झाले.

विमलताईंचं मन शांत झालं. दुसऱ्या विचारांना आता जागा झाली. रविराज आता चाळिशीच्या जवळ येत चालला होता. त्याची या गोऱ्या पाश्चात्य आयाबाईपासून सुटका करायची आणि चांगल्या भारतीय मुलीशी लग्न लावून द्यायचं हे पहिलं काम. आणि हो, छोट्या निलेशला आपलंसं करून त्याच्या मनावर चांगले संस्कार बिंबवणारी आई सुध्दा त्या भारतीय मुलीला बनायला पाहिजे.

---

विमानाचा प्रवास चालूच होता

---------------

विमलताईनी डोळे उघडले. विमानाने कॅनडात शिरून आपला मोहरा दक्षिणेकडे वळवला होता. उत्तर अमेरिका खंडावरून विमान उडत होतं. आता तीन चार तासात सान फ्रॅन्सिस्को.

विमलताई उठल्या. टॉयलेटला जाऊन आल्या. कस्टम डिक्लेरेशन फॉर्म भरून टाकला. हेडफोनचं न उघडलेलं पॅकेट देऊन टाकलं. मन ताजं तवानं करून मग आपलं साध्य गाठण्यासाठी कसा पवित्रा घ्यावा याचा विचार करू लागल्या.

पर्स उघडून विवाह मंडळाने पाठवलेली शॉर्ट लिस्टेड सूची त्यानी बाहेर काढली अन् शंभरावं पारायण सुरू केलं. चारच नावे होती, अगदी अनुरूप. पण फायनल चॉईस रविराजनेच करायचा होता.

सान फ्रॅन्सिस्को विमानतळ आला. केबिनमधे लाइट म्युजिक सुरु झालं. विमानाचं जमिनीपासून अंतर आणि विमानाचा वेग, दोन्ही कमी होत असलेले स्क्रीन वर दिसू लागले. थोड्याच वेळात विमान धाव पट्टीवर उतरलं आणि आपल्या निर्धारित स्थानाच्या रोखाने पळू लागलं.

रविराज विमानतळावर आला होता. सोबत ज्यूडी,निलेश आणि पॅट होते.

बाहेर आल्यावर रविराजने ‘‘आई’’ म्हणुन मिठी मारणं जेवढं अपेक्षित होतं, तेवढंच ज्यूडीने ‘‘आई’’ म्हणत एका बाजूने आणि निलेशने ‘‘ग्रॅनी’’ म्हणत दुसऱ्या बाजूने बिलगणे त्यांना अनपेक्षित होतं. पॅटलाही मधे शिरायचं मनात दिसलं पण जागाच शिल्लक नव्हती. हा सर्व देखावा म्हणजे जणू एखाद्या सुखी कुटुंबाच्या पुनर्भेटीचं चित्रण होतं.

स्वागताचा हा आवेग विमलताईना अपेक्षित नव्हता.

रविराजने एक बॅग उचलली, ज्यूडीने दूसरी उचलली. पॅटने स्ट्रोलर हातात घेतला तर निलेशने नुसताच विमलताईंचा हात पकडला आणि सर्वजण न बोलता पार्किंग लॉट कडे चालू लागले.

कोणी दाखवलेले प्रेम, आपुलकी, सद्भावना खऱ्या आहेत की खोट्या आहेत याची चिकित्सा करत बसण्याचा विमलताईंचा स्वभावच नव्हता. जो आपल्याशीच गोड वागतो तो आपला माणूस, हेच त्यांचं तत्त्व. त्यामुळे, आत्ता तरी या प्रेमाच्या आणि आपुलकीच्या वर्षावाने त्या सुखावल्या होत्या.

रविराजचं घर प्रशस्त होतं पाठीमागे स्वीमिंग पूल सुध्दा होता. त्यालगतच्या अंगणात गुलाबाचे ताटवे लावले होते. एक छोटा कारंजा थुई थुई नाचत होता. घराच्या आतलं फर्निचरही फॅशनेबल असलं तरी त्यात अतिरेक कोठेही नव्हता. एकूण घराचा डौलच घरातल्या रहिवाशांच्या सुसंस्कृतपणाची साक्ष देत होत्या.

विमलताईना आपल्या लिव्हिंग इन रिलेशनची साधारण कल्पना रविराजने आधीच दिली होती आणि त्यांच्या मनाची खूप प्रमाणात तयारी झाली होतीही, पण तरीही आपले स्वागत कसे होईल, यापासून पुढच्या सर्वच बाबतीत त्या तशा साशंक होत्या. पण जेव्हां विमानतळावर त्यांना हसतमुख चेहऱ्याची ज्यूडी भेटली, विमलताईना “आई” म्हणत तिने प्रेमाने मिठी मारली आणि आपुलकीने त्यांची बॅग उचलून घेतली तेव्हाच तिने एक छोटी लढाई जिंकली होती. तरीसुध्दा, एवढ्याने संशयाचा किडा पूर्ण नेस्तनाबूत होणं शक्यच नव्हतं.

घरी पोहोचेपर्यंत रात्र झाली. सगळेचजण दमलेले असल्याने पटापट जेऊन घेऊन झोपायला गेले. विमलताई झोपल्या खऱ्या, पण त्याना जेट लॅग असल्याने त्या पहाटे चार वाजताच जाग्या झाल्या, मात्र तशाच त्या पलंगावर पडून राहिल्या. बाकी उठाउठ झाल्यानंतर स्वैपाकघरातली कामं सुध्दा सुरू झाली असावीत. जसे आवाज यायला लागले तशा विमलताई उठल्या. स्वच्छ होऊन किचन मधे आल्या. ज्यूडी मुलांच्या ब्रेकफास्टची तयारी करत होती. विमलताई काही मदत करायला म्हणून पुढे सरसावल्या होत्या पण ज्यूडीने त्याना थांबवलं. "आई तुम्ही बसा हं" या अर्थाचं काहीसं चिवचिवून त्यांच्या हातातलं काम काढून घेतलं. “तुम्हाला जेट लॅगमुळे विश्रांती मिळाली नसेल नं, आराम करा तुम्ही.”

विमलताईंना ज्यूडीने चहासाठी पाणी गरम करून दिलं, दूध साखर, टी बॅग्स बगैरे साहित्य किचन टेबलावर ठेवलं आणि मग स्वत: तयार व्हायला ती वर निघुन गेली.

विमलताईंचं चाललेलं झोपेचं विचित्र टाइम टेबल तिने समजून घेतलं, आणि अशा समजूतदारपणाने, सुस्वभावी वागणुकीने ज्यूडीने विमलताईंचं मन बरंचसं जिंकलं.

विमलताईंनी स्वत:चा चहा करुन घेतला. एक कप संपल्यावर दुसराही करून घेतला.

पॅट आणि नीलेशची जोडी तयार होऊन खाली आली. घाईघाईने वाडग्यामधे सिरियल काढून घेऊन त्यावर दूध ओतलं आणि पाच मिनिटात ब्रेकफास्ट आवरून घेतला. साडे सातला एक व्हॅन दाराशी आली आणि तिच्यात बसून पॅट आणि निलेशची जोडी शाळेला निघून गेली. आठ वाजता रविराज आणि ज्यूडी पाठोपाठ खाली आले. विमलताई तिथेच फॅमिली रूम मधे आणि किचनमधे घुटमळत होत्या. रविराजने “झोप बरी लागली का” वगैरे औपचारिक चौकशी केली आणि गरम कॉफी आणि टोस्टचा हलका ब्रेकफास्ट घेतल्यावर लॅपटॉपच्या बॅगा उचलून दोघंही निघाली. दोघांच्या वेगळ्या वेगळ्या महागड्या गाड्या.

जाण्यापूर्वी हलक्या हळुवार आवाजात ज्यूडीने विमलताईना सूचना दिल्या. “आई तुम्ही तुमचं चहा ब्रेकफास्ट उरकून घ्या. फ्रिज मध्ये सगळं आहे. अकरा वाजता साफ सफाई करणाऱ्या क्लीनिंग लेडीज येतील. आठवड्यातून एकदा आम्ही बोलावतो त्याना. साडे बारा वाजता क्लारा येईल, भाज्या, चिकन वगैरे करायला. तिच्या सूचना मी लिहून ठेवल्यातच वेगळ्या. ती तुम्हाला गरम जेवण देईल आणि जाईल. तुम्ही पडा जरा दुपारचं, आराम करा. जेट लॅग फार वाईट. आणि हो, शाळेतून

जोडी येईल साडे तीनला. ते घेतील काय हवे ते फ्रिजमधुन, तुम्हाला नाही त्रास द्यायचे ते. …… बरं , संध्याकाळी भेटू या, आई. ….बाय बाय.”

स्पष्ट सूचना. मोघम काही नाही, ना काही लपवा छपवी. सरळ काम.

चौथ्या दिवसानंतर विमलताई जरा सांवरल्या. दुपारी - संध्याकाळी सर्वांना. पोहे, उपमा, ग्रिल्ड चटणी चीज सॅन्डविच असे गरम गरम चमचमीत प्रकार मिळू लागले. संध्याकाळी, रात्री गप्पा टप्पा करताना विमलताई मिसळून गेल्या.

आता विमलताईंच्या मनातला ज्यूडीबद्दलचा पूर्वीचा दूषित पूर्वग्रह बऱ्याच प्रमाणात कमी झाला होता. ही मुलगी नीलेशकडे तिच्या स्वत:च्या मुलाइतकं पाहते, रविराजचं व्यवस्थित करते, घर छान चालवते, भारतीय पध्दतीचं जेवण करायलाही शिकली आहे. आता सुगृहिणी सुन म्हणजे आणखी काय पाहिजे आपल्याला? आता ही कोण, कुणाची काहीच माहिती नाही, रविराजलाही काही माहिती नसावी पण त्यानी घेतलंय हिला आणि पॅटला सुध्दा आपल्या पंखाखाली. ठीक आहे. आपल्याला चालवून घ्यायला हरकत नसावी. दुसरं कोणी शोधत बसण्यापेक्षा देवा ब्राह्मणांच्या साक्षीने या दोघांचंच लग्न लावून दिलं की हा अनैतिकपणाचा शिक्का तरी पुसला जाईल.

दोन तीन दिवस विचार करून करून विमलताईना स्वत:लाही आपला विचार जास्त जास्तच पटत गेला आणि रविराजला एकट्याला गाठून याबद्दल चर्चा करण्याची त्या संधी शोधू लागल्या.

आठवडा गेला. पुढचा वीक एन्ड आला. शुक्रवारी संध्याकाळी चहा पिता पिता रविराज विमलताईना म्हणाला, “आई, ज्यूडी उद्या सकाळी सान डिएगो ला जाणार आहे, काही कामासाठी. रविवारी संध्याकाळी येईल परत. सकाळी सातला टॅक्सी बुक केली आहे मी तिच्यासाठी.”

विमलताई ऐकत होत्या.

“सकाळी आठला मी येईन खाली कॉफी आणि ब्रेकफास्ट साठी, तुझ्या हातचे स्पेशल फ्रेन्च टोस्ट खायला.” रविराज बोलत होता.

“जरूर, अगदी नक्की मिळतील, पण दोघा मुलांचं काय ?” कमलताईनी विचारलं.

“आई, त्याना क्लास आहे सकाळी. गाडी येईल त्यांच्यासाठी आठलाच. त्याच्या आधी खाली येऊन दूधाबरोबर सिरियल संपवून तयार रहायला लागेल त्याना. साडे अकरा बारा पर्यंत परत येतील ते, त्याच गाडीने.” रविराज सांगत होता. “आणि मलाही निघायला लागेल साडे दहा पर्यंत. एक मीटिंग आहे तिकडे डाउन टाउन ला. लंचला पिझ्झा चालेल नं? येतानाच घेऊन येईन”.

“पिझ्झा कशाला, मी करीन छानसं काहीतरी सगळ्यांसाठी. मग गरम चपात्या तेवढ्या रोटीमॅटवर करा तुम्ही जेवणाच्या वेळी”. विमलताई म्हणाल्या.

रविराजने मान डोलावली.

शनिवारची सकाळ उजाडली. रविराजने दिलेल्या वेळापत्रकानुसार गोष्टी घडत गेल्या. आठच्या सुमारास रविराज कॉफी प्यायला आणि ब्रेकफास्टला खाली आला. विमलताईनी गरम गरम फ्रेंच टोस्ट तळून डिश त्याच्या पुढे केली.

“वा:, सुपर क्लास.” रविराजने शेरा दिला. खुशीत ब्रेकफास्टचा समाचार घेऊ लागला.

विमलताईनी संधी साधली.

“रविराज, हे तुझं आणि ज्यूडीचं असंच एकत्र रहाणं मला बरं वाटत नाही रे. तुमची दोघांची हरकत नसेल तर देवा ब्राह्मणांच्या साक्षीने किंवा तेही नको असेल तर रजिस्टर्ड लग्न करून टाकूया. सगळं रीतसर होईल, समाजाची, कायद्याची

मान्यता मिळेल. एक प्रकारचं शिक्कामोर्तब होईल.'' विमलताईंनी आपलं मन उघडं केलं.

''हे काय नवीनच काढलंयस आई ? कसलं शिक्कामोर्तब आणि समाजाची, कायद्याची मान्यता घेऊन बसलीस ? उलट प्रॉपर्टीची उगीच गुंतागुंत होईल''. रविराजने सांगण्याचा प्रयत्न केला.

''अरे रवि, बायकोला प्रॉपर्टीचा वाटा द्यायलाच पाहिजे. तिच्या आणि पॅटच्या भविष्याची तरी नीट तरतूद होईल. नाहीतरी पॅट आणि निलेश सख्ख्या भावासारखे वाढतायत. एवढं कमावतोयस, बायकोला वाटेकरी करण्यात वावगं नाही. शिशुपालन केंद्राचा जॉब काय, आज आहे, उद्या नाही. ती बिचारी एवढा तुला जीव लावते तर तुलाही तिला सामावून घ्यायलाच हवं. हक्काचं छप्पर मिळू दे त्यांना''. विमलताई म्हणाल्या.

रविराजने विमलताईंकडे पाहिलं. क्षणभर त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या. पाव मिनिट तो गप्पच होता. विमलताईंच्या बोलण्याचा विचार करत होता. मग त्याने घड्याळाकडे पाहिलं. विमलताईंचा हात धरून तो म्हणाला, ''आई बस जरा. हे अनैतिकता, समाजमान्यता वगैरे विचार जरा बाजूला ठेव. हे घर आणि या दोन मोटारींच्या प्रॉपर्टीबद्दल नाही बोलत मी. प्रश्न मोठा आहे आई. ''

विमलताई गोंधळल्या. त्यांच्या चेहेऱ्यावरचं मोठ्ठं प्रश्नार्थक चिह्न पाहून रविराजला हसू आलं.

रविराज पुढे म्हणाला, ''अगं आई, इथे बिचारं वगैरे कोणी नाही. ज्यूडी काही शिशुपालन केंद्रातली आया नाही, ती शिशुपालन केंद्राची मालकीण आहे, मालकीण. प्रोप्रायटर. आणि तिचा मुलगा पॅट मायनर नॉमिनी आहे. सान फ्रॅन्सिस्कोमधे ठीक ठिकाणी अशी पाच शिशुपालन केंद्रं तिची कंपनी चालवते

आणि आता सान डिएगोला याच धर्तीवर शिशुपालन केंद्रं उघडून फ्रॅन्चायसी तत्वावर चालवायला द्यायचा ज्यूडी विचार करते आहे. त्यासाठीच ती गेली आहे तिकडे आज.''

विमलताई ऐकत होत्या. ही नवीन माहिती त्या ऐकतच राहिल्या.

''जवळच तिचा स्वत:चा बंगला आहे आई, पण इथे आम्ही दोघं परस्पर संमतीने राहतोय रिलेशनशिपमधे, आणि आई, एवढंच नाही, ऐक जरा, तिच्या दुसऱ्या प्रॉपर्टीचा जरा वेगळा किस्सा आहे.'' रविराज सांगत होता.

''काय, तिची आणखी एक प्रॉपर्टी आहे?'' विमलताईंनी आश्चर्याने विचारलं

"होय आई" रविराज सांगू लागला,"ज्यूडीने आणि तिच्या आधीच्या नवऱ्याने म्हणजे लॉरेन्सने दहा वर्षांपूर्वी भागीदारीत न्यूयॉर्कला दोन हॉटेलं सुरु केली होती. आता ती अतिशय उत्तम चालली आहेत. लॉरेन्सचा, त्याच्या आधीच्या लग्नापासूनचा मुलगा रोनी ही हॉटेलं मॅनेज करतो. तिथुनही भागिदारीचा नफा मिळतो ज्युडीला. पण त्या कॉन्ट्रॅक्टमधे एक अट आहे की यदाकदाचित लॉरेन्सपासून विभक्त होऊन ज्यूडीने दुसऱ्या कोणाशी विवाह केला तर तिची हॉटेलमधली भागीदारी संपेल.'' रविराज सांगत होता. ''आणि आई सध्या ज्यूडीचा वारस आहे फक्त पॅट. कोणी इतर वाटेकरी असण्याचा गुंताच नाही. मग कशाला तिने सोन्याची अंडी घालणारी कोंबडी मारावी ?''

"आणि तू काय करतोस बाबा?" जरा चाचरतच विमलताईंनी विचारलं. एक संशयाची पाल मनात चुकचुकुन गेली, की आपला मुलगा ज्यूडीवर तर पैशासाठी अवलंबून नाही ना?

''आई,माझ्या व्यवसायांचं स्वरुप वेगळं आहे. माझी स्वत:ची कंपनी वेगळी आहे. ज्यूडीच्या कंपनीशी आमचं फक्त बिझिनेस रिलेशन आहे. ज्यूडीच्या

शिशुपालन केंद्रांची सप्लाय चेन मॅनेजमेंट आणि इस्टेट मॅनेजमेंट माझी कंपनी बघते, पण तेही कमर्शियल टर्मवर, आमच्या मुख्य उद्योगांपासून जरा वेगळं हे एक छोटसं डिपार्टमेंट आहे.” रविराज सांगत होता, “आमच्या कंपनीचा मुख्य महसूल येतो तो खाण व्यवसायातून. आमची इंडोनेशियातल्या कोळशाच्या दोन खाणींमधे भागीदारी आहे आई. आणि त्या कोळशाच्या वितरणाचे पुढच्या पाच वर्षांचे जागतिक हक्क आमच्याकडे आहेत. हळुहळु आणखी खाणींकडूनही कॉन्ट्रॅक्ट करण्याच्या प्रयत्नात आम्ही आहोत. बघूया कसं जमतं ते.” रविराज सांगत होता. “आणि आई, माझ्या सर्व प्रॉपर्टीचा सध्या वारस आहे फक्त नीलेश”.

विमलताई विचारात पडल्या. या सगळ्या गोष्टींचा लग्नाशी काय संबंध आहे ते त्याना कळेना, आणि तसं त्यानी रविराजला विचारलंही.

“वाः, वाः. संबंध आहे तर. तूच बघ आई. आमचं दोघांचही बस्तान आपआपल्या परीने छान बसलंय. आमच्या स्वत:च्या वेगळया आयडेंटिटी आम्ही राखून आहोत आणि कुटुंब म्हणून रहायचाही आनंद आम्हाला मिळतोय. ज्यूडीला, मुलांना पूर्ण सुरक्षितता मिळतेय”. रविराज सांगत होता. “लग्न झालं की कायदेशीर बंधने येणार. सध्या जे आमचे दोन्ही बाजूंचे बिजिनेस वेग वेगळे आहेत, त्याच्यामधे या लग्नाच्या रूपाने संलग्नता येणार. वारस आणि बेनिफिशरी वाढत जाणार. मग परत कागदपत्रं करायची. रीतसर वाटण्या करायच्या. वारसा हक्काच्या आणि कायदेशीर मान्यतेच्या गुंतागुंतीला आणखी वाढवण्यात काही अर्थ आहे का आई ? सर्वांनीच थोडा बहुत समंजसपणा दाखवायला नको का?” रविराज विचारत होता. “आणि आई, आमच्यात काही अनैतिकता दिसते का तुला ? काय मोठी रीतसर देवाब्राह्मणांच्या साक्षीने लावलेली लग्ने टिकतात ते पाहिलंय आपण”.

विमलताई ऐकत होत्या. ही कठीण प्रमेयं सोडवण्याचा त्या प्रयत्न करत होत्या.

कळत होतं पण वळत नव्हतं, आणि जे काही थोडं वळत होतं, ते काही न सांगता येणाऱ्या कारणांमुळे अस्वीकारणीय वाटत होतं.

दोन महिन्यांनतर विमलताई भारतात परतल्या. कुटुंबाच्या या त्यांच्या दृष्टीने अस्वीकृत अवताराशी त्यांनी मिळवूनही घेतलं. पण त्या परतल्या, ही न सुटलेली प्रमेये बरोबर घेऊनच. त्यांना अजुनही कळलेले नाही की रविराज आणि ज्यूडीच्या लिव्ह इन रिलेशनशिपला,

अनैतिक व्यवहारांशी केलेला सोयीस्कर समझोता म्हणायचं, की,

कायद्याच्या चौकटीत समंजसपणे बसवलेली चाकोरीबाहेरील नैतिकता म्हणायचं.!!!

————X————

## ई साहित्य प्रतिष्ठानचे सोळा वर्षाचे होत आहे.
## श्री. सुधीर कारखानीस यांचे हे ई साहित्यवरील दुसरे पुस्तक.

श्री सुधीर कारखानीस हे एक ज्येष्ठ इंजिनियर व तंत्रज्ञ आहेत. त्यांची यापूर्वी तंत्रज्ञानावरील पुस्तके प्रकाशित झाली आहेत तसेच दोन कथासंग्रहही आहेत. त्यांच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे कठीण नाही. पण त्यांनी आर्थिक फ़ायदा मिळवण्याऐवजी आपले पुस्तक ई साहित्य तर्फ़े वाचकांना विनामूल्य देणे पसंत केले.

श्री सुधीर कारखानीस यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१५), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४९), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१०), डॉ. वृषाली जोशी(४८), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३३), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३)

डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(१३), श्याम कुलकर्णी(१८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(४), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी, डॉ. सरोज सहस्रबुद्धे (७), अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन(४) श्रीरंग कौलगी(2), यशवंत कदम(६), पांडुरंग सूर्यवंशी(३) सुधीर कारखानीस(२), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक (३) असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं 'इ'यें।
दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।

फ़क्त एक क्लिक करा आणि पुस्तक उघडा.

